सप्टेंबर २०१९/पाने ६०/किंमत ₹१०

लोकराज्य

शताब्दी महोत्सव

महाराष्ट्राचे सांस्कृतिक वैभव...

संपूर्ण राष्ट्र पूरग्रस्तांच्या पाठीशी...

आता पूरग्रस्तांना सावरू या...
त्यांना पुन्हा उभं करूया...
आवश्यकता आहे
सर्वांच्या सहकार्याची...

मुख्यमंत्री सहायता निधीला मदत करा

ऑनलाईन : https://cmrf.maharashtra.gov.in/

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

अंतरंग

सुधीर फडके

महाराष्ट्राच्या मनामनांत आदराचे स्थान असलेले बाबूजी.. संगीत आणि गायनाबरोबरच राष्ट्रीय व सामाजिक विषयांबाबत तितकेच सजग होते. देशाचे नागरिक म्हणून समाजाचे आपण काही देणं लागतो, ही भावना त्यांच्यामध्ये दृढ होती. त्यांच्यातल्या माणूसपणाची आणि प्रतिभावंत कार्याची जाणीव त्यांच्या लोकप्रियतेतून कायम टिकून आहे.

ग. दि. माडगूळकर

गदिमा हे महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक संचिताचे प्रतीक आहेत. आधुनिक वाल्मीकी अशी त्यांच्या जनमानसात ओळख आहे. त्यांच्या कलाकृती लोकमानसात रुजल्या आणि कृतार्थ झाल्या. आयुष्यभर अनंत हस्तांनी आनंदानुभवाची उधळण रसिकांवर त्यांनी केली आहे. सत्‌बरोबर स्वत्व जपणाऱ्या या प्रतिभावंताने रसिकांच्या मनावर अधिराज्य केले.

पु. ल. देशपांडे

पु.ल. हे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनातील एक वैभव.. त्यांच्या लेखनात आणि वक्तृत्वात शब्द, सूर, रंगरूप आणि नाद यांचा अनोखा मिलाप आढळतो. सामान्य माणसाची सुख-दु:खे आणि समाजवर्तनातील विसंगतीवर त्यांनी मार्मिक भाष्य केले आहे. माणसाला हसवता-हसवता विचार करायला लावण्याचे विलक्षण सामर्थ्य त्यांच्या सर्व साहित्यकृतींमध्ये आढळते.

शब्द... स्वर... अभिनय	६
मी बघितला 'हिमालय'	१२
मैत्रीचा निखळ झरा...	१६
किमयागार	१८
असे होते बाबूजी...	२०
स्वरगंधर्व	२२
लढवय्ये बाबूजी!	२६
शब्दांचा राजविलास	३०
ग्राहक चळवळीचा आधारस्तंभ	३२
असे होते गदिमा	३४
कलावंशाचे वारसदार	३६
'पुल'कित गदिमा	३८
मैत्रीचा ठेवा	४०
बहुरंगी बहुपदरी..	४२
असे होते पु.ल.	४४
बहुआयामी पु.ल.	४६
पुलंचं घर	४८
आनंदयोगी पु.ल.	५०
यांना जीवन कळले हो!	५२
समाजभान जपणारा संपादक	५५
सोशल मीडिया मस्त आहे...	५७

वर्ष ७१ वे | अंक ३ | सप्टेंबर २०१९

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

मुख्य संपादक	ब्रिजेश सिंह
प्रबंध संपादक	अजय अंबेकर
संपादक	सुरेश वांदिले
कार्यकारी संपादक	अनिल आलूरकर
सहसंपादक	मनीषा पिंगळे
उपसंपादक	गजानन पाटील राजाराम देवकर
वितरण	मंगेश वरकड अश्विनी पुजारी
साहाय्य	भारती वाघ
मुखपृष्ठ	सीमा रनाळकर सुशिम कांबळे
मांडणी, सजावट	शैलेश कदम राजेश जाधव
मुद्रितशोधन	उमा नाबर
मुद्रण	डिलिजंट मीडिया कॉर्पोरेशन लि., महापे, नवी मुंबई.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
Email : lokrajya.dgipr@maharashtra.gov.in

वर्गणीदार व तक्रार निवारण: ९३७२२३०३२०
(सकाळी १०.३० ते ५.३० कार्यालयीन कामकाजा दिवशी)

ई – लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमतच असेल असे नाही.

वेदमंत्राहून आम्हां वंद्य, वंदे मातरम् ।।

वेदमंत्राहून आम्हां वंद्य, वंदे मातरम् ।।
वेदमंत्राहून आम्हां, वंद्य वंदे मातरम्, वंद्य वंदे मातरम् ।।ध्रु।।

माउलीच्या मुक्ततेचा, यज्ञ झाला भारती ।
त्यात लाखो वीर देती, जीविताच्या आहुती ।
आहुतींनी सिद्ध केला, मंत्र वंदे मातरम् ।।१।।

याच मंत्राने मृतांचे, राष्ट्र सारे जागले ।
शस्त्रधारी निष्ठुरांशी, शांतीवादी झुंजले ।
शस्त्रहीना एक लाभे, मंत्र वंदे मातरम् ।।२।।

निर्मिला हा मंत्र ज्यांनी, आचरीला झुंजुनी ।
ते हुतात्मे देव झाले, स्वर्गलोकी जाऊनी ।
गा तयांच्या आरतीचे, गीत वंदे मातरम् ।।३।।

गीत : ग. दि. माडगूळकर • संगीत : सुधीर फडके • स्वर : सुधीर फडके • चित्रपट: 'वंदे मातरम्' (१९४८)

हे राष्ट्र देवतांचे

हे राष्ट्र देवतांचे, हे राष्ट्र प्रेषितांचे
आ चंद्रसूर्य नांदो स्वातंत्र्य भारताचे

कर्तव्यदक्ष भूमी सीतारघुत्तमाची
रामायणे घडावी, येथे पराक्रमाची
शीर उंच उंच व्हावे, हिमवंत पर्वताचे
आ चंद्रसूर्य नांदो स्वातंत्र्य भारताचे

येथे नको निराशा, थोड्या पराभवाने
पार्थास बोध केला येथेच माधवाने
हा देश स्तन्य प्याला गीतारव्य अमृताचे
आ चंद्रसूर्य नांदो स्वातंत्र्य भारताचे

हे राष्ट्र विक्रमाचे, हे राष्ट्र शांततेचे
सत्यार्थ झुंज द्यावी या जागत्या प्रथेचे
येथे शिवप्रतापी नरसिंह यौम्यतेचे
आ चंद्रसूर्य नांदो स्वातंत्र्य भारताचे

येथे परंपरांचा सन्मान नित्य आहे
जनशासना तळीचा पायाच सत्य आहे
येथे सदा निनादो जयगीत जागृताचे
आ चंद्रसूर्य नांदो स्वातंत्र्य भारताचे

– ग. दि. माडगूळकर

लोभसवाणा योगायोग

डॉ. सदानंद मोरे
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

महाराष्ट्र हे भारतातील एक अग्रगण्य प्रगतिशील राज्य आहे. महाराष्ट्रातील लोकांची प्रगतीची संकल्पना राज्याच्या स्थापनेपासूनच व्यापक राहिली आहे. भौतिक विकासाबरोबरच सांस्कृतिक समृद्धीही वाढली पाहिजे असे राज्याचे धोरण आहे. या धोरणाला अनुसरूनच राज्य मराठी विकास संस्था, साहित्य आणि संस्कृती मंडळ, भाषा सल्लागार समिती अशा विविध संस्था येथे कार्यरत आहेत. मराठी भाषेसाठी स्वतंत्र मंत्रालयच आहे.

महाराष्ट्र राज्याच्या दृष्टिकोनातून ज्या महनीय व्यक्ती, संस्था दखल घेण्यासारखे प्रसंग त्यांच्यावर प्रकाशझोत टाकून त्यांच्या विषयीच्या भावना व्यक्त करणे व नव्या पिढीला त्यांचा परिचय करून देणे हे महाराष्ट्राच्या शासनकर्त्यांनी आपले एक महत्त्वाचे कार्य मानले आहे. हे कार्य शासनाच्या वेगवेगळ्या माध्यमातून, संस्थांतून व कार्यालयांतून वेगवेगळ्या पातळ्यांवर केले जाते, त्यासाठी वेगवेगळे उपक्रमही राबवले जातात.

महाराष्ट्र राज्याचे 'लोकराज्य' हे मासिक नियतकालिक या उपक्रमात नेहमीच आघाडीवर राहिले आहे. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे अधिकारी आणि कर्मचारी याबाबतीत सतत दक्ष असतात. प्रस्तुतचा अंक या आघाडीचे व दक्षतेचे एक प्रतीक मानायला हवे.

महाराष्ट्र देश म्हणजे महापुरुषांच्या मांदियाळीचा देश. धर्म, अध्यात्म, कला, क्रीडा, साहित्य, समाजकारण, राजकारण अशा जीवनाच्या अनेक क्षेत्रांवर या मांदियाळीचा ठसा स्पष्टपणे उमटल्याचे दिसून येते. हे वर्ष सर्जनशील संगीतकार सुधीर फडके, थोर साहित्यिक ग. दि. माडगूळकर आणि अष्टपैलू कलावंत पु. ल. देशपांडे यांचे जन्मशताब्दी वर्ष आहे. या मान्यवरांच्या कार्याची यथोचित दखल घेऊन ते नव्या संदर्भात पुढे आणावे व त्यांच्याविषयीचे ऋण व्यक्त करावे यासाठी 'लोकराज्य'ने विशेष अंक प्रसिद्ध केला आहे.

वेगवेगळ्या पण तरीही परस्परपूरक असलेल्या क्षेत्रांमध्ये लक्षणीय व्यक्तींनी समकालीन असावे हा एक लोभसवाणा योगायोग आहे आणि तो महाराष्ट्राच्या वाट्याला यावा हे महाराष्ट्राचे भाग्यच होय. माडगूळकरांची गीते आणि पटकथा संवाद, सुधीर फडके यांचे संगीत आणि पुलंचा विनोद यांच्यावर महाराष्ट्राच्या काही पिढ्यांचे भरणपोषण झाले आहे.

गदिमा आणि बाबूजी हे चित्रपट निर्मितीत एकत्र काम करताना दिसायचेच, पण गीतरामायणाच्या निमित्ताने त्यांनी तो इतिहासच घडवला असे म्हणता येते. अण्णांचे शब्द आणि बाबूजींचे सूर असा मणिकांचन योगच होता तो...

या तीनही मातब्बरांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी सार्वजनिक जीवनात केलेले कार्य. माडगूळकरांनी महाराष्ट्राच्या विधान परिषदेत कलेचे प्रतिनिधित्व केले. फडके पोर्तुगिजांच्या जोखडात अडकलेल्या प्रदेशाच्या मुक्तिमोहिमेत अग्रेसर राहिले तर पुलंनी आणीबाणीच्या काळात होणाऱ्या स्वातंत्र्याच्या गळचेपीविरुद्ध आवाज उठवला.

लोकराज्यच्या प्रस्तुत विशेषांकात या तीनही मान्यवरांच्या बाबत वेगवेगळ्या अभ्यासकांनी लिहिलेल्या लेखांचा व आठवणींचा समावेश आहे. त्यात कुटुंबीय, आप्तस्वकीय, स्नेही, सहकारी, अभ्यासक, समीक्षक अशा सर्वच क्षेत्रातील व्यक्ती आहेत. त्यांच्या लेखनातून या त्रयींच्या स्वभावाच्या, कार्याच्या व योगदानाच्या विविध पैलूंवर प्रकाश पडतो. इतकेच नव्हे तर साहित्य आणि कला क्षेत्रात महाराष्ट्राची भावी वाटचाल कशी असावी, याच्याही सूचना मिळतात.

लोकराज्यच्या या विशेषांकाचे वाचक विशेष स्वागत करतील याची खात्री आहे.

डॉ. सदानंद मोरे
(अतिथी संपादक)

गदिमा, बाबूजी व पु.ल. या कर्तृत्वान कलावंतांच्या सर्जनशीलतेची परस्परांना जाण होती. दाद होती. म्हणून तर गदिमा-बाबूजी ही जोडी अनेक रुसवेफुगवे, मतभेद होऊनही अभेद्य होती.

सुधीर गाडगीळ

शब्द... स्वर... अभिनय

माडगूळकरांच्या गीताच्या झोक्यांनी पाळण्यातले चिमुकले डोळे गाईगाई करतात. प्रेयसी प्रियकराला माझा होशील का? असं त्यांच्या शब्दांनी विचारते, खेड्यातल्या सया त्यांचच गाणं गात वारुळाला, नागोबाला पूजायला जातात. गीत रामायणातल्या गाण्यांनी ओसऱ्या दुमदुमतात. त्यांच्या लावण्यांनी जत्रेच्या रात्री रंगतात. 'जिंकू किंवा मरू' या तालावर सैनिकांची पावले पडतात. पटकथा पडद्यावर जिवंत होऊन येतात. महाराष्ट्राच्या लोकजीवनात सुगंधासारखा शिरलेला हा प्रतिभासंपन्न लेखक कलाकार.

हेच माडगूळकर आपल्या सुरेल सहकाऱ्यांबद्दल बाबूजींबद्दल बोलताना म्हणाले होते की, 'पाखरू पंख घेऊन जन्माला येतं, तसं बाबूजी म्हणजे सुधीर फडके गाणं घेऊनच जन्माला आले आणि आयुष्यभर रसिकांना सुरांच्या हिंदोळ्यावर झुलवत राहिले,' आणि खुद्द 'पु.ल.' त्यांनी तर आपल्यासारख्या रसिकांवर राज्यच केले. कारण आपल्याशी आपुलकीनं संवाद साधणारी, भरजरी, अनाकलनीय शब्द नसलेली त्यांची वाणी होती. आपल्या अवतीभोवती वावरणारी, पण त्यांच्या छटा, आपल्यालाच न कळलेली व्यक्तिचित्रं आपल्या मनापर्यंत पोहोचवणारी पुलंची लेखणी होती.

थेट संवादाचं भाग्य

माडगूळकर.. फडके... आणि पु.ल., या तिघांच्या शताब्दीचं योगायोगानं हे एकच वर्ष आहे. आणि माझं भाग्य असं की, या तीनही कर्तृत्ववान माणसांशी मला थेट संवाद साधता आला. त्यांना भेटता आलं. 'पुलंबरोबर तर पुणे, मुंबई डेक्कन क्वीन प्रवासात अनेकदा गप्पा करता आल्या.' मॉरिशसमध्ये पुलंनी टाकलेल्या गुगलीला उत्स्फूर्त उत्तर देत, त्यांची दाद मिळवता आली. बाबूजींबरोबर 'सावरकर' चित्रपट निर्मितीच्या काळात कोल्हापूरला जाण्याचा योग्य आला. बाबूजींच्या दादरच्या घरी डोकावता आलं. आनंद-श्रीधर या मित्रांमुळे अण्णांच्या पंचवटीत डोकावता आले.

मुख्य म्हणजे अण्णा माडगूळकर, बाबूजी ऊर्फ सुधीर फडके यांच्या चित्रपट संगीताचा सर्वोच्च लोकप्रिय आविष्कार असलेलं 'चैत्रबन' सादर करण्याचं भाग्य मला माझ्या करिअरच्या नमनालाच मिळालं आणि ते निवेदन करण्याच्या निमित्ताने त्या मुळातल्या शब्दस्वर निर्मितीत सहभागी, साक्षी असणाऱ्या अनेक कलावंतांशी; बाबूजी गदिमांबरोबरच्या क्षणांच्या आठवणी गप्पा करत माहीत करून घेता आल्या.

शताब्दीच्या वाटेवर असलेल्या या त्रिकूटाबद्दल भरभरून बोलणारे कोण कोण मला भेटले? राजा परांजपे, राजा गोसावी, ललिता पवार, सुलोचना ताई, शरद तळवलकर, बेबी शकुंतला, रमेश देव-सीमा, सुधीर-श्रीकांत मोघे असे असंख्य कलावंत आणि याखेरीज बारामती जवळच्या 'पणदरे'पासून दिल्लीपर्यंत 'चैत्रबन' सादर करत असताना या शब्दस्वर सम्राटांची लोकप्रियता आणि त्यांच्या शब्दस्वरांना

मिळणारी अफाट दाद मला अनुभवता आली.

शताब्दीचं निमित्त साधून त्या साऱ्या गोष्टींची
ही धावती स्मरण – नोंद !

कुंडल, माडगूळ, किर्लोस्करवाडी अशा साऱ्या ग्रामीण भागात माडगूळकरांचं बालपण गेलं. साहजिकच पारावर बसून गप्पा मारण्याची त्यांना विलक्षण ओढ. या गप्पांतूनच माडगूळकरांच्या गीतांची शब्दनिर्मिती सहज व्हायची. आता हीच एक कविता पाहा.

चौकट तीवर बालगणपती
चौसोपी खण स्वागत करती
झोपाळ्यावर अभंग कातर
सवे लागती कड्या करकरू
आठवणींच्या आधी जाते
तिथे मनाचे निळे पाखरू
खेड्यामधले घर कौलारू
त्या तिथे पलीकडे किंवा
माझिया प्रियेचे झोपडे

गंमत म्हणजे यावर पुलंचं खट्ट्या भाष्य असे. ते 'त्या तिथे' गाण्याला पोस्टाचं गाणं म्हणत 'त्या तिथे पलीकडे' केअर ऑफ माझ्या प्रियेचे झोपडे.

गीतांची वैशिष्ट्ये

ग. दि. माडगूळकरांच्या गीतांची वैशिष्ट्ये बघा, त्यांच्या गीतांनी त्यातल्या ओळींनी पाळण्यातले चिमुकले डोळे गाईगाई करतात. खेड्यातल्या सया त्यांचं गाणं गात नागोबाला पूजायला येतात. गीत रामायणतल्या गाण्यांनी देवळातल्या ओसऱ्या दुमदुमतात. त्यांच्या लावण्यांनी जत्रेच्या रात्री रंगतात, प्रेयसी प्रियकराला गदिमांच्या शब्दातून विचारते 'नसेल माहीत तुला कधी ते, रोज तुझ्या मी स्वप्नी येते त्या स्वप्नांच्या आठवणी या, ओठी देशील का? सांग तू माझा होशील का?'

बाबूजींच्या बोलण्यात एकदा आलं होतं की, एका पहाटे प्रभात रोडने एकनाथ मांमाकडे येत असताना रस्त्यावरचे म्युनसिपालटीचे दिवे विझले गेले, तसे पटकन अण्णा म्हणाले, या नव्या गाण्याच्या ओळी, 'विझले रत्नदीप नगरात, आता जागे व्हा यदुनाथ.'

राजा परांजपेनी तर 'चैत्रबन'च्या निमित्ताने एक वेगळीच गमतीदार आठवण सांगितली होती. पुण्याहून जाताना वाटेत लागणारे चिक्कीचे गाव म्हणजे लोणावळा. जवळच्या राजमाची पॉइंटकडे जाणाऱ्या रस्त्यावरची कडक उन्हाळ्यातली टळटळीत दुपार. त्या दुपारी एका आंधळ्या मुलीला, जिच्या पायात चप्पलही नाही, तिला एक ज्येष्ठ गृहस्थ फेऱ्या मारायला लावत होते. रस्त्यावरून जाणाऱ्या एका प्रवाशाच्या ही गोष्ट लक्षात आली आणि तो प्रवासी त्या ज्येष्ठ गृहस्थाच्या जवळ येऊन म्हणाला, दादा, ती आंधळी, पायात चप्पल नाही आणि तुम्ही तिला कडक उन्हात फेऱ्या मारायला लावताय? तेव्हा ते ज्येष्ठ गृहस्थ म्हणाले, ती आंधळी वगैरे नाही. ती डोळस अभिनेत्री आहे. तिचं नाव आहे, सीमा देव. मी स्वत: राजा परांजपे आणि हे एका चित्रपटातल्या गाण्याच चित्रीकरण चाललेलं आहे. चित्रपटाचं नाव आहे 'जगाच्या पाठीवर' आणि चित्रीकरण चाललेलं गाणं आहे... 'जरी आंधळी मी तुला पाहते रे, तुला पाहते..'

तुम्हाला सांगतो माडगूळकर फडकेंच्या 'चैत्रबना'च्या गाण्यांचं निवेदन करताना, त्यांच्या परिवारातल्या, सीमा, राजा परांजपे यांच्यासारख्यांनी त्यांच्या आठवणींचा खजिना असा माझ्याजवळ उलगडला होता.

१९५२ साली प्रदर्शित झालेल्या 'लाखाची गोष्ट' या चित्रपटातील गीताच्या वेळी सुधीर फडके, ग. दि. माडगूळकर, राजा परांजपे हे त्रिकूट एकत्र आलं ही रसिकांच्या दृष्टीने 'लाखाची गोष्ट' घडली.'

गदिमा–बाबूजींच्या प्रपंच चित्रपटाला १९६१ च्या आसपास राष्ट्रपती पारितोषिक मिळाले. यानिमित्तानं सांगावसं वाटतं की, पुढे आमदार वगैरे झाल्यावर अण्णा राजकारणाच्या निमित्ताने दिल्लीपर्यंत वावरले खरे पण मनाने मात्र, माती चिकटलेल्या गावरान शेंगेसारखेच, राहिले. ज्या मातीतून ते घडले त्या मातीचा विसर त्यांना कसा बरं पडणार? त्यामुळेच 'विठ्ठला, तू वेडा कुंभार'सारखे अस्सल मराठीपण जपलेले शब्द ते गीतासाठी योजू शकले.

अन्य भाषांमधल्या उत्तमोत्तम कल्पना, माडगूळकरांनी आपल्या गाण्यातून मराठीत आणल्या पण ते केवळ भाषांतर नव्हतं. उदा. 'भाई मैने गोविंद लिनो मोल' ही मीराबाईंची कल्पना. माडगूळकरांचे संस्कार लाभून, ही कल्पना जेव्हा मराठीत येते, तेव्हा तिचे 'हाच तुक्याचा विठ्ठल आणि दासांचा श्रीराम' असं अस्सल मराठमोळं गीत बनतं.. 'बाई मी विकत घेतला शाम' हे द्वंद्वगीत प्रसिद्ध होते.

'सुखाचे सोबती' नावाचा चित्रपट होता. 'पाण्यात पाहताना चोरूनिया क्षणैक, त्याचेच त्या कळाले तो राजहंस एक' असं गाणं त्यात होतं. एकजण अण्णांना म्हणाले, चोरूनिया शब्द पटत नाही. त्यापेक्षा प्रतिबिंब हवे. त्यावर अण्णा फटदिशी म्हणाले, 'जात्यावरती बसल्यानंतर जेव्हा ओवी सुचते, दळणारी ती ठरवत नाही; इतरां कैशी रुचते.' असं शब्दप्रभुत्व असलेले अण्णा माडगूळकर आपल्या मराठीत जन्मले–वाढले–रमले–हे आपले भाग्यच !

ग. दि. माडगूळकरांच्या गावाच्या वाटेवर खंडोबाचा माळ लागे.

माळ ओलांडून आत आले की, गावामधली सर्वात स्वच्छ अशी वसाहत लागे. या वसाहतीच्या मध्यभागी इमारत होती. ही इमारत अण्णांच्या जिव्हाळ्याचा विषय. कारण कष्ट करून जीवन जगणाऱ्या हरिजनांनी आपल्या सांघिक कष्टाच्या बळावर ही इमारत उभारली होती. रात्रीच्या वेळी सारे हरिजन त्या तक्क्यांमध्ये जमत आणि भजनकीर्तनाचा जल्लोष चालत असे. या भजनकीर्तनाच्या स्मरणामधूनच 'काय देवाची सांगू मात, झाला महार पंढरीनाथ' या अभंगाचा जन्म झालेला आहे.

अशा अण्णांच्या गाण्यांच्या जन्मकथा मला काय किंवा सुधीर मोघेंना काय, बाबा पाठक, नेमिनाथ, बाळ चितळे, मधुकराव, आनंद-श्रीधर अशा त्यांच्या कुटुंबीयांच्या गप्पातून ज्ञात झाल्या, हे आमचं पूर्वसंचित. त्यांची गाणी ज्यांच्यावर चित्रबद्ध झाली. त्या कलावतांशी पु.ल., सीमा-रमेश देव, राजा गोसावी, सुलोचना यांच्याशी बोलतानाही अनेक आठवणी उजळल्या. साहित्याच्या साऱ्या क्षेत्रात अण्णांनी केलेला यशस्वी संचार त्यामुळेच ज्ञात आहे. गदिमांनी कथा कादंबरी, नाटक, पटकथा तसेच हजारो गाणी लिहिली, अभिनय केला. नकला केल्या. कथाकथन केले, भाषणे केली. महाराष्ट्र शारदेचा, मंडप भान हरपून, नाचून, गाऊन जागता ठेवला.

पुलं म्हणतात की, 'माडगूळकरांच्या फडातला फडकरी होण्याचं भाग्य मला लाभले.' मी म्हणतो की, त्यांच्या गाण्यांच्या कहाण्या स्वरानंद-स्वरमुग्धामुळे 'चैत्रबन' माध्यमातून मला पुढच्या पिढीपर्यंत नेण्याचं भाग्य लाभलं.

सुधीर मोघेंनी सादर केलेल्या चैत्रबनाला पुण्यात राजा परांजपे, सुधीर फडके आणि खुद्द गदिमा एकदा उपस्थित होते. नव्या गायकांचा कार्यक्रम ऐकल्यावर बाबूजी म्हणाले की, 'तुम्ही आम्हाला आमचा 'काल' ऐकवलात, आम्ही तुम्हाला आमचा 'आज' ऐकवतो आणि पाठोपाठ खुद्द बाबूजींनी कुठलं गाणं ऐकवावं? तर 'या सुखांनो या' माडगूळकरांच्या शब्दातली आणि बाबूजींच्या सुरातली भावना नेमकेपणी अभिनयांकित करणारे कलावंत सुदैवाने सिनेमांच्या राज्यात होते. त्यापैकी राजा परांजपे, राजा गोसावी, चित्रा, रेखा, रमेश देव-सीमा यांच्यावर चित्रित झालेलं, 'शीर्षक गीत' बाबूजींनी ऐकवलं.

१९८५ मध्ये दूरदर्शनवर आशा भोसलेंचा कार्यक्रम ध्वनिचित्रमुद्रित केला गेला. त्यातली गाणी आशाताईंच्या आवाजात नव्याने करायची असं ठरलं. मुंबईच्या फोर्टमधल्या आशिष स्टुडिओ येथे रेकॉर्डिंग होते. आशाताईंचं गाणं संपलं आणि स्टुडिओत हुंदका फुटल्याचा आवाज आला. बघतो तो काय बाबूजीच रडत होते. आशाताई त्यांच्याजवळ गेल्या नी म्हणाल्या, 'काय झाल बाबूजी?' तीस वर्षांपूर्वी १९५५ साली 'सुवासिनी' चित्रपटातलं 'जिवलगा कधी रे येशील तू' हेच गाणं आशा मी तुझ्याकडून गाऊन घेतलं होतं आज तू ते तसच्या तसं सादर केलंस ते ऐकल्याचे हे आनंदाश्रू आहेत. व्वा क्या बात है?'

शब्दसुरांना न्याय

बाबूजी गदिमांच्या शब्दसुरांना पूर्ण न्याय देणारी आशा भोसले सारखी दमदार गायिका मिळाल्यानेच 'चैत्रबन'ची बरीच गाणी अजरामर झाली. बाबूजींच्या शिवाजी पार्कच्या घरी जाण्याचा योग मला अनेकदा आला. केव्हाही त्यांच्या घरी गेले की, जेवणाचा आग्रह असे. जेवल्याशिवाय पुण्याला परतायचेच नसे आणि विशेष म्हणजे आपलं जेवणाचं खरकटं ताट बाबूजी स्वत: उचलून बाथरूमध्ये ठेवत. 'तुम्ही आमचे पाहुणे तुम्ही ताटाला हात लावू नका, फक्त जेवणाचा आस्वाद घ्या.' असं म्हणत वयाच अंतर विसरून जाऊन हा घरेलू आपलेपणानं ते जो पाहुणचार करत त्याला तोडच नाही.

सावरकर चित्रपटाच्या निर्मिती वेळी मी कोल्हापूरला गेलो. चित्रपटातले दुय्यम कलावंतही कोल्हापुरातल्या स्टार हॉटेलात उतरले आणि स्वत: बाबूजी मात्र, निर्माता असूनही मामेभावाच्या घरी उतरले. मी त्यांना त्या वेळी थेट विचारले की, तुम्ही मुख्य तर स्टार हॉटेलात का उतरला नाहीत?

बाबूजी उत्तरले, 'सामान्यांच्या देणग्यांतून या चित्रपटाची निर्मिती होतीय तेव्हा मी तरी चैन करता कामा नये.' हे सामाजिक भान बाबूजींना होते. गोवा मुक्तिसंग्रामासाठीही त्यांनी काम केलं. आणि पोर्तुगिजांच्या बंदिवासातून मोहन रानडेंची सुटका करण्यासाठीही

सोपी सुरावट

बाबूजी, आपल्या सोप्या सुरावटींनी सामान्य माणसाच्या मनात आपणही गायक आहोत हा आत्मविश्वास निर्माण करणारे, जिथं जिथं मराठी भाषा बोलली जाते तिथं तिथं रसिकांना 'रामायणाचं' वेड लावलेले, आपल्या सुरेल आवाजाने मराठी रसिकांच्या तीन पिढ्या मोहवून टाकलेले बाबूजी म्हणून प्रत्येक पिढीबरोबर, त्या त्या पिढीला जवळच वाटावे असे सूर देत गेले. 'जगाच्या पाठीवर', 'सुवासिनीसारखी' सारीच गाणी, श्रोत्यांच्या ओठांवर रुजली.

वाल्मीकी ते औंधकर

इंग्रजी, संस्कृत, हिंदी, गुजराती, पंजाबी, उर्दू, मल्याळी, तेलुगू, कानडी भाषा अण्णांना अवगत होत्या. दो आँखे बारा हाथ, गूंज उठी शहनाई, नवरंग, तूफान और दिया.. या गाजलेल्या चित्रपटांच्या पटकथा त्यांनी थेट हिंदीतच लिहिल्या होत्या. दत्तो वामन पोतदारांनी अण्णांना 'आधुनिक वाल्मीकी' म्हटलंय. अण्णा औंधच्या महाराजांची हुबेहूब नक्कल करत. त्यामुळे त्यांना काही जण औंधकर पुकारत.एच.एम.व्ही कोल्हापुरात असताना त्यांचा मुक्काम शालिनी स्टुडिओत असे. तिथेच त्यांनी पद्मा पाटणकर पुढे ज्या गदिमांच्या अर्धांगिनी झाल्या त्यांचे गाणे ऐकले 'वद यमुने कुठे असे घनश्याम माझा', जे गदिमा-बाबूजी जोडीचं पहिलं गीत. फत्तेलाल म्हणजे साहेबमामांसाठी अण्णांनी सीता स्वयंवर चित्रपटाची कथा, पटकथा, संवाद अवघ्या दहा दिवसात लिहिलेत. कोथरुडच्या पटवर्धन बागेत 'ऊनपाऊस'चे लेखन केले.

त्यांनी पाठपुरावा केला.

श्रीधर आणि आनंद माडगूळकर या अण्णांच्या चिरंजिवांमुळे त्यांच्या पंचवटी बंगल्यात जाऊन थेट अण्णांना भेटता आले. त्या वेळी अण्णांनी मला कलावंताचे 'आनंद पर्यटन', हे त्यांचं प्रवासवर्णनपर पुस्तक सही करून भेट दिले. एवढा सर्वार्थानं मोठा माणूस माझ्यासारख्या छोट्या माणसाला पुस्तक भेट देताना म्हणतो काय? तर म्हणे, 'दो आँखे बारा हाथ'च्या यशानंतर व्ही शांताराम आम्हाला घेऊन सहलीला गेले. मी कविता गाणी लिहितो पण प्रवासवर्णन प्रथमच लिहितोय बघा जमलंय का? यावर मी काय बोलणार!

२००५ मध्ये 'एक होते गदिमा' नावाचा शो आम्ही केला होता. श्रीधर माडगूळकराला अण्णांच्या आठवणी सांगायला आमंत्रित केले होते. श्रीधर माडगूळकर भरभरून बोलले, म्हणाले, '१ ऑक्टोबर १९१९ हा अण्णांचा जन्मदिवस. जन्मगाव शेटफळ (सातारा) पंधरा वर्षात शताब्दी होईल. त्यापूर्वी माणदेशच्या उजाड माळरानापासून साहित्यातील केशरमळे फुलवणाऱ्या बागेपर्यंतचा प्रवास मी पुस्तकबद्ध करतोय.'

जिप्सीच्या वाटा

आनंदने 'जिप्सीच्या वाटा' या पुस्तकाच्या माध्यमातून अण्णांच्या मनाचे अंतरंग छान मांडले. समारंभांना आम्हाला अण्णा नेत नाहीत अस वाटायचं. त्याची खंत त्यांनी डायरीत नोंदवली होती. बाबूजींशी कितीही वादंग झाले तरी गीतसंगीताच्या बाबतीत ते दोघे परस्परांना पूरक होते. कॅमेरामन बाळ बापटांनी 'पेडगावचे शहाणेचे दिवस', 'आराम हराम आहे' या सिनेमाच्या वेळी माडगूळकरांनी स्वत:बरोबर मला कशी संधी दिली असे सांगत जगदीश खेबुडकरांनी व्यक्त केलेलं ऋण ऐकताना मला पंचवटीत भेटलेले पांढऱ्याशुभ्र खादीच्या धोतरातले, सिल्कच्या गुरुशर्टातले जॅकेट घातलेले सोनेरी टोपणांचं पेन जाकिटाच्या खिशाला लावलेले, भव्य भाल असलेले, तरुण मित्रा, प्रवास वर्णन, आवडले तर कळव असे म्हणणारे गजानन दिगंबर मांडगूळकर आठवत राहतात.

परफॉर्मर पु.ल.

गाणं बांधणं, पेटी वाजवण, सबकुछ, गुळाचा गणपती असणं, वंदे मातरमचा हिरो होणं आणि लेखणी वाणीतून तीन पिढ्यांना मंत्रमुग्ध केलेले पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे यांचीही जन्मशताब्दी आहे. साधंसोप्प बोलत समोरच्या समूहाला सहज कस जिकावं याचा आमच्यासारख्या बोलण्याची दैनंदिनी स्वीकारलेल्यांना आदर्श वस्तुपाठ वाटावा असे परफॉर्मर पु.ल..

संगीत, नाटक, चित्रपट, साहित्य अशा ललितकलांच्या सर्व क्षेत्रात मुक्त संचार करत 'नामा-तुका' इतकीच महाराष्ट्राच्या लोकमानसांवर त्यांची खोल मुद्रा उमटली. पु.ल. भरड्या खादीच्या नेहरुशर्टची बाही सरसावत, 'तुम्हाला सांगतो', म्हणत. त्यांनी केलेलं भाषण कम श्रोत्यांशी केलेला संवाद असो, पँन्टबुटाकोटातल्या पुलंच्या कोचावर शेजारी बसलेल्यांशी चाललेल्या गप्पा असोत किंवा एनसीपीएत ते भावसंगीतांचा प्रवास मांडत असोत, शब्दमांडणीत समोरच्याशी सहज गप्पा मारल्यासारखी सहजता असे.

तुम्हाला सांगतो म्हणत पाण्याचं भांड पुलंनी तोंडाला लावलं की, रंगमंचाच्या समोरच्या साऱ्या श्रोतृवृंदाच्या चेहऱ्यावर हास्याची लकेर उमटत असे. पाणी पिल्यानंतरचे वाक्य जस हुकमी टाळीच आहे, याची पुलंना खात्री असे. तसं त्याला दाद द्यायला सज्ज व्हावं, हे श्रोत्यांना समजत असे. पाणी पिण्यासाठी घेतलेला पॉझही, पुढच्या वाक्याची उंची वाढवे. पॉझ आणि विषय कुठे थांबवायचा, याच अचूक भान परफॉर्मर पुलंना होता. हे टायमिंगचं भान जसं शब्दफेकीमध्ये होतं तसं आणीबाणीनंतरच्या प्रचारसभांतून कधी बाहेर पडायचं हे ठरवण्यामध्येही होतं.

चष्मा असूनही, ढीगभर पुस्तक लिहूनही ते कधी समीक्षक वाटले नाहीत. उलट त्या चष्म्याआडून रोखलेल्या खट्याळ डोळ्यांतून आमच्याच अवतीभोवती बघत आमच्यासारख्या इतरांच्या खोड्या काढत आमच्यासारख्या प्रतिक्रिया त्यांच्या मनात उमटत. फक्त प्रतिक्रिया मांडतांना खास पु.ल. पद्धतीचा झोका ते वाक्याला देत.

उदा. पुण्याच्या बालगंधर्व रंगमदिराचा माहीत असलेला परिसर. ओंकारेश्वर मंदिरापासून ते झाशीच्या राणीपर्यंत पसरलेला. याच गंधर्व रंगमदिराच्या उद्घाटन सोहळ्यानिमित्त जेव्हा पु.ल. बोलायला उभे राहिले, तेव्हा ते या परिसर आणि वास्तूबद्दल कसे बोलले पाहा. 'एखादी वास्तू कुठे उभी राहते याला फार महत्त्व आहे. गंमत बघा, इथे बाहेरच्या बाजूला पुरुषाच्या वेशातील स्त्री आहे, झाशीची राणी आणि आतल्या बाजूला स्त्रीच्या वेशातला पुरुष आहे, गंधर्व. अर्धनारी नटेश्वराची दोन रूपं ज्या वास्तूत आहेत तिथं हे रंगमंदिर उभारलं जातंय. अलीकडे नटेश्वर आहे. पलीकडे ओंकारेश्वर आहे. मधून

पुलंची म्हैस

कोकणातल्या एसटीत आपणही हेंदकाळलेलो असतो पण म्हशीची चित्तरकथा फक्त पुलंनाच सुचली. बर्वेला अंतू बर्वा उच्चारून वाचकाला क्षणात कोकणात घेऊन जातात. नारायणच्या धावपळीतून अवघं मंगलकार्यच डोळ्यासमोर उभं करता करता खरकट्या हातानं अर्धवट लाडू खाऊन एकटाच पेंगुळलेला नारायण दाखवून पोटात खड्डाही आणतात. गंमत साधताना कधी कुणाचा अवमान नाही उगाच आक्रस्ताळी विधानं नाहीत. चारजण भोवती असावेत गप्पा माराव्या सगळ्यांचा वेळ आनंदात जावा ही भावना सतत पुलंच्या मनात असे. वेळ कसा गेला हे कळलेच नाही, असे साऱ्यांना वाटावं ही अंतरीची इच्छा. अर्थात त्यांच्या खूप अंतरी शिरावं इतपत माझं वय नव्हतं. सुरुवातीला दुरून ऐकत गेलो, माध्यमात काम करायला लागल्यानंतर, प्रत्यक्ष पत्रकारिता सोडल्यानंतर बऱ्याचदा पुलंशी गप्पा मारण्याचा योग आला.

जीवनाची सरिता वाहते. त्यावर पूल टाकलाय. माझी महापौरांना विनंती आहे. की हा पूल एकतर्फी असू द्या, ओंकारेश्वराकडून नटेश्वराकडे येणारा असावा.' आपल्या हे कसं लक्षात आलं नाही, हे जाणवून सामूहिक सहज आश्चर्योद्गार निघतो आणि टाळ्या पडतात. उस्फूर्त शब्दांचे फुटाणे तर पु.ल. क्षणोक्षणी फोडत. १९८३ च्या फेब्रुवारीत अहमदनगरला आम्ही काळे आर्किटेक्चरच्या घरी बसलो होतो. तिथे पु.ल. होते. जेवणात मासे पाहून खूश झाले. पण माशांचा आग्रह होऊ लागताच म्हणाले की, अहो रात्री मर्ढेकर प्रोग्रॅम आहे. रात्री चित्रकला प्रदर्शन होते. पु.ल. आणि बासू भट्टाचार्य पाहुणे होते. उद्घाटन सोहळ्यात आयोजक सडवेलकर म्हणाले की, आज प्रदर्शन चित्रकलेचं आहे. पण उद्घाटक आहेत, एक पुल नाटकवाले आणि दुसरे बासुदा सिनेमावाले. दोघांनी कधी हातात ब्रश धरलेला नसेल; यावर पु.ल. पटकन प्रेक्षकांकडे पाहत, गालावर दाढी करत असल्याची ॲक्शन करत म्हणाले, 'रोज धरतो की.' यावर हशा पिकला आणि अकारण वाटेला गेलेल्या सडवेलकरांचा चेहरा पडला.

मॉरिशसच्या एअरपोर्टवर ड्युटी फ्री शॉपमध्ये एक पैशाचं सुंदर लेदरचं पाकीट काचेआड लटकताना पुलंनी पाहिले. त्यांना ते आवडले किंमत विचारली. किंमत ऐकल्यावर म्हणाले, 'पाकिटाला ऐवढे पैसे दिल्यावर पाकिटात काय ठेवू?'

अतिशुद्ध भाषेची खिल्ली उडवताना पु.ल. सांगतात की, महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाच्या स्वयंचलित वाहनाने मी आलो. असं कुणी म्हणणार नाही. एसटीने आलो असं सांगणार. पूर्वी तर बशीतंन आलो असंच म्हणत. चाळीतल्या उपासांबाबत लिहिताना पटदिशी लिहून जातात की, उपोषणाच्या चौकशीला आलेल्यांनीच माझ्या खिशातले पिवळे हत्ती संपवले. आजच्या शिक्षण पद्धतीचा विचार करताना कसलाही आव न आणता बिगरी ते मॅट्रिकमध्ये शिक्षण क्षेत्रातील भंपकपणावर अतिव्यावसायिकतेवर ते नेमकं भाष्य करत. सिनेमातल्या त्यांच्या संवादातही सहजता होती. उदा. 'देवबाप्पा'मध्ये आईच्या डोळ्यातलं पाणी पाहून चंदाराणी विचारते, 'आई भूक लागली का गं तुला?'

डेक्कन क्वीनमध्ये मुंबईहून परतताना खूपदा भेटत, गप्पा होत. एकदा 'सूर संगीत' असा विषय निघाला, म्हणाले, 'पूर्वी मी भीमसेनबरोबर खूप भटकायचो. तो गाणार, मी अध्यक्ष लोकांना वाटायचं, मी त्यांच्या गाण्यांच्या माध्यमातून काही घेतो की काय? एकदा आम्ही कलकत्यात होतो. तिथे गाद्यांनी सजवलेले टांगे त्या वेळी खूप असत, आम्ही टांग्यात बसलो. टांगा सुरू झाला. गतीबरोबर गाणाऱ्याला गाण सुचतंच. आम्ही दोघे परस्पर ताना घेऊ लागलो. मध्येच एका वळणावर टांगा जरासा थांबल्यावर आमच्या ताना थांबल्या. तसा तो टांगेवाला मागे वळून आम्हाला म्हणाला, 'अरे साब पुरीया धनश्री अच्छा चल रहा था, क्यो ठहरे?' आम्ही दचकलोच. संगीततज्ज्ञांनाही चटकन ओळखता न येणारा राग त्या टांगेवाल्याने ओळखला होता. आमचे आश्चर्ययुक्त चेहरे पाहून तो टांगेवाला म्हणाला, 'आपने तो खाँसाब की महफील सुनी होगी, मैंने तो उनका रियाज सुना है' कोण कशात हुशार असेल हे सांगता येत नाही. तेव्हा शेरेबाजी करू नये हेच खरं.

एकदा वाटवे, जोत्स्नाबाई, मालती पांडे, नावाडीकर अशा साऱ्यांचा आणि त्यांच्या भावगीतांचा विषय निघाला. म्हणाले ती सगळीच गाणी विलक्षण होती. वाटव्यांच्या गणपतीतल्या मैफलीत वाटव्यांसमोर संतरजीवर बसलेले श्रोते वाटव्यांबरोबर त्यांची गाणी म्हणत. इतकी साऱ्यांना भावगीतं पाठ होती. ते नावाडीकरांचं कुठलं? रानात सांग कानात, मस्त चाल, आवडायचे पण एक शंका यायची मनात काय? आम्ही उत्सुक, वाटायचं गाणं छान पण एवढ्या मोठ्या रानात अगदी कानात जाऊन कशाला सांगायला पाहिजे?

हा अंगभूत खट्याळपणा सतत असे. मॉरिशसच्या परिषदेत मी माणिक वर्मांना जेव्हां विचारलं की, माणिक दादरकरची माणिक वर्मा होताना तुम्हाला तुमचं कुठलं भावगीत उपयोगी पडलं? तशी शेजारीच उभे असलेले पु.ल. मला म्हणाले, 'अरे तिच्या वर्मावर कशाला घाला घालतोस? त्यावर मी कोण घाला घालणार त्यांचा वर्मा, अमर आहे.' असं म्हटल्यावर मला भरभरून दादही दिली.

बहुरूपी

तमाशातला सोंगाड्या, खेड्यातलं भजनीमंडळ, रघुतमा रामा म्हणणारे 'कीर्तनकार' ही सामान्यांशी संवाद साधणारी मंडळी पुलंच्या विशेष आवडीची होती. हे गप्पात कळल्यावर पु.ल. अधिकच जवळचे वाटत. चाळीतले कुशाभाऊ, सोकाजी नाना, एच.मंगेश राव काय म्हैसमधला सुबक ठेवणीकडे बघणारा काय किंवा पंचनाम्याचा पोलीस काय असंख्य नमुन्यांची माणसं पुलंमधला परफॉर्मर जेव्हा नादातल्या वैविध्यासह बसण्याउठण्याच्या विशिष्ट पोश्चरसह सादर करत असे, तेव्हा पुलंच्या लिखाणातल्या सूक्ष्म निरीक्षणाला दाद द्यावी की, आवाजाचे बहुविध पोत दाखवणाऱ्या बहुरूप्याला कशी दाद द्यावी, हे

समजेनासे होत असे. सिनेमाचा विषय एकदा निघाला. मी आणि सुनीता दोघे प्रथम नायक-नायिका झालो. ''वंदे मातरम' या सिनेमात याचे निर्माते होते लोणावळ्याचे स्वामी विज्ञानानंद म्हणजे पु. रा. भिडे.' त्याच मैफलीत पलीकडे बसलेल्या सुनीताबाईंना मी विचारलं होत की, सुनीताबाई तुम्हाला भाईंनी लिहिलेली कुठली व्यक्तिरेखा सर्वात आवडली. त्या म्हणाल्या खानोलकर आणि बेगम अख्तर. खुद्द पुलंना गाणं, गायक या गप्पा मारायला जास्त आवडत असे. असे एकदा १९८८ च्या सप्टेंबरमध्ये गप्पात म्हणाले, सूर, नाद याचा सगळ्यांना नाद असतो. पंढरपूरच्या वारीतून टाळ, मृदुंग, वीणा, काढा, बघा माणसं यात्रेत उरतील का? तालात, लयीत माणसे हजारो मैल चालतात. सुरांच्या प्रेमाने माणसं जितकी बांधली जातात तितकी अन्य कशानेही नाही. त्यामुळे पु.ल. कधी वसंतराव देशपांडेबरोबर तबल्याचा ठेका धरत, कधी गोविंदराव पटवर्धनांसारख्या पेटीवादकाबरोबर हर्मोनियमची जुगलबंदी करत. कधी भीमसेनजींबरोबर साथीला बसत. त्यांनी अनेक मैफली सुरेल केलेल्या आहेत. स्वत: आनंद घेताघेता आपल्याला आनंद दिला आहे. ललितकलांच्या विविध माध्यमातला त्यांचा प्रवास त्यांच्या तोंडून ऐकण्याचं भाग्य मला मिळाले. मुलाखत या विषयावरही माझ्याशी बोलले होते. दिल्ली दूरदर्शनचे नमनाचे निर्माते, बी.बी. सीला घेतलेले प्रशिक्षण, नेहरूंची छोट्या मुलांकडून घेतलेली मुलाखत सविस्तर सांगितलेली होती. म्हणाले, 'कधी थेट प्रश्न नसावेत. ज्याची मुलाखत घ्यायची तो व्हिक्टिम करा. नेहरूंची मुलाखत घेणाऱ्या छोट्याछोट्या पोरांपैकी एकाला मी सांगितलं होत की, गप्पात मधेच पंडितजींच्या कोटावरचं लाल गुलाबाचं फूल खेच त्यानं तसं केलं आणि मुलं प्रिय असलेले पंडितजी पोरांवर चिडले.'

लव्हेबल कॉमनमॅन

पु.ल.देशपांडे यांना रंगमंचावर किंवा पडद्यावर पाहताना जाणवलेली गोष्ट म्हणजे त्यांचा पोशाखही तुमच्याआमच्यासारखा साधा ढगळ नेहरुशर्ट किंवा चौकटीचा बुशकोट. वरातीत पेटी वाजवायला बसले की, रुमाल डोक्यावर बांधलेला. वाद्यं अस्ताव्यस्त पसरलेली. पेटीच्या सुरातून मात्र क्षणात गंधर्व काळात घेऊन जात. सामान्यांसारखा पोशाख सामान्यांच्या मनात उमटतील अशा प्रतिक्रिया. भंपक राजकारणावर टोलेबाजी हे सारं करताना मिश्कीलपणा न सोडलेला, त्यामुळे पु.ल. मला तरी आर.के.लक्ष्मणांनी चितारलेले लव्हेबल कॉमनमॅनच वाटतात. हा कॉमनमॅन स्वत:च्या लेखणी वाणीतून जमा केलेले कोटभर रुपये सामाजिक संस्थांना वाटून टाकतो. तेव्हा तर या मिश्कील परफॉर्मरबद्दलचा आदर अधिकच वाढतो.

सुंदर योग

एकदा आर.के. लक्ष्मण यांचा विषय निघाला पु.ल. म्हणाले, माझा आवडता व्यंगचित्रकार. माझ्या साठीला, त्यानं माझ स्केच काढून पुना क्लबवर मला दिलं. स्केचच्या बाजूला कॉमनमॅन विचारतोय, 'हू दि हेल सेड दॅट यू आर सिक्स्टी?' आर.के.चं मला आवडलेलं चित्र, विमानतळावर इंदिराजी उतरताना खूप कार्यकर्ते, गर्दी. त्या गर्दीतल्या एकाला त्या म्हणतात, 'यू आर द नेक्स्ट चिफ मिनिस्टर, व्हॉट्स युवर नेम?' त्याचं कॉमन मॅनचं प्लेसिंग फार परफेक्ट असतं. टॉप नाटकांचा दिग्दर्शक काय करेल असे कंपोजिशन एकेका व्यक्तीच्या नावावर सुचणारी पुलंची टिप्पणी म्हणजे हुशारीने खट्याळपणाचा शब्दातून साधलेला सुंदर योग असे. उदा. किशोरी अमोणकर. नाव किशोरी, पण गाणं प्रौढ आहे. शरद तळवलकर हा सरळ साधा माणूस आहे. नावच बघा काना, मात्रा, वेलांटी, पूज्यही नसलेलं सरळ नाव. दुर्गा खोटे- नावाखेरीज सार अस्सल. कुसुमाग्रज माझा कुंडली-नक्षत्रावर विश्वास नाही पण माझं तारुण्य जन्माला आल ते कुसुमाग्रजांनी मराठी साहित्याच्या आकाशात सोडलेल्या विशाखा नक्षत्रावर.

पुणे हा त्यांचा आनंदाचा आणि चेष्टेचाही विषय असे पण पार्ल्यापाठोपाठ पुण्यावर अतोनात प्रेम म्हणून तर निवृत्तीला पुण्यातच स्थिरावले. ते म्हणत मुंबईच्या लोकलमध्ये जेव्हा गर्दी नसायची तेव्हा पुण्यातला माणूस लोकलमध्ये चढला की, आम्हाला कळायचं कारण त्याचा आवाज आगगाडीच्या आवाजापेक्षा मोठा. कुणाला तरी पटवून देणं चाललेलं आणि ऐकताना अहो काय सांगताय? हा चेहऱ्यावर अविर्भाव. कलावंत म्हणून सांगतो, सगळ्याच कलावंतांना आस असते. पुण्याची टाळी मिळावी कारण, हे शहर जिथं सामान्य माणसाचं अंत:करण आणि विद्वानाची पगडी एकदम हलते, हे समाधान अन्यत्र मिळणार नाही. याच पुण्यात पुलंनी आणीबाणी काळात 'संजय उवाच' हे नवमहाभारत मांडून मानवी मूल्यांची राखणदारी केली. स्वत्वाचं भान आणलं आणि विजयानंतर प्रासंगिक गणवेश उतरवून एस.पी.कॉलेजवरच्या विजयी सभेला हजर न राहता पुन्हा एकदा नित्याप्रमाणे जगाला हसवण्यासाठी मस्तकावर विदूषकाची टोपी चढवली.

हजरजबाबी शब्दांतून कोट्यांमधून वटवट, वरात, फुलराणी, गुळाचा गणपती अशा विविध माध्यमांतून आम्हाला समृद्ध करीत गेले. हसवत हसवत ताजेतवाने ठेवले कारण पु.ल. म्हणत जन्म आणि मृत्यू या टोकामध्ये पकडून नियतीने चालवलेली आपणा साऱ्यांची फसवणूक, एकदा लक्षात आली की; त्यातून सुटायला, आपली आणि आपुलकीने भोवताली जमणाऱ्या माणसांची हसवणूक करण्यापलीकडे आपल्या हाती काय उरते.

या वर्षी गदिमा, बाबूजी आणि पु.ल. यांची जन्मशताब्दी असल्यामुळे एक आनंदाची आणि चांगली गोष्ट घडतेय की, अनेक कार्यक्रमांत या तिघांची गाणी गाता येतायत. त्यानिमित्ताने या तीनही दिग्गज व्यक्तिमत्त्वांबद्दल बोललं जातंय, लिहिलं जातंय आणि कार्यक्रमांच्या माध्यमातून नव्या पिढीपर्यंत त्याचं कामही पोहोचवलं जातंय. या तिघांची प्रतिमा हिमालयाएवढी होती.

मी बघितला 'हिमालय'

रवींद्र साठे

माझं भाग्य आहे की, मला गदिमा, बाबूजी व पु.ल. या तीनही दिग्गजांना भेटता आलं. त्यांच्याबरोबर काम करता आलं. बाबूजी तर माझ्या गाण्याचे प्रेरणास्थान आहेत. मी अगदी लहान होतो. ९/१० वर्षांचा असेन. एकदा मी सहजच, माझ्याही नकळत बाबूजींचं 'तोच चंद्रमा नभात', हे गाणं गुणगुणत होतो. घरात माझ्या वडिलांनी ते ऐकलं आणि त्यांच्या असं लक्षात आलं की, मला संगीताची जाण आहे. उपजत काही गोष्टी असाव्या लागतात. तसं उपजत मला स्वरज्ञान आहे हे लक्षात आल्यामुळे वडिलांनी मला गाण्याच्या क्लासला घातलं. म्हणजे बाबूजींच्या, 'तोच चंद्रमा नभात'ने माझ्या आयुष्यातला संगीताचा चंद्र उगवला होता. त्यामुळे माझ्याही नकळत बाबूजींची आणि माझी पहिली भेट अशी सुरांतून झाली.

ही गोष्ट पुण्यातली आहे. साधारण १९६० सालातली. तसं पाहायला गेलं तर माझ्या दोन्ही भावांनीही त्याच वेळी तबला शिकायला सुरुवात केली होती पण काही दिवसातच त्यांचं तबला शिक्षण थांबलं. पण माझं गाणं मात्र चालू राहिलं. बाबूजींच्या गाण्याचा तो प्रभाव होता आणि त्या सुरांचा परिणाम इतका खोलवर रुजला होता, की त्यामुळेच कदाचित माझं गाणं नियतीने मला आखून दिलं होतं की काय असं वाटतंय. एकापरीने बाबूजींच्या गाण्यानेच मला माझ्या गाण्याची वाट दाखवली आणि मग मी ती पुढे नेली. ५वी ते १० वीपर्यंत मी शास्त्रीय संगीताचे धडे घेतले मुकुंदराव गोखलेंकडे. संगीताचं हे शिक्षण, शाळेत प्रार्थना म्हणायची आणि पुण्यातल्या सगळ्या संगीत मैफली, संगीत नाटकंही वडिलांबरोबर पाहायची, अनुभवायची असं चालू होतं. वडिलांना संगीताचा उत्तम कान होता त्यामुळे घरात मैफली जमायच्या. माझा आतेभाऊ राम मराठेंचा शिष्य होता, तो गायला बसला की वडील हार्मोनियम वाजवायचे. वडिलांनी गाण्याचे संस्कार केले. कुमारगंधर्व, किशोरी आमोणकर, पं.जितेंद्र अभिषेकी, छोटा गंधर्व या सगळ्यांना मी वडिलांबरोबर ऐकलेलं आहे. वडील माझे आकाशवाणीवर निवेदक होते. त्यामुळे सगळ्यांशी ओळखी होत्या, उत्तम गाणं कसं ऐकायचं तेही त्यांनी शिकवलं ज्याची सुरुवात बाबूजींच्या गाण्याने झाली.

ध्वनिमुद्रण

नंतर मग मी घाशीराम कोतवालमध्ये काम केलं, फिल्म इन्स्टिट्यूटमधून साऊंड रेकॉर्डिंगचा कोर्स केला आणि त्यानंतर मुंबईत आलो. त्यादरम्यान बाबूजींचा मुलगा श्रीधर, त्याची आणि माझी भेट झाली. त्या वेळी श्रीधर फडके, आनंद मोडक, सुधीर फडके, श्रीकांत पारगावकर. आम्ही सगळे एकत्र होतो. त्या वेळी श्रीधरमुळे आमचं बाबूजींच्या घरी येणं जाणं व्हायचं. पं. यशवंत देव यांच्या कार्यक्रमात मी गात असे. त्यांच्यासमोरच बाबूजी राहायचे. त्यामुळे बाबूजींच्या घरी गेलं की गप्पांचा फड रंगायचा. अरुण काकतकरांनी 'अमृताच्या वेली अमृताची फळे', हा श्रीधरचा पहिला कार्यक्रम दूरदर्शनवर केला होता. त्यात एक गाणं मी म्हटलं होतं आणि ती सगळी गाणी मी रेकॉर्ड केली होती. त्यामुळे त्यादरम्यान बाबूजींच्या घरी खूप वेळा जाणं व्हायचं. त्या वेळी सुधीर मोघे,

अजित सोमण ही सगळी मंडळी बाबूजींच्या घरी राहायची.

गदिमानंतर सुधीर मोघेंनी खूप काम केलं बाबूजींसोबत. अलूरकरांच्या भावगीतांच्या २ कॅसेट्स निघाल्या त्या वेळी त्यात अनेक गायक गायले त्यात मीही गायलो होतो.

त्यानंतर १९७४-७५ साली बाबूजी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष होते तेव्हा इमारत फंडासाठी कार्यक्रम केले किंवा सावरकर चित्रपटासाठी मदतनिधी गोळा करताना जे कार्यक्रम त्यांनी केली त्यात मी गायलो आहे. त्यानिमिताने बाबूजींशी पुन्हापुन्हा भेट व्हायची.

त्यानंतर मी दूरदर्शनवर साऊंड इंजिनियरची नोकरी करत होतो. त्या वेळची गोष्ट आहे. सुहासिनी मुळगावकारांना संगीतावर आधारित काही कार्यक्रम करायचे होते तेव्हा त्यांनी अष्टनायिकांचा कार्यक्रम केला होता त्यात मी दोन गाणी गायलो होतो. तसंच बाबूजींनी दोन गाणी म्हंटली होती, त्या वेळी त्यांनी एक अट घातली होती की दूरदर्शनवर चांगलं रेकॉर्डिंग होत नाही तेव्हा माझी गाणी मी बाहेरून रेकॉर्ड करून आणेन. बाबूजींची ही अट मान्य झाली होती आणि उरलेली गाणी मी दूरदर्शनमध्ये रेकॉर्ड केली. खरंतर तेव्हा एकाच मोठ्या स्टुडिओमध्ये रेकॉर्डिंग केलं जायचं. साऊंड रेकॉर्डिंगची वेगळी केबिनदेखील नसायची तिथेच हेडफोन लाऊन मी मॉनिटर करत असे. फारशा सुविधा नसताना मी ती सगळी गाणी तिथे रेकॉर्ड केली. जेव्हा बाबूजी त्यांची गाणी घेऊन स्टुडिओत आले आणि त्याचं लिपसिंक करून शूटिंग सुरू झाले तेव्हा त्यांनी दूरदर्शनच्या स्टुडिओत रेकॉर्ड झालेली इतर गाणी ऐकली. त्यांना ती आवडली आणि त्यांनी विचारलंही की, ही गाणी कुणी रेकॉर्ड केली. इथे इतकं उत्तम रेकॉर्डिंग होऊ शकतं हे मला माहिती असतं तर मी गाणी बाहेरून रेकॉर्ड करून आणलीच नसती. मग त्यांची ती २ गाणीही दूरदर्शनमध्ये पुन्हा रेकॉर्ड झाली. ती त्यांना पसंत पडली आणि त्यांनी माझी पाठ थोपटली. साऊंड इंजीनिअर म्हणून बाबूजींनी दिलेली ती पहिली पावती होती.

पुढेही त्यांनी माझं हे काम पाहिलं. डॉ. जब्बार पटेल यांच्यासाठी मी काम करीत असे. किंवा श्रीधरच्या गाण्यांच्या काही कॅसेट्स निघाल्या त्याचं फायनल मिक्सिंग मी करत असे. ती गाणी त्यांनी ऐकली होती. राम फाटकांनी एक उपनिषदांवर कॅसेट केली होती. त्यात मी गायलो होतो. राम फाटकांनी खास आग्रह केला म्हणून बाबूजींनी एक श्लोक त्यात म्हटलाय. राम फाटक आणि बाबूजी घट्ट मित्र होते. एकत्र काम करायचे आणि तेवढ्याच अधिकाराने एकमेकांशी भांडायचेही. बाबूजींच्या बाबतीतल्या अशा कितीतरी घटनांचा मी साक्षीदार आहे. याचं मला समाधान आहे.

एवढंच नाही तर आम्ही सगळे म्हणजे त्या वेळी सुधीर मोघे, अजित सोमण, उत्तरा केळकर, रंजना जोगळेकर, श्रीकांत पारगावकर, श्रीधर आम्ही सगळे आमच्या कुटुंबीयांसोबत लोणावळ्याला एअर इंडियाच्या गेस्ट हाऊसमध्ये जायचो. बाबूजी असायचे, कधी कधी राम फाटक असायचे. मग आम्ही दिवस दिवस गाण्यावर गप्पा मारायचो. बालाजी तांबेंच्या आश्रमात जायचो. ते दिवस आमच्यासाठी अगदी मंतरलेले होते. त्यातूनच आमच्यात वेगळी आपुलकी, जवळीक निर्माण झाली.

त्यानंतर आणखी एक खूप मोठी गोष्ट घडली. कमलाकर तोरणेंचा 'आराम हराम आहे' हा चित्रपट तयार झाला होता. यातली गाणी गदिमांनी लिहिली होती आणि बाबूजी गाणार होते. एका गाण्याच्या रेकॉर्डिंगच्या वेळी बाबूजींचा मला फोन आला, की आमच्या बिल्डिंगचं प्लॅस्टरिंगचं काम चाललंय आणि त्या धुळीमुळे माझा आवाज बसलाय तर रेकॉर्डिंगच्या दिवसापर्यंत माझा आवाज बरा झाला तर ते गाणं मी गाईन नाहीतर तुम्ही गा. तर तुम्हांला असं चालेल का. खरतरं बाबूजींनी हे विचारलं. याचं मला अप्रूप वाटलं. मी त्यांना म्हटलं की, अहो, चालेल का असं का विचारताय त्यानिमित्ताने मला तुमच्याकडून एक गाणं शिकायला मिळेल. मग मी त्यांच्या घरी गेलो ते गाणं शिकून

बाबूजींकडे बरेचदा रिहर्सल व्हायची. मग त्या वेळी आम्ही त्यांचीच हार्मोनियम वापरायचो. या हार्मोनियमचीही एक छान गोष्ट आहे. त्या वेळी सहज बोलता बोलता मी म्हणालो की, मला एक हार्मोनियम घ्यायची आहे, तर बाबूजींनी मला विचारलं की तुम्हांला खरंच हवी आहे का हार्मो नियम तर मी हो म्हंटलं. त्यावर बाबूजींनी स्वत: तयार करून घेतलेली हार्मोनियम मला देऊन टाकली. त्याचं झालं होतं असं की, बाबूजी जी वापरायचे तशी खर्जनर असलेली हार्मोनियम अमेरिकेतल्या एका माणसाला हवी होती. बाबूजींनी ती करून घेतली आणि नंतर त्यांचा फोन आला की त्याला हार्मोनियम नकोय. तर बाबूजींनी मला विचारलं की, तुम्ही वाजवून बघा, तुम्हाला आवडली तर

तुम्ही घेऊन जा. खरंतरं माझ्यासाठी हा अनोखा योग होता. बाबूजींनी स्वत: बनवून घेतलेली ती हार्मोनियम आजही माझ्याकडे आहे. अर्थात स्वत: हार्मोनियम वाजवून गाण्याचं माझं स्वप्न, स्वप्नच राहिलंय. तो योग कधी येईल ते ठाऊक नाही पण माझ्याकडे कोणी संगीतकार आले आणि गाणं शिकवण्याची वेळ आली तर बाबूजींची हार्मोनियम काढून मी गाणं शिकवतो.

बाबूजी स्वत: हार्मोनियम वाजवून गायचे तसं मलाही गायचंय. अशा प्रकारे श्रीधर, सुरेश वाडकर किंवा गुलाम आली, मुकेश, मन्नाडे, हृदयनाथ मंगेशकर पेटी घेऊन वाजवायचे. त्यांना छान सुरांची साथ मिळते. तसं मलाही गायचंय.

घेतलं परत दोन दिवसांनी त्यांचा मला फोन आला की माझा आवाज काही बरा नाहीये तर हे गाणं तुम्हीच गा. बॉम्बे लॅबला रेकॉर्डिंग आहे तर तुम्ही याल का. मग मी दुसऱ्या दिवशी तिथे गेलो तर आशाबाई तिथे होत्या. ते ड्युएट होतं आणि मला ते गाणं आशाबाईंबरोबर गायचं होतं. आशाबाईंना याची कल्पना नव्हती. ही ४३ वर्षापूर्वीची गोष्ट. त्यांना वाटलं बाबूजी नाही तर हा कोण नवीन मुलगा गातोय तर बाबूजींनी माझी ओळख करून दिली आणि सांगितलं हे रवींद्र साठे उत्तम गातात. मग रेकॉर्डिंग सुरू झालं. ६ ते ७ टेक झाले पण गाणं काही फायनल होईना. मग आशाबाईंनी मला एक टीप दिली त्या म्हणाल्या की, गाणं म्हणताना तुम्ही बाबूजींना डोळ्यासमोर ठेवा म्हणजे गाणं परफेक्ट होईल तसंच झालं आणि 'आराम हराम आहे' या चित्रपटातलं 'जाशील कोठे मुली तू', हे गाणं माझ्या नावावर जमा झालं. त्यानंतरही बाबूंजीसाठी गाण्याचा योग जुळून आला. सुधीर मोघेंनी लिहिलेलं १२ ज्योतिर्लिंगाचं गाणे गायलो. एक मात्र खरं की, बाबूजींबरोबर साऊंड रेकॉर्डिस्ट म्हणून जास्त काम केलं. पुण्यात तळजाईला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे एक अधिवेशन होतं. जवळजवळ ३० ते ४० हजार स्वयंसेवक तिथे आले होते आणि त्यांनी काही संघगीते कोरसमध्ये म्हटली पण ती जागा जी होती ती तीन टेकड्यांमध्ये होती. त्यामुळे तिथे एवढा एको येत होता की, तो कार्यक्रम झाला पण ती गाणी चांगली रेकॉर्ड झाली नाहीत. मग अशा परिस्थितीत बाबूजींनी मला बोलवलं आणि काय करता येईल ते विचारलं. पुन्हा ३० ते ४० हजार स्वयंसेवक तर येऊ शकणार नाहीत तेव्हा मी त्यांना सांगितलं होतं की, ३००/४०० स्वयंसेवक आले

रेकॉर्डिंगच्या एका क्षणी गदिमा, सुधीर फडके आदी

तरी पुरतील. मग मी प्रोफेशनल रेकॉर्डर घेऊन पुण्यात गेलो. नूमवी शाळेत मधे चौक आहे त्या चौकात ३०० स्वयंसेवकांसह बाबूजी गायले. या गाण्याचं मी रेकॉर्डिंग करून दिलं. जे ३० ते ४० हजार स्वयंसेवकांनी गायलंय असं वाटावं असं रेकॉर्डिंग झालंय ही पावती बाबूजींनी दिली. बाबूजींच्या लघुपटात हे मी रेकॉर्ड केलेलं गाणं आहे.

पाऊलखुणा

१९८५ साली २५ वर्षाच्या प्रवासात 'महाराष्ट्राच्या पाऊलखुणा' हा जब्बार पटेलांचा एक लघुपट होता. जो महाराष्ट्र शासनासाठी तयार केला होता. त्यात लतादीदी, पु.ल. अशा अनेक दिग्गजांना रेकॉर्ड केलं, त्यात बाबूजींनाही केलं म्हणजे 'नक्षत्रांचे देणे'मध्ये, 'स्वयेश्री राम प्रभू हे गाणं बाबूजी गाताना दिसतात ते मी रेकॉर्ड केलेलं आहे. १९७७ साली जेव्हा जनता सरकार आलं त्या वेळी उत्तर प्रदेशात बाबूजी जवळजवळ २५ नामवंत गायकांना घेऊन गेले होते. त्यांनी जे गाणं तिथे सादर केलं ते इथे आकाशवाणी मुंबईवर रेकॉर्ड करायचं ठरलं. मग ते रेकॉर्ड केलं पण ते बाबूजींना आवडलं नाही मग त्यांचा मला फोन आला आणि मला ते म्हणाले की, माझ्यासाठी सगळे गायक, वादक पुन्हा यायला तयार आहेत. मी सगळ्यांना शब्द दिलाय तर रेकॉर्डिंग चांगलं व्हावं यासाठी तुम्ही आलात तर बरं होईल मग मी गेलो होतो आकाशवाणीवर, ते रेकॉर्डिंग बाबूजींना पसंत पडले. त्यामुळे रेकॉर्डिस्ट म्हणून बाबूजींशी संबंध जास्त आलाच पण गायक म्हणून जेव्हा जेव्हा संबंध आला तेव्हा तेव्हा काहीतरी वेगळं गाणं घडलं.

दूरदर्शनवर असताना अमृतमंथनसाठी मी बरेच संस्कृत श्लोक गायलो होतो. त्या वेळी सुहासिनी मुळगावकरांनी घोटून घेतलं होतं. त्यामुळे माझ्या संस्कृत गाण्याचा इतरांनाच खूप आत्मविश्वास होता पण तरीही संस्कृत गाताना योग्य ती काळजी घ्यायला हवी. ती मी नेहमीच घेतो.

गदिमांच्या बाबतीत त्यांच्यासोबत काम केल्याच्या आठवणी नाहीत पण त्यांची एक जबरदस्त आठवण माझ्याकडे आहे जी कदाचित आणखी कुणाकडेच नसेल. मुंबई आकाशवाणी केंद्रावर जसा गंमतजंमत हा कार्यक्रम होतो तसा पुणे आकाशवाणीवर बालोद्यान नावाचा कार्यक्रम होता. गोपीनाथ तळवलकर – नाना ही व्यक्तिरेखा करत. नेमिनाथ उपाध्ये– हरबा करत असत आणि ताई म्हणजे सई परांजपेदेखील त्यात होत्या. बालोद्यानाला १५ वर्षे झाल्याप्रीत्यर्थ लहान मुलांचा विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम होता. मी लहानपणी बालोद्यानाच्या कार्यक्रमात गायलो होतो म्हणून मला बोलावले होते. तळवलकर, सई परांजपे, उपाध्ये यांनी या कार्यक्रमाच्या आठवणी सांगितल्या, गमतीजमती सांगितल्या. काही मुलांनीही आठवणी सांगितल्या या कार्यक्रमाचे अध्यक्ष होते, ग. दि. माडगूळकर. गदिमा प्रतिभावंत कवी तर होतेच पण त्यांचं शीघ्रकवित्वही तितकंच उत्तम होतं याचा अनुभव मला त्या दिवशी आला. कारण त्यांनी अध्यक्षीय भाषण म्हणून त्या संपूर्ण कार्यक्रमाचं सार असलेली एक दीर्घ कविता सादर केली आणि ती कविता त्यांनी तिथल्या तिथे लिहिली होती. त्यात संपूर्ण कार्यक्रमाविषयी लिहिलं होतं. ती कविता इतकी अप्रतिम लिहिली होती की त्यांच्या प्रतिभेने आम्ही सगळे अवाक झालो.

अलौकिक प्रतिमा

मुळातच बाबूजी, गदिमा किंवा पु.ल. या सगळ्यांचीच अलौकिक प्रतिभा आपल्याला खऱ्या अर्थाने समृद्ध करून गेली. मी खरंच भाग्यवान की, या तिघांचा सहवास मला मिळाला. पुलंच्या बाबतीतही

माझे ऋणानुबंध उत्तम जुळले. 'गुळाचा गणपती', या सबकुछ पु.ल. असलेल्या चित्रपटाचे कॅमेरामन अनंत देव हे माझ्या वडिलांचे अगदी सख्खे मित्र. आमचे अंतुकाका. माझी आणि पुलंची पहिली ओळख झाली ती अंतुकाकांच्या माध्यमातूनच. म्हणजे अंतुकाका नेहमीच पुलंविषयी भरभरून बोलायचे. शिवाय पुण्यात बालगंधर्वला पुलंचे 'असा मी असामी', 'हसवण्याचा धंदा', 'वाऱ्यावरची वरात' असे सगळे प्रयोग मी माझ्या वडिलांबरोबर पहिले आहेत. पुढे १९७८ साली त्यांच्या 'तीन पैशाचा तमाशा'मध्ये मी गात असे तेव्हा पुलंची आणि माझी प्रत्यक्ष भेट झाली. रिहर्सलला पु.ल. यायचे. सुनीताबाई त्यांच्या शिस्तीप्रमाणे कोण कुठे चुकलं, काय काय झालं हे सगळं डायरीत लिहून ठेवायच्या. तालीम संपली की सुनीताबाई सांगायच्या मग पुलंचे जे काही म्हणणं असायचं ते ते सांगायचे किंवा प्रसंगी नेमकं कसं हवंय ते पु.ल. करूनही दाखवायचे त्यामुळे पुलंना इथे जवळून अनुभवता आलं. त्यानंतर 'एक होता विदूषक' या चित्रपटाची कथा, पटकथा पुलंचीच होती. त्यातली गाणी मी म्हटली त्यामुळे तेव्हाही भेट व्हायची किंवा पु.ल. जेव्हा एनसीपीएत होते तेव्हा अनेकदा तिथे जाणं व्हायचं, गप्पा व्हायच्या. त्यामुळे पुलंच्याही अशा अनेक आठवणी आहेत.

'बटाट्याची चाळ'चं शूटिंग राम गबालेंनी त्या वेळी केलं. 'बटाट्याची चाळ'चे शेवटचे प्रयोग होते. त्यातला एक प्रयोग 'बिर्ला मातोश्रीला' होता. तेव्हा ३ कॅमेरा सेटअप लावून याचं फिल्म कॅमेरावर शूटिंग झालं. आता ज्याप्रमाणे ऑनलाइन एडिटिंग करतात ना तसं त्या वेळी काही नव्हतं म्हणजे तिन्ही कॅमेऱ्यांमध्ये कोऑर्डिनेशन काहीच नव्हतं, पण राम गबाले असल्यामुळे त्यांनी तीन कॅमेरे आणि तीन कॅमेरामॅन असा ताफा लावला होता. त्या शूटिंगला काही मर्यादाही होत्या. त्यांनी फक्त एवढं पाहिलं की, मिनिट टू मिनिट शूट होतंय ना आणि हे सगळं शुटिंग एका लॅबमध्ये पडून होतं. फिल्म आणि साऊंड निगेटिव्ह होती. पुलंच्या मेव्हण्यांनी ठाकुरांनी असं ठरवलं की ते शूट केलेलं पुन्हा लोकांसमोर आणावं तेव्हा त्या सगळ्याचं रिस्टॉरेशनचं काम मी केलं. त्यामुळे पुलंच्या बाबतीत ही साऊंडची कामं अनेक झाली.

आशीर्वाद मिळाला



गीतरामायणाला जेव्हा ३५ किंवा ४० वर्षे झाली तेव्हा राजा शिवाजी विद्यालयात दोन तीन वेगळ्या भाषेतून गीतरामायण सादर झालं. त्यात संस्कृत भाषेतली ३ गाणी गाण्यासाठी त्यांनी माझी निवड केली. ते संस्कृत भाषेतलं गाणं कसं वाटतंय ते ऐकण्यासाठी त्यांनी मला घरी बोलावलं. मग मी त्यांच्या घरी गेलो. 'पराधीन आहे जगती', हे गाणं त्यांना म्हणून दाखवलं. संस्कृत शब्द त्यांचे हर्स्वदीर्घ, उच्चार आणि बाबूजींची चाल त्यामुळे कागदावरून माझी नजरच हटली नव्हती. जेव्हा गाणं गाऊन पूर्ण झालं तेव्हा मी नजर वर केली तर बाबूजींच्या डोळ्यात पाणी होतं आणि ते उभे राहून माझं गाणं ऐकत होते आणि त्यांनी माझ्या आवाजाचं खूप कौतुक केलं. त्यांना खूपचं आवडलं होतं ते गाणं. मीही त्यांना वाकून नमस्कार केला कारण माझ्यासाठी त्यांचे आशीर्वाद खूप मोलाचे आणि महत्त्वाचे होते.

ऋणानुबंध

या तिघांचे ऋणानुबंध असे होतेचं पण पु.ल. आणि बाबूजी यांच्या माझ्या संबंधाताली एक खंतही आज यानिमित्ताने व्यक्त करावीशी वाटते. पु.ल. जेव्हा खूप आजारी होते तेव्हा आम्ही त्यांना भेटायला गेलो. माझ्या बरोबर अनुराधा मराठे होती आणि आमचे आणखी एक स्नेही होते. तेव्हा पु.ल. सहज बोलता बोलता मला म्हणाले की, एखादं गाणं म्हण. त्या वेळी काय झालं कुणास ठाऊक. माझ्याकडे शब्द नव्हते किंवा काहीतरी कारण झालं आणि मी तेव्हा गाणं म्हटलं नाही. अनुराधानेही गाणं म्हटलं. पण माझा मात्र तो क्षण निसटला. तिथून मी बाहेर पडलो आणि तेव्हापासून आजपर्यंत ती चुटपुट कायम लागून राहिली की, जेव्हा पु.ल. आजारी होते आणि त्यांनी मला गाणं म्हण असं सांगूनही मी गाणं म्हटलं नाही. तसचं बाबूजींच्या बाबतीतही एक खंत आहे, त्यांनी सावरकर फिल्म केली त्या वेळेची गोष्ट. या फिल्मच्या मुहूर्ताचा शॉट सावरकर स्मारकात झाला. त्या वेळी अनेक दिग्गज मंडळी तिथे उपस्थित होते. मीही त्यांना भेटायला गेलो होतो. मला भेटल्यावर बाबूजी म्हणाले की, तुमच्यासारखा उत्तम साऊंड रेकॉर्डिस्ट असताना माझ्या स्मरणातून तुमचं नावं निसटलं कसं. मग रात्री पुन्हा त्यांचा फोन आला की, या फिल्मचं साऊंड रेकॉर्डिस्टचं काम तुम्ही करावं अशी माझी इच्छा आहे. पण झालं होतं असं की, तोपर्यंत मी साऊंड रेकॉर्डिस्टचं काम बंद केलं होतं. जब्बार पटेल, विजया मेहता, पुरुषोत्तम बेर्डे या सगळ्यांची कामं मी करत होतो. त्यांना मी त्या वेळी सांगितलं होतं की, यापुढे साऊंड रेकॉर्डिस्ट म्हणून मी असणार नाही. अर्थात बाबूजी या सगळ्यांशी माझ्या वतीने बोलायला तयार होते पण मला ते योग्य वाटलं नाही आणि मी सावरकर फिल्मसाठी साऊंड रेकॉर्डिंगच्या कामासाठी बाबूजींना नकार दिला. याचीही चुटपुट कायम आहे. अर्थात याला आणखीही कारण आहे. माझे आजोबा म्हणजे माझ्या आईचे वडील हे सोलापूरचे हिंदू महासभेचे मुख्य. म्हणजे माझ्या आजोळी सावरकर ३/४ वेळा आलेले आहेत. माझे आजोबा, सावरकर आणि सेनापती बापट असा फोटोही आहे माझ्याकडे. म्हणजे सावरकरांशी माझ्या आजोबांचा इतका घरोबा होता की, ती फिल्म जर मी केली असती तर एक वेगळचं मानसिक समाधानही मला निश्चितच मिळालं असतं पण हाही क्षण माझ्या हातून निसटला आणि तो सल मात्र माझ्या मनात कायम राहिला.

पण एक मात्र खरं या तीनही प्रतिभावंतांची खरी प्रतिभा मला अनुभवता आली हे माझं भाग्यचं. खरंच आम्ही या व्यक्तिमत्त्वांच्या निमित्ताने हिमालय पाहिला एवढं खरं.

शब्दांकन : उत्तरा मोने

मराठी मनावर अधिराज्य गाजवणारे बाबूजी, गदिमा आणि पु. ल. यांचे हे जन्मशताब्दी वर्ष... मधल्या काळात अनेक वर्ष लोटली असली तरी माझ्या मनात त्यांच्या आठवणी ताज्या आहेत. या लेखाच्या निमित्ताने आठवणींना मिळाला उजाळा...

मैत्रीचा निखळ झरा...

रमेश देव – सीमा देव

राजाभाऊ, अण्णा (गदिमा) बाबूजी (सुधीर फडके) या तिघांच्या या गटाला त्या काळात मराठी चित्रपटसृष्टीतील दत्तात्रय असेही म्हणत. त्यांचे कितीतरी छोटे-छोटे किस्से हे मी स्वत: बघितले आहेत. आज लोकांना सांगितले तर खरं वाटणार

नाही पण गदिमांनी गीतरामायणाचा जवळपास ८० टक्के भाग मुंबई-पुणे प्रवासात ट्रेनमध्ये बसून लिहिलेला आहे. अनेकदा या प्रवासात मीसुद्धा त्याच ट्रेनमध्ये असायचो. लोक मला अभिनेता म्हणून ओळखू लागले होते. त्या लोकप्रियतेच्या बळावर मी गदिमांच्या शेजारी बसलेल्या लोकांना विनंती करून तिथली जागा मिळवायचो. गदिमाचं गीतलेखन चालू असायचं आणि मी त्यांच्या जवळच बसलेलो असायचो. त्यांच्या गीतलेखनात व्यत्यय येऊ नये म्हणून मी त्यांच्याशी फारसं बोलायचो नाही. पण गदिमांच्या लोकप्रियतेमुळे त्यांना ओळखणारे अनेकजण त्या रेल्वेच्या डब्यात असायचे. गदिमा एकीकडे गीतरामायणातलं गीत लिहीत असायचे आणि मध्येच कुणी परिचित माणसाने ओळख दाखवली तर ते गीतरामायणातलं गीतलेखन थांबवून त्या परिचित व्यक्तीबरोबर एक-दोन वाक्यं बोलायचे आणि परत आपल्या गीत लेखनात मग्न व्हायचे. आज गीतरामायणातील ती गाणी वाचताना हे खरंच वाटत नाही की, ही इतकी अनमोल गीते लिहीत असताना असा अधून-मधून व्यत्यय येत होता.

गदिमा हे सिद्धहस्त कवी आहेत, हे सिद्ध करणारी ही आठवण आहे माझ्यापाशी. रेल्वेच्या प्रवासात लेखन करण्याबद्दल गदिमा

> “जगाच्या पाठीवर या चित्रपटासाठी राजाभाऊंनी (राजा परांजपे यांनी) माझी निवड केली. त्यामुळे मला गदिमांची गीतं असलेल्या आणि बाबूजीचं संगीत असलेल्या चित्रपटामध्ये काम करण्याच्या अनेक संधी मिळाल्या. राजाभाऊ, अण्णा (ग. दि. मा.) बाबूजी (सुधीर फडके) हे तिघेजण एकत्र मिळून काम करत असत. अशा कामातून मराठीत उत्कृष्ट चित्रपट निर्माण झाले व त्या चित्रपटांमध्ये मला काम करायला मिळालं ही मोठी भाग्याची गोष्ट आहे.”
>
> **– सीमा देव**, ज्येष्ठ अभिनेत्री

ढोल्या आणि कडक्या

एका चित्रपटातल्या गाण्यावरून वाद चालला होता. गीतलेखन गदिमांनी करावं आणि संगीत बाबूजीनं द्यावं असं राजाभाऊंना (राजा परांजपे ह्यांना) अपेक्षित होतं. त्या वेळी वाद असा सुरू झाला की, आधी शब्द की आधी सूर, आधीच ठरलेल्या गीताला नंतर चाल लावायची? यावरून वाद चालला होता. दोघेही एकमेकांचा अगदी खास नावाने उल्लेख करत होते. बाबूजी राजाभाऊंना म्हणत होते. मी दोन मिनिटांत चाल लावीन रे.पण या ढोल्याला सांग शब्द लिहून द्यायला. त्यावर गदिमा म्हणायचे, अरे शब्द सुचण्याची काहीच अडचण नाहीयं मला. पण या कडक्याला या प्रसंगासाठी साजेशी चाल सुचतेयं का बघ. असल्या वादावादीनंतर आधी गदिमांनी गीत लिहून द्यायचं असं ठरलं. ते एका खोलीत जाऊन गीतलेखन करायला बसले आणि खरोखरंच दहा पंधरा मिनिटांत एक गीत घेऊन बाहेर आले. ते गीत होत.

दिवसामागुनि दिवस चालले,
ऋतू मागुनी ऋतू
जिवलगा, कधी रे येशील तू?

राजाभाऊंना गीतात चार ऋतूंचा संदर्भ हवा होता. गदिमांच्या शब्दांतून हे ऋतू सुरेखपणे साकारले आहेत आणि बाबूजींनी या एकाच गाण्यामध्ये अनेक रागांचा मिलाफ करून खास अशी संगीतरचना केली आहे. सुवासिनी या चित्रपटातील हे गीत आशा भोसले यांनी गायलं आणि ते आजही लोकप्रिय आहे. या सदाबहार गीताची निर्मिती एकमेकांना 'ढोल्या' आणि 'कडक्या' म्हणत केलेल्या वादावादीतून झाली आहे.

टोकाचे मतभेद

गदिमा आणि बाबूजींची मैत्री खूप जुनी होती. चित्रपटात आल्यावरही अनेक वर्षे टिकून राहिली होती. काही काळानंतर मात्र गीतरामायणाच्या लोकप्रियतेनंतर काही आर्थिक मतभेदांमुळे त्यांच्यात दुरावा आला आणि त्यांनी एकमेकांसोबत काम करणं बंद केलं. या काळामध्ये मला एका चित्रपटासाठी गदिमांची गीते हवी होती आणि बाबूजींच संगीत हवं होतं. हे कसं काय जमू शकेल, याची मला चिंता वाटत होती. मी दोघांना स्वतंत्रपणे भेटलो आणि चित्रपटाची कथा ऐकवली आणि या कथेत चार गाणी बसतील असंच दोघांनीही सांगितलं. चित्रपट संगीताबाबत या दोघांचे सूर किती जुळले होते, हे यावरून लक्षात येतं. या चित्रपटाचे संगीतकार व्हा अशी विनंती ज्या वेळी मी बाबूजींना केली तेव्हा ते म्हणाले की, 'मी संगीत देईन पण, या चित्रपटाच्या कथेच्या अनुरूप गीतलेखन करायची प्रतिभा केवळ गदिमांपाशीच आहे. मात्र मी संगीतकार आहे हे समजल्यावर अण्णा गीतलेखन करणार नाहीत.'मी जेव्हा गदिमांपाशीच जाऊन या चित्रपटातील गीतांच्या लेखनाबद्दल बोललो. तेव्हा तेदेखील बरोबर असंच म्हणाले की,''मी गीतलेखन करेन पण या चित्रपटासाठी लिहिलेल्या माझ्या गीतांना संगीत द्यायची प्रतिभा केवळ बाबूजींपाशीच आहे. पण मी गीतलेखन केलं आहे असं समजल्यावर बाबूजी संगीत देणार नाहीत.'' आता हा भलताच पेच निर्माण झाला होता. मात्र टोकाचे मतभेद असतानादेखील या दोन कलावंतांना एकमेकांच्या प्रतिभेबद्दल किती आदर होता हे मला यानिमित्ताने परत एकदा समजलं.

म्हणायचे की, रेल्वेच्या चाकांच्या जो एक लयबद्ध आवाज असतो त्याची त्यांना मदत होत असे. रेल्वेच्या चाकांच्या नादाबरोबर त्यांचे गीतलेखन सुरू असायचे. बाबूजीबरोबर माझे संबंध अतिशय आपुलकीचे होते. त्यांच्या घरी गेलो की वहिनी (श्रीमती ललिता देऊळकर-फडके) माझ्या आवडीचं कोकम सरबत बनवायच्या. गदिमा आणि बाबूजी काही काळ दादरला अगदी शेजारी-शेजारीच राहायचे. त्यांच्यात अनेकदा थट्टा-मस्करी, वादविवाद होत असत हे मी स्वत: पाहिलेलं आहे.

अण्णांच्या पटकथा लेखनाबद्दलची ही माझी एक आठवण आहे. अण्णांच्या पटकथेवर आधारलेल्या एका चित्रपटात मी काम करत होतो. राजाभाऊ दिग्दर्शक होते. एका प्रसंगाचं चित्रीकरण चाललं होतं. त्या वेळी राजाभाऊ उपस्थित नव्हते. राजाभाऊंचा साहाय्यक त्यांच्या सूचनेनुसार थोड्या वेळासाठी दिग्दर्शन करत होता. त्या प्रसंगात माझ्या संवादांमधील एक साधं वाक्य अस होतं, 'मी तिथे चाललोय' याऐवजी 'तिथे चाललोय मी' असं म्हणालो तो प्रसंग आणि अभिनय लक्षात घेता मी म्हटलेलं वाक्य मला अधिक सहज, अधिक अनुरूप असं वाटत होतं मात्र, राजाभाऊंच्या साहाय्यकाला ते आवडलं नाही. अण्णांनी लिहिलेलं वाक्य जसंच्या तसं म्हणायचं एकही शब्द मागेपुढे करायचा नाही. अण्णांना ते अजिबात आवडत नाही असं तो मला म्हणाला मला त्याच म्हणणं पटलं नाही, मी म्हटलेलंच वाक्य योग्य आहे असं माझं मत होतं इतक्यात अण्णांच तिथे आले. त्यांना पाहून साहाय्यक दिग्दर्शकाला अधिकच बळ मिळालं त्यांने अण्णांकडे माझ्या वाक्यबदलाची तक्रार केली. थेट अण्णांकडेच तक्रार केली गेल्यामुळे मी सुद्धा थोडा चिंतित झालो होतो.

अण्णांनीसुद्धा माझ्या वाक्याला विरोध केला असता तर त्यावर अण्णांना विरोध करण्याचं धाडस माझ्याकडून झालं नसतं पण आश्चर्याची गोष्ट अशी की, अण्णांनी अजिबात आक्षेप घेतला नाही. अभिनयाची गरज म्हणून करावा लागतो असा बदल कधी कधी, वाक्याचा अर्थ कुठं बदललायं रमेशने? अर्थ तोच असेल तर हरकत कशाला घ्यायची? असं त्यांनी उलट त्या साहाय्यक दिग्दर्शकालाच विचारलं त्याचबरोबर ते असंही म्हणाले, तू राजाभाऊंचा साहाय्यक आहेस. रमेशच्या वाक्याला राजभाऊंनी हरकत घेतलीय का? तसं असेल तर मी बोलतो राजाभाऊंशी,

अण्णांचं हे बोलणं ऐकून मला दिलासा मिळाला. पटकथा कशासाठी लिहायची असते, त्यातील संवाद प्रत्यक्ष चित्रीकरण चालू असताना कसे म्हणावेत याची सुरेख जाण अण्णांकडे होती हे या किश्श्यातून लक्षात येतं.

गदिमांच्या अशा अनेक आठवणी मला आठवतायंत. 'जगाच्या पाठीवर' या चित्रपटामध्ये राजाभाऊ परांजपे यांनी केलेली भूमिका आधी सुप्रसिद्ध अभिनेते धुमाळ यांनी केली होती. धुमाळ यांनी चित्रपटाच्या निर्मिती खर्चापैकी पाच हजार रुपयेदेखील दिले होते. सुरुवातीचे काही चित्रीकरण पाहिल्यानंतर गदिमांना असं वाटलं की, ती भूमिका धुमाळ यांनी करण्यापेक्षा इतर एखाद्या अभिनेत्याने करणे अधिक योग्य ठरेल. धुमाळ हे जाणकार अभिनेते होते पण त्यांचे व्यक्तिमत्त्व 'जगाच्या पाठीवर' मधील मुख्य भूमिकेशी जुळत नव्हतं, असं गदिमांना वाटलं होतं. त्यामुळे गदिमांच्या सूचनेनुसार 'जगाच्या पाठीवर' या चित्रपटात मुख्य भूमिका राजाभाऊ परांजपे यांनी केली, आणि धुमाळांनी त्याच चित्रपटात खलनायकाचे काम केले.

(उर्वरित लेख पृष्ठ २५ वर)

चालू वर्ष हे महाराष्ट्रातल्या तीन महान कलाकारांच्या जन्मशताब्दीचं वर्ष म्हणून शासनासोबतच राज्यातील कलाप्रेमी उत्साहाने आणि प्रेमाने साजरे करत आहे. पु. ल. देशपांडे, ग. दि. माडगूळकर, सुधीर फडके. ह्या दिग्गजांचं कलेच्या वेगवेगळ्या प्रांतात जरी महत्त्वाचं योगदान असलं तरी त्यांना बांधून ठेवणारा समान धागा म्हणजे – संगीत!

किमयागार

कौशल इनामदार

संगीत एक कारकिर्द म्हणून निवडली तोवर ग. दि. माडगूळकर हे हयात नव्हते आणि बाकीच्या दोन कलाकारांनी कलाक्षेत्रातून निवृत्ती घेतली होती. या प्रतिभावंतांशी आपली भेट होईल असं माझ्या मनातही कधी आलं नाही. पण माडगूळकर सोडून या सर्व कलाकारांच्या भेटीचा योग आला आणि या भेटींनी मला कलेबद्दल आणि जीवनाबद्दल असे काही साक्षात्कार दिले की, एक कलाकार आणि माणूस म्हणून मी समृद्ध झालो.

पु. ल. देशपांडे आणि सुधीर फडके यांच्या भेटी मात्र नुसत्या स्मरणात राहिल्या नाहीत तर त्या भेटीत या महानुभावांनी दिलेले साक्षात्कार पुढे आयुष्यभर दिशा दाखवत राहिले.

पुलंची भेट

काही वर्षांपूर्वी मला सकाळी ७ वाजता एक फोन आला. मी झोपेतच तो फोन घेतला. तोच समोरून आवाज आला – 'नमस्कार, मी पु. ल. देशपांडेंचा असिस्टंट बोलतोय. भाई आता जांभुळपाड्याला आहेत आणि गेले दोन दिवस ते फक्त तुमची गाणी ऐकताहेत. त्यांना तुम्हाला भेटायची खूप इच्छा आहे. तर तुम्ही जांभुळपाड्याला येऊ शकाल का?' झोपेतही मला असं वाटलं की, आमच्याच मित्रमंडळींपैकी कुणीतरी माझी थट्टा करतंय. पु. ल. देशपांडे मला जांभुळपाड्याला का बोलावतील? आणि त्यांनी आपली गाणी ऐकली तरी कुठे? पुलंना मला भेटायची इच्छा? छे! छे! ही थट्टाच असली पाहिजे! मी मनाशी ठरवलं की या थट्टेला आपण बधायचं नाही... मित्रमंडळीत हसं करून घ्यायचं नाही. मी त्यांना म्हटलं – 'हे सगळं छानच आहे पण माझं लग्न आठवड्यावर आलंय. त्यामुळे मला येणं जमेल असं वाटत नाही.'

'आला असतात तर भाईंना आनंद झाला असता. पण त्यांनी दुपारी ४ वाजता फोन केला, तर तुम्ही असाल ना?' मी 'हो' असं म्हटलं आणि फोन ठेवला. मित्रांच्या थट्टेला आपण बळी पडलो नाही या आनंदात मी पुन्हा झोपी गेलो. दिवसभरात या फोनची आठवणही मला राहिली नाही. पण दुपारी ४ वाजता अचानक फोन खणखणला आणि समोरून चक्क पुलंचा आवाज आला. या आवाजाची ओळख मी झोपेतही विसरू शकलो नसतो.

पु.ल. म्हणाले – 'तुमच्या एका मैत्रिणीने मला तुमच्या गाण्यांच्या ध्वनिफीती पाठवल्या. गेले दोन दिवस मी त्या ऐकतोय. मला गाणी आवडली. तुमचं लग्न आहे हेही कळलं. तुम्ही इथे आलात तर आशीर्वाद देईन.' मी, माझा मित्र परीक्षित भातखंडे, आणि होणारी बायको सुचित्रा दुसऱ्या दिवशी तडक जांभुळपाड्याला गेलो. खरोखरच पुलंच्या उशाशी माझ्या तीन कॅसेट्स होत्या. आम्ही त्यांना लग्नाची पत्रिका दिली आणि वाकून नमस्कार केला. त्यांनीही मोठ्या प्रेमाने आशीर्वाद दिला. मग त्यांनी एक-एक करून अशी माझी सगळी गाणी माझ्यासमोर ऐकत प्रत्येक गाणं त्यांना का आवडलं याचं विश्लेषणही केलं. आम्ही त्यांच्या सान्निध्यात दोन तास घालवले आणि या दोन तासात मला एकाच गोष्टीचं आश्चर्य वाटत राहिलं की ८०व्या वर्षीही त्यांना एका नवीन संगीतकाराचं गाणं ऐकावसं वाटत होतं आणि आवडलं तर ते का – हे सांगण्याचा उत्साह आणि दानत असं दोन्ही त्यांच्यात होतं. त्यांच्या एका प्रश्नाचं उत्तर देताना मी उत्साहात म्हटलं – 'मला काहीतरी वेगळं करावसं वाटत होतं.' त्यावर त्यांनी प्रेमाने पाठीवर हात ठेवला आणि म्हणाले – 'तुम्ही चांगलं करत राहा. वेगळं आपोआप होईल.'

बाबूजींची भेट

साल २००१. स्थळ वांद्र्याच्या एका रेस्टराँचा मॅझेनाइन मजला. दोन टेबले. एका टेबलावर एक पंजाबी कुटुंब – दोन मुलं, आई, वडील आणि आजी-आजोबा. शेजारच्या टेबलावर विविध वयातले साधारण दहा-बारा लोक. या पंजाबी कुटुंबाला आपल्या शेजारच्या टेबलावर एक ऐतिहासिक बैठक सुरू आहे, याची सुतराम कल्पना नाही. मला मात्र, हा इतिहास उलगडतांना दिसत होता. कारण त्या दहा-बारा लोकांमधला वयाने सगळ्यात लहान सदस्य मी होतो. निमित्त होतं मराठी भावसंगीतातले एक मोठे संगीतकार पं. यशवंत देव यांच्या पंच्याहत्तरीचं. देव काकांनी त्यांच्या पंच्याहत्तराव्या वाढदिवसानिमित्त मराठीतल्या त्यांच्या आवडत्या संगीतकार आणि संगीत संयोजकांना या हॉटेलमध्ये जेवायला बोलावलं होतं. यात सर्वश्री सुधीर फडके, दत्ता डावजेकर, श्रीनिवास खळे, कमलाकर भागवत, अशोक पत्की, श्रीधर फडके, नंदू होनप, विलास जोगळेकर, आप्पा वढावकर, मिलिंद जोशी होते. सोबत देवकाकांचा पुतण्या आणि उत्कृष्ट गिटारवादक ज्ञानेश देव होता, सौ. करुणा देव होत्या, आणि मिलिंदची बायको, गायिका मनीषाही होती. जणू मराठी संगीताची आकाशगंगाच जमिनीवर अवतरली होती!

ती संध्याकाळ भारलेली होती इतकंच मला आता आठवतंय. त्या भारलेल्या वातावरणाचा

स्पर्शही न होता शेजारचं पंजाबी कुटुंब घरी निघून गेलं पण आम्ही सगळे हॉटेल बंद होईपर्यंत तिथेच गप्पा मारत बसलो. यशवंत देवांनी तिथे जमलेल्या प्रत्येक संगीतकारावर एक चार ओळींची कविता लिहिली होती. बुजुर्ग संगीतकारांमध्ये संगीताबद्दल गप्पा रंगल्या, संगीताच्या सोनेरी दिवसांच्या आठवणींना उजाळा मिळाला. मी डोळे विस्फारून या दिग्गजांकडे पाहत होतो आणि कान टवकारून त्यांचा प्रत्येक शब्द साठवत होतो.

शेवटी निरोपाचा क्षण आला. अगदी जाता जाता श्रीधर फडकेंनी मला एका कोपऱ्यात नेऊन विचारलं – 'तू कसा आला आहेस? दादरलाच जाणार आहेस ना? गाडी आहे.' 'हो. दादरलाच चाललोय.'

'जरा बाबूजींना सोडशील का घरी?' माझा विश्वासच बसेना. खुद्द सुधीर फडकेंना त्यांच्या घरी पोहोचवण्याचा बहुमान मला मिळत होता. मी लगेच होकारार्थी मान डोलावली. श्रीधरजी पुढे म्हणाले – 'आणि महत्त्वाची गोष्ट – त्यांचा जरा तोल जातो तर वर घरापर्यंत सोड. त्यांचा स्वभाव स्वाभिमानी आहे त्यामुळे ते नको म्हणतील पण काहीही कर आणि घराच्या आतपर्यंत सोडूनच ये.'

कृष्णधवल सैरसपाटा

श्रीधरजींनी बाबूजींना सांगितलं की, 'मी त्यांना सोडेन.' आम्ही गाडीत बसलो. वांद्रा ते दादर बाबूजींनी फार आपुलकीने माझी चौकशी केली. तो वेळ कसा गेला हेच मला कळलं नाही. शिवाजी पार्कजवळ 'शंकर निवास' या त्यांच्या निवासस्थानी पोहोचलो तसे ते म्हणाले – 'तुम्ही मला इथेच सोडा. मी जाईन वरती.' त्यांच्या बोलण्यात करारीपणा होता. पण मला तर श्रीधरजींची आज्ञा होती की, वरपर्यंत सोडायला जा! 'मी वर येतो...' असं मी म्हणेन तोवर बाबूजींनी – 'त्याची गरज नाही. मी एकटा जाईन.' असं ठामपणे म्हटलं. आता आली का पंचाईत! तेवढ्यात मला एक युक्ती सुचली.

मी म्हटलं – 'बाबूजी, मला पाणी हवंय.' बाबूजी क्षणभर थबकले आणि लगेचच म्हणाले – 'हुशार आहात – मला ठाऊक आहे की, तुम्हाला श्रीधरने मला वरपर्यंत सोडायला सांगितलं आहे. आणि तुम्हांला ठाऊक आहे की, मी पाण्याला नाही म्हणणार नाही. तेव्हा चला आता वर. पण मला जिने चढायला वेळ लागतो आता वयामुळे. तुम्हांला चालेल ना?'

'शंकर निवास'चा तो दोन मजली जिन्याचा प्रवास मी आयुष्यात विसरणार नाही. एका भारलेल्या संध्येची रात्रही तितकीच भारलेली असणार आहे हे मला कळून चुकलं. आम्हाला २ मजले चढायला २० मिनिटं लागली. दर चार-पाच पायऱ्यांनंतर बाबूजी एक छोटी विश्रांती

सुरांचे पंख

'आकाशी झेप घे रे पाखरा'सारखं एखादं गीत बाबूजींच्या सुरांत येतं तेव्हा वाटतं की, सामान्य संगीतकार गाणं 'संगीतबद्ध' करतात, पण बाबूजींसारखा किमयागार गाण्यातल्या शब्दांना सुरांचे पंख देतो आणि आकाशाची वाट मोकळी करून देतो.

घेत आणि मग पुढे चालत. त्यांचा स्वभाव गप्पिष्ट असणार हे उघडच आहे कारण या २० मिनिटांत त्यांनी त्यांच्या कारकिर्दीतल्या अनेक गोष्टी मला सांगितल्या. त्या वेळी होणारं ध्वनिमुद्रण, श्यामराव कांबळेंसारखे संगीत संयोजक, आशाबाईंकडून गाऊन घेण्याचा त्यांचा अनुभव, कशी हिंदीतली त्यांची बहुतांश गाणी लताबाईंनी गायली आहेत, बालगंधर्वांबद्दल त्यांची श्रद्धा, आणि त्यांची निर्मिती असलेल्या 'विठ्ठल रखुमाई' या चित्रपटात बालगंधर्वांनी केलेलं काम, अशा अनेक विषयांवर ते बोललेलं मला अंधूकसं आठवतंय पण नेमकं काय बोलणं झालं याची माझी आठवण फारच अस्पष्ट आहे, इतका मी त्या घटनेने संमोहित झालो होतो. प्रत्येक मजल्यावर बाबूजींच्या कारकिर्दीतला एक जुना कृष्णधवल फोटो लावला होता असं मला अस्पष्ट आठवतंय. त्या वीस मिनिटांत बाबूजींनी कृष्णधवल काळात एक सैरसपाटा करून आणला. आम्ही वर पोहोचलो. ललिताताई (श्रीधरजींच्या आई) जाग्याच होत्या. बाबूजींनी माझी ओळख करून दिली आणि म्हणाले – 'यांना पाणी द्या. त्यासाठीच हे वर आलेत!' हा दोन मजल्यांचा प्रवास माझ्यासाठी बरंच काही देऊन जाणारा प्रवास ठरला. आपल्या आवडत्या संगीतकाराबरोबर असा वेळ घालवता येणं हे एक प्रकारचं वरदानच आहे, असं मला वाटतं. आजही रात्री १२ वाजताच्या नीरव शांततेतला बाबूजींबरोबर केलेला तो दोन मजल्यांचा प्रवास मला आठवतो. परवाच श्रीधरजी भेटले असता मी त्यांना विचारलं – तुमच्या शंकर निवासच्या घरात प्रत्येक मजल्यावर बाबूजींचे जुने कृष्णधवल फोटो लावले होते ना? ते म्हणाले नाही, असे काही फोटो लावले नव्हते. मला आश्चर्य वाटलं. अस्पष्ट का होईना मला बाबूजी, माडगूळकर आणि राजा परांजपे, बाबूजी आणि आशाबाई, बाबूजींचा ध्वनिमुद्रणाच्या वेळेचे काही कृष्णधवल फोटो असे पाहिल्याचं आठवत होतं. मला अचानक साक्षात्कार झाला – जे बाबूजी गाण्यांतून करायचे तोच परिणाम त्यांनी त्या २० मिनिटांच्या गप्पांमध्येही साधला होता. माझ्या मनात त्यांनी तो काळ आणि त्या काळातल्या प्रतिमा उभ्या केल्या होत्या आणि मला वाटत राहिलं की मी फोटो पाहत होतो!

न विचारता, न मागता या थोर कलाकारांनी कलेचं 'पसायदानच' मला दिलं आहे असं वाटतं आणि दशरथाच्या पसायदानापेक्षा याची महती ही की, हे न संपणारं-अक्षय-पसायदान आहे.

असे होते बाबूजी...

- प्रसिद्ध मराठी भावगीतगायक आणि चित्रपटक्षेत्रातील निर्माते, संगीतदिग्दर्शक व पार्श्वगायक सुधीर फडके यांचा जन्म (२५ जुलै १९१९ – २९ जुलै २००२) कोल्हापुरात झाला.
- त्यांचे पूर्ण नाव रामचंद्र ऊर्फ सुधीर विनायक फडके. पण बाबूजी या नावाने ते अधिक परिचित होते.
- गायनाचार्य पं. वामनराव पाध्ये आणि बाबूराव गोखले यांच्याकडे बाबूजींनी काही वर्षे शास्त्रीय संगीताचे शिक्षण घेतले.
- गायनाचा पहिला जाहीर कार्यक्रम मिरजेत (१९३१) झाला. तर, १९३७ मध्ये मुंबईत आकाशवाणीवर त्यांचा पहिला कार्यक्रम झाला.
- १९४६ सालापासून बाबूजींनी ८४ मराठी व २२ हिंदी चित्रपटांतील व इतर अशी ८७७ गीते संगीतबद्ध केली.
- १४४ मराठी व ९ हिंदी चित्रपटांतील व इतर अशी ५११ गीते गायिली आहेत. त्यांची अनेक हिंदी–मराठी गाणी अजरामर झाली.
- १९५५ साली पुणे आकाशवाणीवर प्रसिद्ध झालेल्या आणि साहित्यिक ग. दि. माडगूळकर यांनी रचलेल्या 'गीतरामायणा'तील ५६ गीतांना बाबूजींनी संगीत दिले आणि गायन केले.
- १९५८ पासून 'गीतरामायणा'चे १८०० कार्यक्रम.
- गीतरामायणाचे हिंदी, गुजराती, कन्नड, बंगाली व तेलुगू या भाषांत रूपांतर झाले. ही सर्व गीते बाबूजींनी दिलेल्या चालीवरच गायली गेली.
- बाबूजींचा विवाह पार्श्वगायिका ललिता देऊळगावकर यांच्याशी झाला (१९४९). त्यांचे पुत्र श्रीधर फडके हे आघाडीचे संगीतकार–गायक आहेत.
- शास्त्रीय संगीतापासून कोठीसंगीतापर्यंतचे सर्व संगीतप्रकार बाबूजींनी कौशल्याने हाताळले.
- बालगंधर्व, हिराबाई बडोदेकर, कुंदनलाल सैगल यांना ते गुरुस्थानी मानत.
- बाबूजींनी 'सूरश्री' प्रतिष्ठान स्थापन करून संगीतविषयक उपक्रम सुरू केले.
- मराठी चित्रपट महामंडळाचे ते अध्यक्ष होते (१९८०–८५).
- त्यांना चित्रपटसंगीताबद्दल फाळके पारितोषिक, तसेच सर्वोत्कृष्ट संगीतदिग्दर्शक आणि सर्वोत्कृष्ट पार्श्वगायक म्हणून महाराष्ट्र राज्य पारितोषिकेही मिळाली.
- बाबूजींनी निर्मिलेल्या चित्रपटांपैकी 'हा माझा मार्ग एकला' या मराठी चित्रपटास राष्ट्रपती रौप्यपदक मिळाले (१९६३).
- गोवा मुक्तिसंग्रामात त्यांचा सहभाग होता. दादरा व नगरहवेली मुक्तीकरिता पत्नी ललिताबाईंसह सहभाग.
- २००३ साली महाराष्ट्र शासनाने बोरीवली–दहिसर उड्डाणपुलाला त्यांचे नाव देऊन त्यांना मरणोत्तर मानवंदना दिली.
- 'वंशाचा दिवा' (१९४८), 'विठ्ठल रुक्मिणी' (१९५१), 'हा माझा मार्ग एकला' (१९६१), 'वीर सावरकर' (२००२) हे मराठी तर 'रत्नघर' (१९५५) हिंदी या चित्रपटांची निर्मिती.
- वृद्धापकाळाने मुंबई येथे २९ जुलै २००२ रोजी निधन.

प्रसिद्ध गाणी (गायन)	संगीत	चित्रपट
आकाशी झेप घे रे पाखरा	–	आराम हराम आहे
अशी पाखरे येती	–	–
दाम करी काम	–	दाम करी काम
बलसागर भारत होवो	–	–
देहाची तिजोरी भक्तीचाच ठेवा	संगीत	झाले गेले विसरून जा
देव देव्हाऱ्यात नाही	संगीत	झाला महार पंढरीनाथ
एक धागा सुखाचा	संगीत	जगाच्या पाठीवर
जग हे बंदीशाळा	संगीत	जगाच्या पाठीवर
जे वेड मजला लागले	–	अवघाची संसार
कानडा राजा पंढरीचा	संगीत	झाला महार पंढरीनाथ
कुठे शोधीसी रामेश्वर	–	–
मंदिरात अंतरात तोच नांदताहे	संगीत	धाकटी सून
ने मजसी ने परत मातृभूमीला	संगीत	वीर सावरकर
चंद्र आहे साक्षीला	–	चंद्र होता साक्षीला
विठ्ठला तू वेडा कुंभार	संगीत	प्रपंच
फिटे अंधाराचे जाळे	–	लक्ष्मीची पाऊले
रुसू बाई रुसू कोपऱ्यात बसू	–	झाले गेले विसरून जा
सखी मंद झाल्या तारका	–	–
संथ वाहते कृष्णामाई	–	संथ वाहते कृष्णामाई
तोच चंद्रमा नभात	–	–
उद्धवा अजब तुझे सरकार	–	जगाच्या पाठीवर
वेदमंत्राहूनी आम्हा वंद्य वंदे मातरम्	संगीत	वंदे मातरम्
विठू माऊली तू माऊली जगाची	–	अरे संसार संसार
याचसाठी केला होता अट्टाहास	–	महात्मा

संगीत दिग्दर्शन (निवडक गाणी)	चित्रपट
फिरूनी नवी जन्मेन मी	पुढचे पाऊल
आम्ही जातो आपुल्या गावा	विठ्ठल रखुमाई
सुंदर ते ध्यान उभे विटेवरी	विठ्ठल रखुमाई
सांग तू माझा होशील का	लाखाची गोष्ट
दिसं जातील दिसं येतील	शापित
शंभो शंकरा करुणाकरा	थोरली जाऊ
आदिमाया अंबाबाई साऱ्या दुनियेची आई	थोरली जाऊ
गं बाई मी पतंग उडवित होते	लाखात अशी देखणी
हवास तू	आम्ही जातो आमच्या गावा
ब्रम्हा विष्णू आणि महेश्वर सामोरी बसले	आम्ही जातो आमच्या गावा
धुंदी कळ्याना धंदी फुलांना	धाकटी बहीण
का रे दुरावा का रे अबोला	मुंबईचा जावई
बाई मी विकत घेतला शाम	जगाच्या पाठीवर
गीतरामायण	–

मिळालेले पुरस्कार

- महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट महोत्सवाचा उत्कृष्ट पार्श्वगायक पुरस्कार – (६ पुरस्कार)
- महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट महोत्सवाचा उत्कृष्ट संगीतकार पुरस्कार – (२ पुरस्कार)
- सूरसिंगार संसदेतर्फे दोन वेळा 'हरिदास पुरस्कार'
- कुसुमाग्रज प्रतिष्ठानचा 'गोदावरी पुरस्कार' (१९९६)
- चतुरंग प्रतिष्ठानकडून 'जीवनगौरव पुरस्कार'
- प्रदीर्घ संगीतसेवेकरिता 'दीनानाथ मंगेशकर पुरस्कार' (१९९८),
- महाराष्ट्र शासनाचा 'लता मंगेशकर पुरस्कार' (२००१)

बाबूजींचे जन्मशताब्दी वर्ष सर्वत्र साजरे होत आहे. त्यानिमित्त अनेक कार्यक्रम देश-विदेशात होत आहेत. या कार्यक्रमांना रसिक भरभरून प्रतिसाद देत आहेत. बाबूजी आजच्या पिढीलाही आकर्षित करत असल्याचे दिसून आले आहे. बाबूजींनी ४०-४५ वर्षे चित्रपटांना संगीत देऊन हे क्षेत्र समृद्ध केले आहे.

स्वरगंधर्व

श्रीधर फडके

आईवडिलांची मुलांवर जितकी माया असते तितकी दुसऱ्या कोणाचीच माया मिळू शकत नाही आयुष्यात मलाही अशीच माया आईवडिलांकडून मिळाली. कोणाही मुलाला आपले वडील प्रिय असतात तितके अण्णा मलाही प्रिय होते. ते गायक, संगीतकार होतेच पण सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रातही तितकेच कार्यरत होते, आणि विविध क्षेत्रात त्यांचा नुसता वावरच नाही तर त्या प्रत्येक क्षेत्रावर त्यांनी आपला ठसा उमटवला होता पण हे मोठेपण माझ्या लहानपणी मला माहीत नव्हतं, कळलचं नव्हतं. हळूहळू मोठे होताना कळत गेलं. घरात ते तसं वागत नसत, ते इतक्या क्षेत्रात वावरत असूनही त्यांनी मला कधीही या क्षेत्रात जा, त्या क्षेत्रात जा असं सांगितलं नाही. उलट अभ्यास कर, उत्तम शिक्षण घे, स्वत:च्या पायावर उभा राहा असं ते सांगत असत. अण्णांना (म्हणजे सुधीर फडके) स्वत:ला इंजिनिअर व्हायचं होतं. परंतु घरच्या परिस्थितीमुळे त्यांना उच्च शिक्षण घेता आल नाही. पण त्याबद्दल आयुष्यात कधीही कटुता त्यांनी ठेवली नाही. त्यांचं लहानपण व तारुण्यही खूप खडतर गेलं. मिळेल तिथे, मिळेल ते काम करत त्यांनी आपली संगीतसाधना मात्र, जोपासली. घरचे, मामांकडचे नंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अतिशय चांगले संस्कार त्यांना मिळाले. त्या खडतर काळात जे जे शिकता आल, जे जे ऐकलं त्याचा त्यांनी अभ्यास केला. खडतर काळातही कोल्हापूरपासून जिथे मिळेल तिथून त्यांनी संगीताचं ज्ञान मिळवायचा प्रयत्न केला होता, आणि प्रतिभेची जोड देत मेहनतीने ते पुढे निघाले 'अभ्यासोनी प्रकटावे' हे वचन त्यांनी आयुष्यात नेहमीच अंगीकारलं. ज्या ज्या क्षेत्रात कामं केलं तिथे संपूर्ण तनमनधन वेचून काम केलं म्हणूनच उत्कृष्ट संगीतकार गायकाबरोबरच एक निष्ठावान, प्रामाणिक माणूस म्हणूनही त्यांची ख्याती झाली.

सामाजिक ऋण

आपण कलाकार आहोत पण ज्या समाजात राहतो त्याचं ऋण फेडणंही आपलं कर्तव्य आहे. आपल्या आजूबाजला घडणाऱ्या सामाजिक जाणिवांचा आदरविचार केला पाहिजे व त्यासाठी तळमळीनं काम केलं पाहिजे, असं त्यांना वाटत असे.

त्यांची मराठी चित्रपट सृष्टीला एकाहून एक सरस, दर्जेदार गाणी देणारे गायक, संगीतकार ही ओळख कोणालाही करून द्यायची गरज नाही. त्यांनी २०-२१ हिंदी चित्रपटांना संगीत दिल 'ज्योती कलश झलके 'किंवा 'खुश है जमाना आज पहली तारीख है', यांसारखी त्यांची हिंदी गीते खूप गाजली. ज्योती कलश या गाण्याचं स्वत: प्रसिद्ध संगीतकार नौशादजी यांनी भरभरून कौतुक केलं होतं. त्यांनी मराठी चित्रपटांना संगीत दिलं, गाणी गायली संगीतकार म्हणून रसिकांना ते जास्त माहितीचे असले तरी गायक म्हणूनही त्यांची एक स्वत:ची वेगळी स्टाईल मराठी संगीतसृष्टीला लाभली आहे. आवाज चांगला होताच पण प्रत्येक कलाकाराची त्या व्यक्तिरेखेची गरज लक्षात घेऊन ते गात असत त्यामुळे इतर संगीतकारांकडेही त्यांनी गाणी गायली ती आजही अतिशय लोकप्रिय आहेत. 'एक धागा सुखाचा' हे राजा परांजपे यांच्यावर चित्रित झालं. 'रूपास भाळलो मी' हे राजा गोसावी यांच्यावर तर 'संथ वाहते कृष्णामाई' असेल किंवा रमेश देव यांच्यावर त्यांनी गायलेली

मान हा मागून मिळत नाही, तो मिळवायचा असतो, आणि तो आपल्या कार्यकतृत्वानं आपोआप मिळतो याचं आदर्श उदाहरण म्हणजे सुधीर फडके होत. त्यांनी कोणतही काम नाव मिळावं, प्रिसिद्धी मिळावी म्हणून केलं नाही.

अनेक गाणी चित्रित झाली आहेत. या गाण्यांना वसंत पवार, दत्ता डावजेकर यांच संगीत होतं. त्यांना राज्य शासनाचे ७ पुरस्कार, राष्ट्रीय पुरस्कार, असे अनेक पुरस्कार मिळाले आहेत. पण इतके पुरस्कार मिळाले तरी, काहीतरी सकस, दर्जेदार ताजतवानं देण्याचा त्यांचा सतत प्रयत्न असे. ४०-४५ वर्षे सलग त्यांनी मराठी चित्रपटसृष्टीला उत्कृष्ट गीतांचा नजराणा दिला आणि मराठी मनाला सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध केले. त्यांच्या या चित्रपट कारकिर्दीइतकीच मोठी, उत्तुंग त्यांची आणखीही क्षेत्रे आहेत.

कळसाध्याय

१९५५ ला आकाशवाणीसाठी निर्मिलेलं 'गीतरामायण' म्हणजे बिगरचित्रपट गीतांच्या यशाचा कळसाध्याय म्हणावा लागेल. ग.दि. माडगूळकर यांचंही जन्मशताब्दी वर्ष यंदा सुरू आहे आणि हा पण योगायोगच आहे. मराठी संचितातील स्वरतीर्थ आधुनिक वाल्मीकी एकाच वर्षात जन्मले. गदिमांनी लिहिलेलं व अण्णांनी स्वरबद्ध केलेलं हे गीतरामायण रसिकांनी अक्षरश: डोक्यावर घेतले त्याच्या निर्मितीचा इतिहास सर्वांनाच परिचित आहे. माझी आई ललिता ही पण उत्तम गायिका होती. आईने हिंदी चित्रपटांसाठी सुद्धा गायन केले आहे. परंतु लग्न झाल्यावर आणि माझा जन्म झाल्यावर संसाराची जबाबदारी यशस्वीपणे निभावण्यासाठी तिनेच गायनाला रामराम ठोकला. ज्या आशा भोसले यांनी अण्णांकडे एकापेक्षा सरस गीते गायली, त्यांचं नाव अण्णांना माझ्या आईनेच सुचवलं होतं. एका गाण्याच्या वेळी आईच अण्णांना म्हणाली होती की, आशा भोसले उत्तम गाते, तिला गायला बोलवा. आशा भोसले यांनी मग अण्णांबरोबर खूप छान गाणी दिली. मराठी रसिकांचे कान तृप्त केले. आशाबाई नेहमीच फडके साहेबांच्या शिस्तीचे, स्पष्ट उच्चारणाबद्दलचे किस्से सांगतात. आशाबाई सुधीर फडकेंना कायम फडके साहेब म्हणत आल्या आहेत.

उत्तम साथ

आईने त्यांना संसारात उत्तम साथ दिली, चांगल कामं करण्यासाठी उत्तम वातावरण राखलं. एकच उदाहरण सांगतो. 'गीतरामायण'साठी आम्ही पुण्याला गेलो होतो कारण पुणे आकाशवाणीवर हा कार्यक्रम दर रविवारी वाजणार होता. पहिलंच रेकॉर्डिंग होतं. आम्ही माणिकताईंकडे उतरलो होतो. सकाळी अण्णा रेकॉर्डिंगला गेले व माझा घसा दुखू लागला. त्यांना कामात व्यत्यय नको म्हणून आईनं कळवलं नाही. मला डॉक्टरकडे नेलं. ते म्हणाले त्वरित रुग्णालयामध्ये ॲडमिट करा, लवकर आलात म्हणून बरं झालं? मला ॲडमिट करून उपचार सुरू झाले तरी आईनं कळवल नाही. मध्यरात्री त्यांना कळल्यावर राहवलं नाही म्हणून थोड्या वेळासाठी ते येऊन गेले पण कर्ती म्हणून आईनं सर्व जबाबदारी घेतली.

संघाशी निगडित असल्यामुळे विद्यार्थी परिषदेशीसुद्धा ते संबंधित होते. परिषदेचा अरुणाचल प्रदेशमधील दीपक नावाचा विद्यार्थी होता, १९६७ ते १९८२ असा १५ वर्षे तो आमच्या घरी राहिला, त्याला

पुरस्कार स्वीकारताना बाबूजी.

आईनं माझ्या भावासारखा वाढवला. मोठ्या पदावरून निवृत्त होऊन आता तो पुन्हा अरुणाचल प्रदेशात जाऊन स्थिर झालाय. दादरा नगर हवेलीच्या स्वातंत्र्य लढ्यात ते सहभागी झाले होते. त्यांच्याबरोबर आईपण गेली होती, तेव्हा मी ४-५ वर्षांचा असेन. मला मावशी, आणि आजीकडे ठेवलं होतं. चित्रपटासारख्या ग्लॅमरस जगात असूनसुद्धा आजूबाजूला घडणाऱ्या घटनांकडे जबाबदारीनं पाहणं, त्यात सहभागी होणं हे फार कठीण आहे. मोहन रानडे गोव्यात जवळजवळ १४ वर्षे तुरुंगात होते. त्यांना सोडवण्यासाठी त्यांनी आटोकाट प्रयत्न केले. शंकर कामत म्हणून पोर्तुगालला राहणारे मूळचे गोव्याचे वकील होते.

नवी पहाट

कवीचे शब्द व भावना परफेक्ट पोहोचल्या पाहिजेत म्हणून बाबूजींचा कटाक्ष असे. खरं तर अण्णांच्या आधी गोविंदराव टेंबे, मास्टर कृष्णराव, जी एन. जोशी, गजानन वाटवे अशी दिग्गज मंडळी संगीतक्षेत्र गाजवत होती. त्यात अण्णांनी स्वत:ची नवी वाट निर्माण केली. त्यांच्या चाली सोप्या आहेत असं वाटे पण त्या सोप्या नाहीत. कानाला गोड, सुखद आहेत पण बारीक बारीक गोष्टी गायला गेलो की, कळतं त्या किती कठीण आहेत. त्यांच्या मनात जी चाल होती ती गायकाकडून तशीच्या तशी यावी असा आग्रह असायचा त्यांचा, आणि तो चांगलाच होता त्यामुळे उत्कृष्ट गीतं चित्रपट सृष्टीला मिळाली.



पुण्यातील एका गीतरामायण कार्यक्रमाची रक्कम स्वातंत्र्यवीर सावरकरांना अर्पण केल्यानंतर बसलेले (डावीकडून) सुंदराताई भोपटकर, स्वा. सावरकर, सौ. माई सावरकर, सौ. ललिता फडके, सौ. साठे, श्रीधर फडके (मागे उभा). उभे (डावीकडून) नाना आपटे, डॉ. शि.न.साठे, ग.दि. माडगूळकर, सुधीर फडके.

त्यांच्याशी संपर्क साधून अगदी हेगच्या आंतरराष्ट्रीय न्यायालयापर्यंत जाऊन मोहन रानडे यांची त्यांनी सुटका केली होती, बरं त्याचा गाजावाजा कुठेही नाही. आणखी त्यांची मोठी कामगिरी म्हणजे ग्राहक संघाची स्थापना त्यासाठी सुद्धा अथक प्रयत्न त्यांनी केले. नंतरही अनेक वर्षे ग्राहक संघाचे ते अध्यक्ष होते.

बाबूजींसारखा तत्त्ववादी, प्रमाणिक, निरलस माणूस मुलावर तरी कशाला दबाव आणेल? मी व्यवस्थित शिक्षण घेऊन नोकरीला लागलो. सुरुवातीला मला संगीताची विशेष आवड नव्हती, पण नंतर मला रेकॉर्डिंग ऐकायचंय असं म्हटलं तर मला घेऊन जायचे. चाल करणे म्हणजे काय? मग आवड वाढू लागली. हे मी त्यांचं पाहून शिकू लागालो. एकदा आमच्या घरीचं मी राणी वर्माबरोबर काहीतरी गाण्याची रिहर्सल करत होतो. अण्णा घरी आले आणि पडद्याआड उभे राहून ऐकू लागले की कोण गातोय? तोपर्यंत त्यांना माहीत नव्हतं मी गातोय वगैरे पण त्यांना एक आनंद होता की, मी माझी वेगळी स्टाईल निर्माण केली. त्यांच्यासारखंच संगीत दिलं असत तर लोक म्हणाले असते की मुलानं वेगळं काय केलं? वडिलांसारखंच काम करतोय पण, 'फिटे अंधाराचे जाळे,' 'सांज ये गोकुळी' 'हिरवा ऋतू बरवा' ही माझी गाणी खूप वेगळ्या धाटणीची होती.

त्यामुळे मी संगीत देत असलो तरी काहीतरी वेगळं, विविधांगी करतोय याचा आई-अण्णा दोघांना खरंच आनंद होता. आज कोणताही मराठी गाण्याचा कार्यक्रम, ऑर्केस्ट्रा असो. आजही सुधीर फडके, गदिमा यांच्या गाण्याशिवाय कार्यक्रम पूर्णच होऊ शकत नाही. इतकी मोठी देणगी त्यांनी संगीत क्षेत्राला दिली आहे. त्यांचा विविध क्षेत्रात वावर होता. तसं सुधीर फडके यांना वेगवेगळ्या नावांनीही संबोधलं जायचं. बाबूजी तर फिल्म इंडस्ट्रिज म्हणायची. आशा भोसले कायम त्यांना फडके साहेब म्हणायच्या, नौशादजी फडकेजी म्हणत घरी सर्वजण अण्णा म्हणायचो.

अण्णांचं जन्मशताब्दी वर्ष सध्या सुरू आहे. त्यानिमित्तानं मी देशविदेशात कार्यक्रम करतोय आणि इतक्या वर्षांनीही बाबूजींवर प्रेम करणारी माणसं पाहून मला खरंच भारावून जायला होतंय. संगीत क्षेत्रातील मंडळी तसंच सर्वसामान्य रसिक दोघेही त्यांच्या गाण्यांवर मनापासून प्रेम करत आहेत, हे पाहून खूप बरं वाटतं. त्यांनी आयुष्यभर निष्ठेनं केलेल्या कामाची पावती त्यांच्या पश्चातही मिळत आहे हे मला पाहायला मिळतंय; हे माझ भाग्यच आहे.

शब्दांकन : शिबानी जोशी

सावरकर भक्त

ते निस्सिम सावरकर भक्त होते आणि सावरकरांचं जीवन देशभर पोचावं, त्यांची महती तरुणांना माहीत व्हावी म्हणून त्यांना 'वीर सावरकर' चित्रपट करायचा होता. हिंदी चित्रपटाची निर्मिती हे आव्हानच असतं. मोठ खटलं असतं ते. त्यासाठी निधी गोळा व्हावा, म्हणून त्यांनी अनेक ठिकाणी गाण्याचे कार्यक्रम केले. तनमनधन वेचलं. चित्रपट पूर्ण झालाच पाहिजे हा एकच ध्यास घेतला. त्यांची प्रकृती अधेमधे साथ देत नसे पण ते निर्धाराने म्हणत सावरकर चित्रपट पूर्ण केल्याशिवाय मी काही जाणार नाही. आणि ते त्यांनी खरं करून दाखवलं. चित्रपट रिलीज घेऊन रौप्यमहोत्सव साजरा झाला आणि त्यांनी अखेरचा श्वास घेतला. सुरुवातीला



चित्रपटाचं कार्यालय विलेपार्ले इथे होतं, ते दादरहून पार्ल्याला बसने जायचे. १२० चित्रपटांचा संगीतकार म्हणून काम केलेला कलावंत बसने फिरताना कोणी पाहलाय का? परंतु चित्रपटासाठी अनेकांकडून देणग्या मिळाल्या होत्या. सर्वसामान्यांनी सढळ हस्ते मदत केली होती. लोकांचा पैसा असा टॅक्सीवर खर्च करणार नाही असं ते म्हणत असत. पण एकदा बसमधून उतरताना ते पडले. कुणीतरी ओळखले आणि त्यांना मदत केली. त्यानंतर चित्रपटाच्या ट्रस्टने मात्र, त्यांना ट्रस्टची गाडी आणा - पोहोचवायला घ्यावी अशी विनंतीच केली. नंतरनंतर ते त्या गाडीतून जायचे पण बऱ्याच वेळा त्यात पेट्रोलही स्वतःच्या पैशाने भरायचे.

(पान १७ वरून पुढे..)

खेळकरपणा

गदिमा आणि बाबूजींचे स्वभावसुद्धा वेगवेगळे होते. गदिमा सिद्धहस्त लेखक होतेच. पण त्यांच्या स्वभावात लहान मुलासारखा खेळकरपणाही होता. एखाद्या विनोदावर गदिमा गदगदून हसत. इतरांशी गप्पा मारत त्यांनाही हसवत. बाबूजी मात्र आपल्या संगीताबद्दल गंभीरपणे बोलत असत. बाबूजींना आपण केलेले विनोद समजत नाहीत असं एकदा गदिमा गमतीने म्हणाले होते. गदिमा आणि बाबूजींची अशा प्रकारची थट्टा किंवा वादविवाद चालू असताना राजाभाऊ परांजपे अनेकदा तिथेच असत. 'शब्द आधी की सूर आधी' यावरील वादविवादामध्ये तर राजाभाऊंनी दोघांनाही 'तुम्ही बरोबर आहात' अशा आशयाचा प्रतिसाद दिला होता. त्यामुळे तो वाद मिटण्याऐवजी अधिकच जोराने चालू राहिला होता. त्याबद्दल राजाभाऊंचं म्हणणं असं होतं की, 'या दोन प्रतिभावान कलावंतांमध्ये या वादविवादामुळे एक मंथन घडून येतं आहे आणि त्यांचा फायदा त्यांनाही होतोय, आणि चित्रपटालाही होतोय. यामुळे अशा प्रकारची घुसळण अधूनमधून घडत राहिली पाहिजे. यासाठी असा प्रतिसाद मी दोघांना देतो.'

'जग हे बंदिशाला' या गाण्यामधला 'ऊंबरातले किडे मकोडे, उंबरी करिता लिला', या दोन ओळी राजाभाऊंना विलक्षण आवडल्या होत्या, आणि त्या ओळी पहिल्यांदा ऐकल्यावर राजाभाऊंनी अगदी उत्सफूर्तपणे, दिलखुलासपणे दाद दिली होती.

या काळात गदिमा आजारी होते. हे लक्षात घेऊन मी बाबूजींना भेटलो आणि विनंती केली की, 'गदिमा आजारी आहेत. तुमचे मतभेद झाले होते त्यानंतर बराच काळ गेलेला आहे. पुलाखालून बरेच पाणी वाहून गेलेलं आहे, आता माझ्या चित्रपटासाठी तुम्ही दोघांनी कृपया एकत्र या'. माझी विनंती ऐकल्यावर आणि त्यातील गदिमांच्या आजारपणाचा उल्लेख ऐकल्यामुळे बाबूजी मला म्हणाले 'कधी भेटता येईल, अण्णांना?', मी त्यांना म्हटलं की, आता लगेच जाऊ. आश्चर्याची गोष्टं अशी की, बाबूजी माझ्याबरोबर अण्णांच्या घरी आले आणि अगदी पूर्वीच्या मैतरकीच्या लहेजात त्यांनी अण्णांना 'ढोल्या' ही हाक मारून त्यांच्या प्रकृतीची चौकशी केली. बाबूजींचा असा आवाज ऐकणे ही गोष्ट गदिमांना इतकी अनपेक्षित होती की, त्यांना काही मिनिटं खोकल्याची ढास लागली. त्यानंतर अण्णा आणि बाबूजींमध्ये अनेक काळानंतरचा संवाद घडून आला आणि माझ्या चित्रपटाला गीतकार गदिमा आणि संगीतकार बाबूजी हे दोन अलंकार लाभले. गदिमांनी या चित्रपटासाठी लिहिलेलं एक गीत होतं, 'या सुखांनो या'. चित्रपटालादेखील मी हेच नाव दिलं. हा चित्रपट प्रदर्शित झाल्यावर दोनेक वर्षांमध्ये गदिमांचे निधन झाले. त्यापूर्वी माझ्या चित्रपटाच्या निमित्ताने गदिमा-बाबूजी ही जोडी जुळून आली. हा मला एक विलक्षण भाग्ययोग वाटतो.

> "'महाराष्ट्राची उमलती कलिका' हे वर्णन गदिमांनी माझ्याबाबत केलं होतं. गदिमांची आपुलकी, स्नेह मला दीर्घकाळ लाभला. गदिमा ७५ वर्षाचे झाले तेव्हा त्यांना सुवासिनीकडून ओवाळण्याचा कार्यक्रम ठरला होता. त्या सुवासिनीमध्ये सीमा असली पाहिजे असं त्यांनी आयोजकांना आवर्जून सांगितलं होतं. अण्णांच्या बंगल्याचं नाव 'पंचवटी' असं होतं. या बंगल्याभोवती बागेत एखादं दुर्मीळ फूल उगवलं की ते मला कळवत असतं.
>
> **– सीमा देव,** ज्येष्ठ अभिनेत्री"

आठवायला लागलं की, गदिमा आणि बाबूजींनी जोडीने केलेल्या कामाच्या कितीतरी आठवणी मनात येत राहतात. गीतरामायणातल्या 'माता न तू वैरिणी' या गाण्याबाबतची बाबूजींची एक आठवण आहे. बाबूजींची आईवर खूप भक्ती होती. त्यामुळे एखाद्या गीतीतही आईला 'वैरीण' म्हटलेलं बाबूजींना खटकलं. सुप्रसिद्ध व्हायोलीनवादक प्रभाकर जोग यांनाही हा शब्द खास लक्षणीय वाटला. गाण्याला चाल लावताना त्या शब्दावर खास जोर आला पाहिजे असं जोगांना वाटत होतं. बाबूजींनी दिलेलं संगीत ऐकल्यावर 'वैरीण' या शब्दातून तो राग, तो ताण किती प्रभावीपणे व्यक्त झाला आहे हे आजही जाणवतं. निरांजनाची ज्योत वगैरे, आईचं प्रेम दर्शवणारी वर्णने बहुतेक गीतांमध्ये असतात. आईलाच 'वैरीण' म्हटलेलं हे एकमेव गीत आहे. बाबूजींच्या आवाजात हे गीत ऐकताना आजही, गळ्यातल्या नसा फाटतील की काय असा ताण त्या गायनात मला जाणवतो. एवढी सुरेख गीतं तुम्हाला सुचतात कशी काय? याच्याबद्दल मी गदिमांशी काही वेळा बोललो होतो. गदिमा असं म्हणत, ''वेद आणि ज्ञानेश्वर-तुकारामाचे अभंग अशा या समृद्ध साहित्य परंपरेची जाण असेल तर त्यांच्यामध्ये अभिव्यक्त झालेला आशयच मी चित्रपटागीतांच्या स्वरूपात व्यक्त करण्याचा प्रयत्न करत असतो. लोकगीते अभंगवाणी अशा साहित्याच्या संस्कारामुळेच गीतलेखनासाठी शब्द मिळतात.''

शब्दांकन : सुबोध केंभावी

सुधीर फडके तथा बाबूजी यांचा जन्म २५ जुलै १९१९ चा.. म्हणजे २५ जुलै २०१९ ते २४ जुलै २०२० हे त्यांचं जन्मशताब्दी वर्ष, तर २५ जुलै २०२० ते २४ जुलै २०२१ हे त्यांचं शताब्दीपूर्ती वर्ष.. डोंबिवली शहराशी असणारं त्यांचं नातं अगदी विशेष स्वरूपाचं.. बाबूजींनी गीतरामायणाचे असंख्य कार्यक्रम डोंबिवलीत केले.. त्यांच्या अमृतमहोत्सवी वर्षाचा सोहळा मुंबईनंतर डोंबिवलीतच पार पडला आणि आशाताई भोसले त्या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित राहिल्या.. सावरकर चित्रपट काढायचा ठरल्यानंतर निधीसंकलनासाठी पहिली बैठक बाबूजींनी डोंबिवलीतच घेतली आणि डोंबिवलीच्याच एका भगिनीने हातातली सोन्याची पाटली काढून ती बाबूजींच्या झोळीत टाकली.. त्यामुळेच बाबूजींच्या निधनानंतर लगेचच डोंबिवलीत स्वरतीर्थ सुधीर फडके स्मृती समिती स्थापन झाली. गेल्या १७-१८ वर्षात समितीने तिकीट न लावता असंख्य सांगीतिक उपक्रम डोंबिवलीत आयोजित केले.. डोंबिवलीतील सावित्रीबाई फुले रंगमंदिरात बाबूजींचा अर्धपुतळा बसवण्याचा संकल्प डोंबिवलीकरांनी सोडला आहे.. पेणचे प्रसिद्ध गणेशमूर्तिकार आनंद देवधर यांनी साकारलेला हा पुतळा लवकरच लोकार्पित होईल..

लढवय्ये बाबूजी!

सुधीर जोगळेकर

सुधीर फडके तथा बाबूजी यांच्या लढवय्येपणाचे किस्से तसे अनेक. त्यांच्यातल्या या लढवय्येपणानं त्यांच्यावर आलेल्या सर्व प्रकारच्या संकटातून, अडचणीतून त्यांची सुखरूप सुटका केली आणि त्यांनी हाती घेतलेलं कार्य तडीस गेलं. ही संकटमालिका सुरू झाली त्यांच्या वयाच्या अवघ्या नवव्या वर्षापासून आणि संपली ती सावरकर चित्रपटाच्या निर्मितीनं. मराठी तिसरीत असतानाची गोष्ट. त्यांच्या आईचं क्षयाच्या आजारानं निधन झालं आणि संकटांच्या मालिकेला प्रारंभ झाला. वडील मनानं खचले, उत्तम चालणारी वकिली हळूहळू कमी होत गेली आणि एका क्षणी बाबूजींच्या वडिलांनी पोटच्या सर्वात धाकट्या मुलाला, नारायणला, कोल्हापूर शहरात खाणावळ चालविणाऱ्या एका बाईंच्या ओटीत घालून टाकलं. घराची दुर्दशा सुरू झालेलीच होती, घरातला एकेक जिन्नस विकला जाऊ लागला होता. अशातच १९२९ साल उजाडलं, जमखंडीला राहणाऱ्या मामांकडे बाबूजी गेले असताना मुंबईचे प्रख्यात सर्जन भाजेकर यांनी बाबूजींचं गाणं एका खासगी मैफलीत ऐकलं आणि ते बाबूजींना मुंबईला घेऊन जाण्यासाठी मामांकडे हट्टच धरून बसले. ते साल होतं १९३०.

मुंबईशी नाते

१९३० ते २००२ असं मुंबईशी जोडलं गेलेलं तब्बल बहात्तर वर्षांचं बाबूजींचं नातं. मुंबईनं बाबूजींना खूप काही दिलं. नाव दिलं, प्रसिद्धी दिली, पैसा दिला आणि हातात घालून यावी अशी संकटांची मालिकाही दिली. पहिल्याच वर्षी सरस्वती संगीत विद्यालयाची शास्त्रीय संगीत स्पर्धा बाबूजींनी जिंकली. अब्दुल करीम खाँ साहेबांची एक चीज बाबूजी गायले आणि चमत्कार घडला. स्वतः खाँसाहेबांनीच स्पर्धेचा संकेत मोडून बाबूजींना आणखी एक चीज गायला सांगितली आणि टाळ्यांच्या कडकडाटात बाबूजी पहिला क्रमांक पटकावून खाली बसले. इतक्या लहान वयात मिळवलेलं हे यश देदीप्यमान असंच होतं, परंतु हातात आलेली संधी निसटून जाण्याचा पहिलाच प्रसंग तेव्हाच घडला. इतक्या लहान वयात या मुलाच्या बारा गाण्यांची रेकॉर्ड एकदम काढू नका, मुलगा शेफारून जाईल असा सल्ला बाबुराव गोखले यांनी दिला आणि ध्वनिमुद्रणाची कल्पनाच मोडीत निघाली. परंतु बाबूजी डगमगले नाहीत, 'जगाच्या पाठीवर' या आत्मचरित्रात बाबूजी लिहितात, बाबूरावांनी असं का केलं ते माहीत नाही, परंतु त्यामागचं कारण कळल्यावर मला धक्काच बसला. वास्तविक पाहता कुठल्याही यशान शेफारून किंवा अपयशानं खचून जाण्याचा माझा स्वभाव नाही. पुढल्या आयुष्यात अनेक धक्के मी सहन केले, संकटांचे प्रचंड डोंगर शिरावर घेतले, यातना सहन केल्या, पण अयोग्यांना, अन्यायांना आणि वरिष्ठांना जसा शरण गेलो नाही, तसाच उत्तम यश, कीर्ती, मानसन्मान आणि पैसा मिळवूनही माझ्यात अहंभाव निर्माण झाला नाही. संघर्षांना, संकटांना सामोरे जाण्यातले लढवय्येपणाचे असे कितीतरी क्षण पुढल्या आयुष्यात बाबूजींच्या वाट्याला यायचे होते..

संघानुकूल जीवन व्यवहार

आयुष्यात स्थिरस्थावर होण्यापूर्वी बाबूजींनी काही काळ धुळ्यात प्रचारक म्हणून काम केलं, पण स्थिरस्थावर झाल्यानंतर आणि प्रथितयश कलावंत बनल्यानंतर देखील त्यांचा जीवनव्यवहार संघानुकूलच राहिला. संघ सांगेल ते काम त्यांनी पुढेही पार पाडलं. संघाच्याच एका बौद्धिक वर्गात दादरा नगर हवेलीच्या मुक्तीचं आवाहन करण्यात आलं. योगायोगानं त्या बौद्धिक वर्गाला बिंदुमाधव जोशी आणि बाबासाहेब पुरंदरे उपस्थित होते. त्यांच्या साथीनं बाबूजींनी ते शिवधनुष्य उचलायचं ठरवलं आणि अवघ्या तीन महिन्यात तो प्रदेश मुक्तही झाला.

बाबूजींच्या लढवय्येपणाची खूणगाठ पटवणारे असेच आणखी दोन प्रसंग. त्यातला पहिला दादरा नगर हवेली मुक्तिसंग्रामातला आणि दुसरा गोवा मुक्तिसंग्रामात पोर्तुगिजांच्या हाती लागलेल्या आणि चौदा वर्षे लिस्बनमध्ये एकांतात खितपत पडलेल्या मोहन रानडे यांच्या सुटकेसाठी केलेल्या प्रयत्नांचा. ही सुटका झाली एप्रिल १९६९ मध्ये, २०१९ च्या एप्रिल महिन्यात या सुटकेचा सुवर्ण महोत्सव होता, त्या क्षणाला मोहन रानडे हयात होते, परंतु त्यानंतर अवघ्या दोनच महिन्यात त्यांचं निधन झालं आणि या लढ्याचा आणखी एक साक्षीदार हरपला.

गोवा मुक्तिसंग्राम हे त्यांच्या जीवनातलं एक लखलखीत पर्व. पोर्तुगिजांच्या ताब्यात असलेला भारतीय भूप्रदेश मुक्त करण्याचा वसा तर स्वातंत्र्यवीर सावरकरांकडून त्यांनी घेतलेला होता आणि 'परं वैभवम् ने तु मे तत् स्वराष्ट्रम' हे तर त्यांच्या जीवनाचं कधीचंच ब्रीदवाक्य बनलेलं होतं. दमणजवळचा दादरा पोर्तुगीज सत्तेतून मुक्त करण्याच्या लढ्यात ते प्रत्यक्ष सहभागी नव्हते, पण तो मुक्त झाला तोही जुलै महिन्यातच. आणि गोवा मुक्त करण्यासाठी सारं आयुष्य तुरुंगात कंठलेल्या आणि नंतर ज्याच्या सुटकेसाठी तब्बल सात वर्षे लढत दिली, त्या मोहन रानडे यांच्याशी बाबूजींची पहिली भेट झाली तीही जुलै महिन्यातच.

शिवधनुष्य

बाबूजींनी गोवा मुक्तिसंग्रामाचं शिवधनुष्य उचललं होतं तेही याच काळात. गोव्याहून नगरहवेलीसाठी कूच करत मोहन रानडे नगरहवेलीत पोचले होते तो दिवस होता २९ जुलैचा आणि आपल्या वाद्यपेट्यांचा बेमालूम वापर करत शस्त्रास्त्रं घेऊन बाबूजीही नगरहवेलीत पोहोचले होते ते त्याच जुलै महिन्यात. मोहन रानडे यांची आणि बाबूजींची भेट झाली होती ती ३१ जुलैला. बाबूजींच्या मनात गोवा मुक्तीची उर्मी चेतवली होती ती राजाभाऊ वाकणकर, नाना काजरेकर, शामराव लाड, विश्वनाथ लवंदे, प्रभाकर सिनारी, त्र्यंबक भट, आप्पा करमळकर यांनी. ते साल होतं १९५४. गोमंतकातली आणि पुण्या-मुंबईची ही मंडळी एकत्र येत, गुप्त बैठका करत आणि योजना आखत. त्या योजनेचं लक्ष्य असे, पोर्तुगीज सत्तेच्या या एका भागावर भारताचा कब्जा करून मग अधिक मोठ्या संग्रामासाठी सिद्ध व्हायचं. त्यासाठी लागणार होती, शस्त्रास्त्रं, दारूगोळा, शिबंदी, पैसा कुठून आणायचा हा प्रश्न होताच. भारत सरकारला पोर्तुगीज सत्ता हटायला हवी होती, पण स्वतः सरकार काही करू इच्छित नव्हतं. पोर्तुगीज सत्तेखालचा हा मुलूख एकदा नजरेखालून जाणं गरजेचं होतं. तपोवन आश्रमाच्या मदतीसाठी गाण्याचा कार्यक्रम करण्याच्या निमित्तानं बाबूजी ललिताबाईना घेऊन या भागात जाऊन आले. एकीकडे कार्यक्रम सुरू होता, ललिताबाई आणि बाबूजी गात होते, पण सारं लक्ष होतं तिथल्या बारीकसारीक गोष्टींवर. पोर्तुगीजांचा फौजफाटा किती आहे, स्थानिक लोकांचा

'सावरकर' चित्रपट : राष्ट्रकार्य

बाबूजींच्या दृष्टीने 'सावरकर' चित्रपट हा केवळ चित्रपट नव्हताच, ते होतं राष्ट्रकार्य, ती होती अग्निपरीक्षा. राष्ट्रकार्याच्या ध्यासानं पेटलेल्या क्रांतिकारकांनी आपल्या उभ्या आयुष्याचा होम कसा मांडला, आपल्या स्व-अस्तित्वाची समिधा त्या होमात कशी अर्पण केली याचे अनेक किस्से आपण भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या रोमहर्षक इतिहासात वाचले आहेत. सावरकर चित्रपट निर्माण करण्यासाठी बाबूजींनी वाहिलेली समिधा त्या प्रकारची होती. चित्रपटासाठी जमवलेला एकही पैसा स्वतःसाठी खर्च करायचा नाही हा कटाक्ष त्यांनी जपला.

कल काय आहे, प्रतिकार होण्याची शक्यता किती आहे? कार्यक्रम पार पडला आणि संगीतकार बाबूजींमधला सुधीर फडके बाजूला सरून स्वातंत्र्य सैनिक सुधीर फडके कामाला लागला. दोघंही सिल्व्हासात गेले, आजारी असल्याचं सोंग घेतलं. औषधोपचाराच्या निमित्तानं खूप फिरले. सगळा प्रदेश नीट पाहून घेतला. मुंबईला परतले आणि त्यांनी राजाभाऊ वाकणकर, नाना काजरेकर, प्रभाकर सिनारी यांना इत्थंभूत माहिती दिली. पुढल्या लढ्याची आखणी फडके यांच्याच घरी झाली आणि १९५४ च्या जुलैअखेरीस अमावास्येच्या गडद अंधारात, मुसळधार पावसात ही सारी मंडळी

नगरहवेलीच्या हद्दीला भिडली. भारतीय अधिकाऱ्यांनी त्यांना वापीला अडवलं, समजावण्याचा प्रयत्न केला, सिल्व्हासात जाऊ नका, सशस्त्र सैनिकांपुढे तुमचा टिकाव लागणार नाही, हे पटवून द्यायचा प्रयत्न केला, पण फरक पडणारच नव्हता. बाबूजी त्या अधिकाऱ्यांना म्हणाले, तुमची काहीही इच्छा असो, उद्या सकाळी आम्ही सिल्व्हासात प्रवेश करणारच.

३१ जुलै ते २ ऑगस्ट १९५४ या तीन दिवसात नगरहवेलीत ४७ नंतरच्या आणखी एका स्वातंत्र्यसंग्रामाला तोंड फुटलं. चेतवल्या गेलेली ऊर्मीला साकार करण्यासाठी बाबूजी घराबाहेर पडले ते एकट्याने नव्हे, पत्नीला बरोबर घेऊन. ललिताजी म्हणजे त्या काळातल्या आघाडीच्या पार्श्वगायिका ललिता देऊळकर. दादरा-नगरहवेली हे पहिलं लक्ष्य ठरलं, सिल्व्हासा तर सहजच ताब्यात आलं, नगरहवेलीही मुक्त झालं आणि भारताचा तिरंगा तिथे फडकायला लागला. त्यांनतर सुरू झालं गीतरामायणाचं पर्व. पण इकडे नगर हवेलीच्या संग्रामात मित्र बनलेल्या मोहन रानडेनं गोमंतकात उठाव केला होता, हा काळ होता १९५५ चा. मोहन रानडे त्या उठावात पकडले गेले होते आणि २८ वर्षांच्या बंदिवासात राहण्यासाठी त्यांना लिस्बनला पाठवण्यात आलं होतं. बाबूजींमधला सन्मित्र उभा राहिला तो त्या क्षणी.

गनिमीकावा

दादरा-नगरहवेली मुक्तिसंग्रामात सहभागी झालेली आणि त्या घटनांची साक्षीदार असलेली मोजकीच व्यक्तिमत्त्वे आज हयात आहेत. त्यातलेच एक आहेत बाबासाहेब पुरंदरे. दादरा-नगरहवेली मुक्त करण्याचा लढा ज्या मोजक्या तरुणांनी गुप्तपणेच हाती घेतला होता, त्यातलेच एक होते बाबासाहेब. वर ज्या २९ जुलै या तारखेचा उल्लेख झाला आहे त्या दिवशी, या तरुणांच्या पहिल्या तुकडीनं नारोळी ठाणं जिंकलं होतं आणि आगेकूच करून मोर्चा दादरा नगरहवेलीकडे वळवला होता. सुमारे १०२ जण त्या तुकडीत होते. हे बहुतांश तरुण संघ स्वयंसेवक होते. त्यामुळे संघशाखेवरील शारीरिक शिक्षणात जी प्रात्यक्षिकं करून घेतली जात, त्यांचा पुरेपूर उपयोग ते करत होते. त्यात गनिमीकाव्याचाही अंतर्भाव होता. पोर्तुगीज सैनिक अनेकदा फसले ते त्या गनिमी काव्यामुळे. जी काही मंडळी पुढील सूचनांसाठी एके ठिकाणी थांबली होती, त्यात बाबूजीही होते. अंगावर रेनकोट होता, शरीरयष्टी किरकोळ होती. हातात होती व्हायोलिनची पेटी. सुधीर फडके यांना ओळखणारी मंडळी ती पेटी बघून चकित होत होती. पण बाबूजींच्या त्या पेटीनेच पुढचे रणांगण गाजवले होते अशी नोंद इतिहासात आहे.

मोहन रानडे आणि बाबूजी एकमेकांना भेटले ते नगरहवेलीतच. मुंबईत पार पडलेल्या बाबूजींच्या अमृतमहोत्सवी सत्काराला मोहन रानडे उपस्थित होते. १५ ऑगस्ट १९५५ रोजी रानडे आणि बाबूजी सावंतवाडीत एकमेकांना भेटले. देशाच्या कानाकोपऱ्यांतून त्यांच्यासारखेच हजारो तरुण देशभक्त गोवा हद्दीवर जमले होते. साऱ्यांच्याच मनात जिद्द होती गोव्यात प्रवेश करण्याची, तयारी होती त्यासाठी प्राण द्यावे लागले तर ते देण्याची. प्रत्यक्षात तसंच घडलं. १५ ऑगस्टच्या सकाळी स्वातंत्र्याचा जयजयकार करत त्या तरुणांनी गोव्याच्या हद्दीत प्रवेश केला आणि पोर्तुगिजांनी केलेल्या भीषण गोळीबारात अनेकांना प्राण गमवावे लागले. हद्द भंगून गोव्यात गेलेले काही तरुण लपूनछपून पुढे तिथे राहिले, स्वातंत्र्यजागर अधिक बुलंद करण्यासाठी. त्यात मोहन रानडे होतेच. त्यानंतर काहीच दिवसांनी शस्त्रास्त्रं खरेदीसाठी त्यांना मुंबईत यावं लागलं, पण तेव्हाही त्यांचा मुक्काम सुधीर फडके यांच्याच घरी राहिला. शस्त्रखरेदी करून रानडे गोव्यात परत गेले, तरुणांना भेटत राहिले, लढा संघटित करत राहिले, परंतु तीन चार महिन्यांतच त्यांना अटक झाली. ऑक्टोबर १९५५ ते १९६९ अशी तब्बल १४ वर्षे रानडे यांना तुरुंगात काढावी लागली. पण या १४ वर्षातला

बिलोरी झुंबर

बाबूजी हे एक बिलोरी झुंबर मानावं इतक्या छटा त्या व्यक्तिमत्त्वाला प्राप्त झाल्या होत्या. संगीत क्षेत्रातील मापदंड ठरावं असं त्यांचं बहुरूपी व्यक्तिमत्त्व होतं. पण त्यांना वेड होतं ते लष्करच्या भाकऱ्या भाजण्याचं, त्यांनी व्रत अंगीकारलं होतं ते दिव्यदाहक स्वरूपाचं. इतिहासगौरव, विभूतिपूजन, धर्मनिष्ठा, राष्ट्रभक्ती आणि स्वातंत्र्यलालसा या गुणांचं पोषण त्यांच्या व्यक्तिमत्त्वात संघ संस्कारानं झालं होतं. असा संस्कार घडलेले, तो आयुष्याच्या अखेरच्या क्षणापर्यंत टिकवून धरले.

प्रत्येक दिवस बाबूजींनी रानडे यांच्या सुटकेच्या प्रयत्नासाठीच खर्ची घातला. वास्तविक पाहता गोवा मुक्त झाला होता तो डिसेंबर १९६१ मधेच. परंतु ६१ ते ६९ अशी आणखी आठ वर्षं रानडे यांना तुरुंगात काढावी लागली. अटक झाल्यानंतर संयुक्त अरब प्रजासत्ताकाचे भारतातील राजदूत भारत सरकारच्या वतीने रानडे यांना भेटायला जायचे होते. त्यांच्याबरोबर नेवरेकर नावाच्या एका भारतीय अधिकाऱ्यालाही जाण्याची संधी मिळाली होती. बाबूजी मार्गावर होतेच. पूर्वी गोव्यात भारतीय दूतावास होता तेव्हा तिथे काम केलेले नेवरेकर ते हेच, हे लक्षात येताच बाबूजी त्यांना जाऊन भेटले आणि माझ्या वतीने रानडे यांची चौकशी करून मी त्यांची आठवण काढली होती, एव्हढं सांगा अशी विनंती बाबूजींनी केली.

त्यामुळेच राजदूत भेटायला आल्याचं आश्चर्य वाटण्याऐवजी त्यांच्याबरोबर आलेल्या अधिकाऱ्यानं चक्क मराठीत केलेल्या विचारणेनं रानडे गहिवरून गेले होते. आपण तुरुंगात आहोत, परसत्तेच्या तुरुंगात आहोत, एकांतवासात जखडले गेलो आहोत, पण आपले देशबांधव आपल्याला विसरलेले नाहीत ही भावनाच रानडे यांना शब्दातीत आनंद देणारी ठरली होती. स्वातंत्र्यवीर सावरकरांचा 'लेखण्या मोडा, बंदुका हातात घ्या' हा संदेश प्रत्यक्ष कृतीत उतरवणारा संगीतकार, गायक, चित्रपटनिर्माता आपली आठवण ठेवतो आहे याचं त्यांना वाटलेलं वैशिष्ट्य विलक्षण होतं. फडके यांच्यातल्या कलावंतावर देशभक्तीनं केलेली मात रानडे यांना कायमची सुखावून गेली होती. बाबूजींच्या स्वभावातलं हे सौहार्द तेव्हढ्यापुरतं नव्हतं, ते पुढली चौदाही वर्ष अनुभवास यायचं होतं, याची खूणगाठ नकळतच त्यांच्या मनात मारली गेली होती.

१९६१ मध्ये गोवा स्वतंत्र झाला, परंतु गोव्याच्या मुक्ततेसाठी प्रयत्न करणारे भारतीय देशभक्त मात्र तुरुंगातच राहिले, किंबहुना गोवा स्वतंत्र करावे लागणार याची पूर्वकल्पना असल्यानेच गोव्याच्या तुरुंगातील मोहन रानडे, डॉ. तेलो मस्कारेन्हास यांना पोर्तुगीज सरकारनं पोर्तुगीज सैन्यदल आणि पोलीस दलासह पोर्तुगालला पाठवून दिलं. भारतापासून हजारो मैल दूर असलेल्या पोर्तुगालमधील काशीपशमधील कोठडीत दोघांना बंद करून ठेवलं होतं. रानडे आणि मस्कारेन्हास यांच्या सुटकेची साधी मागणीही भारत सरकारकडून करण्यात येत नव्हती. गोवा स्वतंत्र होऊन तीन वर्षे झाली तरी सुटकेचं नाव निघत नसल्यानं रानडे आणि मस्कारेन्हास यांची अस्वस्थता दिवसागणिक वाढत होती. अशातच अनपेक्षितपणे पुन्हा एकदा 'कसे आहात, फडक्यांनी तुमचा पत्ता मागितला होता, तो मी दिला आहे, त्यांनी तुम्हाला नमस्कार सांगितला आहे', असा निरोप रानडे यांना मिळाला आणि त्यांच्या आनंदाला पारावार उरला नाही.

वास्तव वेशीवर

१९६२ मध्ये पोर्तुगाल सरकारबरोबर राजनैतिक बोलणी झाली पण भारतीय राजबंद्यांच्या सुटकेचा प्रश्न तत्कालीन सरकारनं नीटपणे हाताळलाच नाही. राज्यकर्त्यांना दोघांच्या सुटकेसाठी केल्या जात असलेल्या विनंत्या ऐकायलाही सवड नव्हती हे वास्तव बाबूजींनी वेशीवर टांगलं. सरकारच्या धोरणातला गलथानपणा जनतेसमोर मांडला. तो लोकांच्या निदर्शनास आणून दिला. बाबूजी एव्हढ्यावरच थांबले नाहीत, त्यांनी मोहन रानडे-तेलो मस्कारेन्हास विमोचन समिती स्थापन केली. समितीत अनेकजण होते, पण धडपडत होते बाबूजीच. बाबूजी त्यासाठी किती वेळा गोव्याला गेले, तेथील सरकारी अधिकाऱ्यांच्या त्यांनी भेटी घेतल्या, तत्कालीन मुख्यमंत्री दयानंद बांदोडकर यांना भेटले, पोर्तुगीज भाषेतली कागदपत्रे इंग्रजीत करवून घेण्यासाठी परिश्रम घेतले. मोहन रानडे यांच्यासाठी वकिली करणाऱ्या प्रीती कामत यांना फोन केले, ब्राझील आणि मेक्सिकन वकिलांशी संपर्क साधला याची गणतीच नाही. बाबूजी त्यासाठी इंग्लंडला गेले. रानडे यांच्या वृद्ध मातोश्री सांगलीला राहतं बाबूजी त्यांना धीर द्यायला सांगलीला जात आणि तुला सोडवू असा धीर देणारी पत्रे रानडे यांना लिहीत.

स्वतंत्र भारताचे दोन सच्चे देशभक्त विदेशात कसे गजाआड पडले आहेत आणि सरकार त्यासाठी ढिम्मही हालचाल करीत नाही याविषयीची चीड बाबूजींनी समाजात उत्पन्न केली. हा प्रश्न भारतीयांपुरता मर्यादित न ठेवता तो आंतरराष्ट्रीय पातळीवर नेला. लंडनमधील अँम्नेस्टी इंटरनॅशनलचे दरवाजे ठोठावले. त्यांच्या या प्रयत्नानं अखेर १९६९ साली रानडे आणि मस्कारेन्हास यांची सुटका झाली. 'मोहन रानडेंची सुटका म्हणजे सुधीर फडके आणि सुधीर फडके म्हणजे मोहन रानडेंची सुटका' हे समीकरणच बनलं होतं असा तो काळ होता.

प्रखर देशभक्ती

बाबूजींनी हे का केलं असावं असा प्रश्न आपण आपल्यालाच विचारतो तेव्हा आणखी अनेक उपप्रश्न मनात उभे राहतात. रानडे हे काही फडके यांचे नातेवाईक नव्हते, तेलो मस्कारेन्हास तर नातेवाईक असण्याचा प्रश्नच उद्‌भवत नव्हता, परंतु त्या तिघांना एकत्र बांधणारा समान धागा होता तो प्रखर देशभक्तीचा. संघाच्या संस्कारात बाबूजी वाढले होते, धुळे जिल्ह्यातल्या शहादा तालुक्यात काही काळ त्यांनी संघ प्रचारक म्हणून कामही केलं होतं.

सुधीर फडके हे भावसंगीतातले घराणेदार स्वरपुरुष होते. त्यांनी आपल्या सगळ्यांमध्ये शब्द-स्वरांचे एक अतूट नाते निर्माण केले. त्या नात्याने आपण इतके घट्ट बांधले गेलो, की आजच्या धावपळीच्या आणि भावनिक कल्लोळाच्या काळातही हे नाते आपले आयुष्य आणखी संपन्न करते. आज ऐकू येत असलेल्या चित्रपट संगीतात कधीतरी चुकूनमाकून सुधीर फडके यांनी स्थापित केलेला स्वरपुंज ऐकायला मिळाला, तरी कुणाही मराठी माणसाचे कान चटकन टवकारतात. डोळे लकाकतात आणि मनात एक सुखद लहर पसरते.

शब्दांचा राजविलास

मुकुंद संगोराम

एकोणिसाव्या शतकाच्या आरंभीच्या काळात 'भावगीत' या नव्या संगीत प्रकाराची जी प्रतिष्ठापना महाराष्ट्रात झाली, त्याने संगीताच्या दुनियेत शब्दांचा राजविलास सुरू झाला. शब्दांच्या अर्थाला प्रवाहित करणारे संगीत ही भावगीताची मुख्य गरज होती. त्यासाठी उत्तम काव्याची आवश्यकता होती. हा समसमा संयोग जुळवून आणणाऱ्या जी. एन. जोशी या प्रतिभावानाला हजारो दंडवत घालायला हवेत. भारताच्या इतर प्रांतात, मुख्यत: उत्तरेकडील राज्यांत ठुमरी, होरी, गजल यासारखे ललित संगीताचे प्रकार खूपच लोकप्रिय आहेत. त्यामध्ये शब्दांचे महत्त्वही मोठे आहे. महाराष्ट्रातील संगीताच्या दुनियेत भावगीताचा प्रवेश झाला आणि एका वेगळ्याच प्रकारच्या संगीताचा आस्वाद मराठी जनांना मिळू लागला.

गेल्या शतकभराच्या काळात भावगीताच्या क्षेत्रात अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त करणारे सुधीर फडके, हे या दुनियेचे राजे आहेत, यात शंका नाही. जवळजवळ पाच दशके त्यांनी हे राजेपद अनभिषिक्तपणे सांभाळले, त्याला समृद्धीचा वारसा दिला आणि लोकप्रियतेच्या शिखरावरही नेऊन ठेवले. परंतु हे सारे करण्यासाठी सुधीर फडके ऊर्फ बाबूजींनी आपली प्रतिभा सतत टवटवीत ठेवली. इतकी वर्षे सतत नवीन संगीत तयार करण्यासाठी त्यांनी आपली सगळी क्षमता कायमच पणाला लावली. भावगीताच्या संस्थापनेची प्रेरणा ज्या नाट्यसंगीतातून झाली, त्या नाट्यसंगीताची नाळ नंतरच्या चित्रपट संगीताशी जोडली जाणे अगदीच स्वाभाविक होते. त्यामुळे बाबूजींनी चित्रपट संगीताच्या क्षेत्रातही आपले असामान्यत्व सिद्ध केले.

सौंदर्याचा ध्यास

अभिजात संगीताचे शास्त्रशुद्ध शिक्षण घेतलेल्या बाबूजींना स्वरांमधून निर्माण होणाऱ्या सौंदर्याचा ध्यास होता. त्यांनी संगीत दिलेल्या शेकडो गीतांमध्ये हे सौंदर्य किती भरलेले आहे, याची प्रचिती आपल्याला आजही येते. त्यांच्या जन्मशताब्दीच्या वर्षातही त्यांची स्वरांची ठेव आपण अतिशय हळव्या मनाने सांभाळून ठेवतो आहोत, हे त्यांच्या संगीताचे सर्वात मोठे सामर्थ्य आहे.

पाच दशकांहून अधिक काळ आपली प्रतिभा ताजीतवानी ठेवणाऱ्या सुधीर फडके यांनी मराठी माणसावर अनंत उपकार केले आहेत. उपकार अशासाठी म्हणायचं, की त्यांनी सतत नव्याचा शोध घेताना मराठी माणसाच्या मनातली स्पंदनं जाणली होती. नुसतं चकाकणारं आणि क्षणार्धात संपून जाणारं, त्याचा मागमूसही न राहणारं जे ललित संगीत आज आपण ऐकतो आहोत, त्यापेक्षा खूप वेगळं आणि ताकदीचं संगीत त्यांनी निर्माण केलं. ललित संगीतातल्या या फडके घराण्याच्या खाणाखुणा आजही तरळतात, तेव्हा हरखून जायला होतं. चित्रपट संगीत आणि भावगीतांच्या दुनियेतील सुधीर फडके यांची सफर प्रत्येकाला पुरेपूर आनंद देणारी ठरली. आपलं प्रत्येक गीत ही एक नक्षीदार कलाकृती व्हावी, यासाठी आपली सारी प्रतिभा पणाला लावणाऱ्या बाबूजींनी त्यांच्या प्रत्येक गीतात मराठी माणसाचं मराठीपण असं काही ठासून भरलं की त्यांच्यासाठी ते गीत हृदयस्थ होऊन गेलं. काहीच दशकं आधी सुरू झालेल्या या ललित संगीताच्या नव्या परंपरेत त्यांनी केलेली कामगिरी म्हणूनच अपूर्वाईची झाली आणि कीर्तन, भजन, अभंग, लावणी या दीर्घ परंपरेतल्या संगीताला अभिजातता मिळवून देणाऱ्या परंपरेचे सुधीर फडके हे नायक ठरले. संगीतातील

लालित्य किती सुंदर आणि सामर्थ्यवान असू शकते, याचं बाबूजींनी घडवलेलं दर्शन म्हणजे प्रत्येक मराठी माणसाच्या मनातील अत्तराची कुपीच.

शब्द आणि संगीत यांनी फार पूर्वीच एकत्र यायचं ठरवलं होतं. म्हणजे भाषेच्या निर्मितीपाठोपाठ असं घडणं स्वाभाविकच होतं असं नाही. माणसाच्या मेंदूतून जेव्हा अनेकविध कल्पना साकारायला

सुरुवात झाली, तेव्हा त्यानं आधीच निर्माण केलेल्या संगीतात शब्दाचा उपयोग करण्याचा प्रयोग केला असणार. नंतरच्या काही हजार वर्षांमध्ये तो उपयोग माणसाच्या कलासंस्कृतीचा अविभाज्य भाग बनेल, असं भाकीत तेव्हा कुणी केलं असेल की नाही कुणास ठाऊक? पण शब्द आणि स्वरांचा हा संकर शुभ ठरला एवढं मात्र, नक्की! हा शुभसंकर स्थानिक संस्कृतीचं प्रतिनिधित्व करतो. ही संस्कृती केवळ भाषेतून व्यक्त होत नाही, तर तिला तिथल्या मातीत मिसळलेल्या सांगीतिक प्रवाहांची साथ मिळते. केवळ हिंदी गीत आहे, म्हणजे त्याच्यावर केलेले स्वरसंस्कार हिंदी असतात, असं नाही. हे स्वरांचे साज तिथल्या शतकानुशतकाच्या परंपरांचं एक टोकदार रूप बनतात, तेव्हाच ते त्या गीताला प्रवाही बनवतात आणि स्वरांवर आरूढ झालेल्या त्या गीतातील अर्थ अगदी विनासायास आपल्यापर्यंत पोहोचवतात. इटलीमधलं किंवा आफ्रिकेतलं संगीत कन्नड भाषेतील गीतामध्ये गायलं, म्हणून ते कन्नड होत नाही, याचं भान संगीतातल्या प्रत्येक सर्जनशील कलावंताला असतं. शब्द संगीताच्या क्षेत्रात महाराष्ट्रानं नाट्यसंगीताच्या रूपानं मुहूर्तमेढ रोवली. रागदारी संगीतातील बंदिशी म्हणजे कविता किंवा गीतं नव्हेत, मात्र ठुमरी, गज़ल, नाट्यसंगीत हे प्रकार शब्दांचं संगीतातलं स्थान वाढवणारे होते, यात शंकाच नाही. भावगीतांनी शब्द आणि स्वर यांचं जे कलात्मक मिश्रण घडवून आणलं, त्यानं वेगळ्याच मानसिक आणि बौद्धिक आनंदाच्या संमिश्र अनुभूतीला सामोरं जाण्याची क्षमता रसिकांमध्ये निर्माण झाली.

स्वरांची तालीम

सुधीर फडके यांना स्वरांची जी तालीम मिळाली, ती अस्सल घराणेदार होती. वडील वकील असल्यानं घरातलं वातावरणही वेगळं होतं. आईच्या निधनानंतर ओढवलेल्या अशक्य कोटीतल्या संकटांना सामोरं जाताना प्रत्येक वेळी फक्त स्वरांनी त्यांना संगत केली. कुणावरही येऊ नयेत, असे अनेक अनवस्था प्रसंग बाबूजींवर ओढवले. गाणंच करायचं ही जिद्दही गळून पडावी, अशा या प्रसंगांचा जराही ओरखडा त्यांनी आपल्या संगीतावर उमटू दिला नाही. केवळ परिस्थितीनं त्यांना अभिजात संगीताच्या क्षेत्रात राहू दिलं नाही. पण त्यावर मात करत राम फडके यांचं सुधीर फडके असं नवं रूप जगासमोर आलं.

स्वरांचे अस्तर

'गीतरामायण' हा भारतीय भावसंगीतातील एक चमत्कार होता. ज्या काळात आजच्यासारख्या रोजच्या मालिकांचा विचारही शिवलेला नव्हता आणि कोणतीही कला अथपासून इतिपर्यंत एकाच दमात रसग्रहण करण्याची सवय होती, त्या काळात सलग वर्षभर आकाशवाणीवर गीतमालिका सादर करण्याचे असामान्य धैर्य ग. दि. माडगूळकर आणि सुधीर फडके यांनी दाखवले. धैर्य अशासाठी की, त्यापूर्वी असा प्रयोग झाला नव्हता. त्यामुळे त्याच्या यशापशाची खात्री नव्हती. भिस्त असलीच, तर या दोन्ही शब्द-स्वरप्रभूंच्या सर्जनशीलतेवर होती. असामान्य पातळीवर नेऊन ठेवलेला हा शब्द आणि स्वरांचा शुभसंकर मराठी मनाच्या गाभाऱ्यात आज सहा दशकांनंतरही मंद तेवत आहे. याचे श्रेय या गीतमालिकेतील अस्सल मराठीपणाला द्यायला हवे. गदिमा यांच्या शब्दकळेला साजेसा स्वरसाज देणे म्हणजे शब्दांना सुरात भिजवून काढण्याएवढे सोपे नव्हते. त्यासाठी त्या गीताला असलेले स्वरांचे अस्तर शोधून काढण्याची आवश्यकता होती. असे अस्तर असणाऱ्या कवितेचेच गीत होते आणि संगीतकाराला त्याचा शोध लागतो, तेव्हाच त्याला पूर्णताही येते. 'गीतरामायणा'तील बहुतेक गीते अशी आहेत. सर्जनाच्या आव्हानांना इतक्या आत्मविश्वासाने सामोरे जाण्यासाठीची कलात्मक ताकद माडगूळकर आणि फडके या दोन्ही प्रज्ञावानांकडे होती, म्हणूनच हा चमत्कार घडू शकला.

सुखनिधान

बालगंधर्व हे त्यांचं सुखनिधान होतं. ललित संगीतातील एक चमत्कार म्हणावा, अशा बालगंधर्वांचं सततचं स्मरण बाबूजींनी आपल्या संगीतात केलं. आपल्या संगीतात त्यांनी बालगंधर्वांची इतकी रूपं साकारली आहेत, की त्यामुळे कुणाही मराठी माणसाला ते गाणं क्षणार्धात आपलं, खास आपलंच वाटावं. गोड आवाज, स्वच्छ शब्दोच्चार, अर्थाला प्रवाही करणारी स्वररचना आणि सादरीकरणातील कमालीचा आत्मविश्वास ही सुधीर फडके यांची वैशिष्ट्ये म्हणजे मराठी भावगीत परंपरेचीच खूण बनली.

असामान्य घटना

शब्दांना चित्रांचा साक्षात्कार घडवण्यासाठी केवळ कौशल्य असून चालत नाही. शब्दांना सामोरे जाताना केवळ त्यातील भावदर्शनाचा विचार करूनही चालत नाही. शब्दांच्या अर्थांचे पदर उलगडताना, त्यातून व्यक्त होणाऱ्या अर्थांच्या पलीकडे जाऊन त्यांना चित्रांची क्षमता बहाल करतानाच ते स्वरोत्सुक होणे हीही अतिशय नाजूक आणि सर्जनशील घटना असते. प्रत्येक उत्तम भावगीतामध्ये अशाच प्रकारच्या घटना एकत्र आलेल्या दिसतात. किंबहुना जी भावगीते आजही काळाच्या कसोटीवर टिकली आहेत, त्यामध्ये हे घडले आहे, असे म्हणता येते. 'गीतरामायण'मध्येही हे असेच झाले. ते ठरवून झाले नाही. कलेच्या क्षेत्रातील सर्जनाच्या अनेक उत्कट बिंदूंना कोणताही कार्यकारणभाव नसतो. निर्मितीचे आडाखे अनेकदा उन्मळून पडल्याचा अनुभव अगदी कसलेल्या कलावंतांनाही अनेकदा येतो. त्यामुळे एखादी निर्मिती अशीच होईल, असा गर्व न बाळगता तिच्या निर्माण प्रक्रियेला मुक्त मनाने शरण जाणे एवढेच कलावंताच्या हातात असू शकते. या गीतांबाबत असेच काही झाले असावे, असे वाटते. एकापाठोपाठ एक अशा ५६ निर्मितीच्या घटना किमान पातळीवर घडवणे ही किती अशक्य गोष्ट असते, हे कलावंतांना कळू शकेल. पहिल्यापासूनच लोकप्रियतेच्या शिखरावर पोहोचल्यामुळे येणारे मानसिक दडपण लक्षात घेतले तर 'गीतरामायण' ही किती असामान्य घटना आहे, हे समजू शकेल.

ग्राहक चळवळीला प्रारंभी बाबूजी अध्यक्ष म्हणून लाभले, पां. वा. गाडगीळ आणि मधुकर मंत्री त्यांच्या जोडीला होते. या तिघांमुळे आत्ताची मुंबई ग्राहक पंचायत समर्थपणे उभी राहिली. उत्तम दर्जा, बाजारभावापेक्षा कमी किंमत, प्रामाणिक, पारदर्शी व विश्वासार्ह कार्यपद्धतीमुळे आजही चळवळ केवळ टिकलीच नाही तर वाढतही आहे!

ग्राहक चळवळीचा आधारस्तंभ

आप्पासाहेब (ग.के.) गोडबोले

१९७५ मध्ये मुंबईत राहत असताना एकदा मी व माझी पत्नी प्रतिभा रस्त्यानं जात असताना जनसंघाचे मधुकर मंत्री वाटेत भेटले आणि म्हणाले की, 'आज रात्री बाबूजींच्या (प्रसिद्ध संगीतकार – गायक सुधीर फडके) घराच्या गच्चीवर एक सभा घ्यायचं ठरलं आहे, त्या सभेला तुम्ही दोघंही या. पुण्याचे बिंदुमाधव जोशी आलेले आहेत आणि ते ग्राहक चळवळीवर बोलणार आहेत.'

एका कार्यक्रमात बाबूजी आप्पासाहेब गोडबोले यांचा सत्कार करताना.

मंत्रींनी असं सांगितल्यावर आम्ही दोघंही त्या सभेला गेलो. तेव्हाच आमची बाबूजींशी ओळख झाली. बिंदुमाधव जोशींनी पुण्यात याआधीच ग्राहक चळवळ सुरू केली होती. त्याच धर्तीवर मुंबईत ग्राहक चळवळ सुरू करण्यासंबंधीची ही सभा होती. मंत्रींनी राजकारण सोडून ग्राहक चळवळीलाच वाहून घ्यायचं ठरवलं होतं. मीही नोकरीव्यतिरिक्त दुसरं काही करता येतं का, ते पाहावं म्हणून प्रथम राजकारणाकडे वळलो होतो. जनसंघात माझे काही स्नेही होते म्हणून तिथं गेलो. मंत्रींचा परिचयही तेव्हाचाच. पण लवकरच लक्षात आलं की, राजकारण आपल्या स्वभावात बसणारं नाही, म्हणून तिथून बाहेर पडलो आणि अचानक मंत्रींच्या बोलावण्यानं ही सुंदर संधी आमच्यासमोर चालून आली. पहिली बैठक अगदीच अनौपचारिक होती. या बैठकीला अर्थातच सुधीर फडक्यांबरोबर बिंदुमाधव जोशी, पां.वा. गाडगीळ आणि मधुकर मंत्री तसेच इतरही बरेचजण होते. जोशींनी ग्राहक चळवळीची संकल्पना समजावून सांगितली. त्या वेळी बाबूजींनी दूरदृष्टीनं प्रतिग्राहक दरमहा १ रु. सदस्यशुल्क घेण्याचा प्रस्ताव मांडला. हा प्रस्ताव खरोखर किती दूरदृष्टीचा होता हे कालांतरानं सिद्धही झालं! दुसऱ्या दिवशी लगेचच ज्यांना काम करण्याची इच्छा आहे अशांची पुन्हा बैठक झाली. त्याला आम्ही दोघेही गेलो होतो.

जनता ग्राहक महासंघ

सुरुवातीला या चळवळीला जनता ग्राहक महासंघ असं नाव होतं. ग्राहक संघटना बांधण्यासाठी २५ कुटुंबांनी एकत्र येऊन एक गट तयार करायचा, त्याला 'ग्राहक संघ' असं नाव राहील, असे सर्व गट एकत्र येऊन महासंघ तयार करतील. या महासंघाचं नाव 'जनता ग्राहक महासंघ' असं राहील असं ठरलं. (कालांतरानं 'मुंबई ग्राहक पंचायत' असं नाव झालं.) मधुकर मंत्री या संस्थेचे कार्यवाह, बाबूजी अध्यक्ष आणि पां.वा. गाडगीळ उपाध्यक्ष झाले. ही मोठी माणसं संस्था सुरू करण्यात, तिचा प्रसार करण्यात आणि मार्गदर्शन करण्यात पुढे असल्यानं संस्थेला चांगलाच आधार होता. 'ना नफा ना तोटा' या तत्त्वावर ग्राहकांनी थेट उत्पादकांकडून किंवा घाऊक बाजारातून माल आणून आपापसांत वाटून घेणं, ही मुख्य कल्पना होती. वाटपातील अत्यंत महत्त्वाची कामं आम्ही दोघांनी स्वीकारली. प्रतिभा खरेदी समितीची अध्यक्ष झाली. तिला नीला गोविलकर व इतर सहकारी मिळाले तर मी आणि अनंतराव पेंडसे वाटपयंत्रणेचे प्रमुख म्हणून काम करू लागलो.

पहिल्याच बैठकीनंतर २८ ग्राहक संघ तयार झाले. विश्वासार्ह माणसं असल्यानं सुरुवातीपासूनच मोठा प्रतिसाद मिळत गेला. इतके ग्राहक मिळाल्यावर अन्नधान्य व वस्तुवाटपाचा प्रश्न निर्माण झाला. आमच्याकडे तर जागा नव्हती. संस्थेचं कार्यालय म्हणून त्या वेळी आमच्या दोन खोल्यांच्या घरातूनच काम चालत होतं. सुरुवातीला मधुकर मंत्रींच्या सोसायटीतल्या पटांगणात, नंतर अशोक रावत या आमच्या सहकाऱ्याच्या गोडाऊनमध्ये, डॉ. नरवणेंच्या दादरच्या व्यायामशाळेत असं एकेकदा वाटप केल्यानंतर कायमस्वरूपी जागा शोधणं क्रमप्राप्त होतं. त्यामुळे बाबूजी, पां.वा.

घरी देव आला

ग्राहक संघाच्या कामांची नीट घडी बसेपर्यंत ३–४ महिने बाबूजी सर्व ठिकाणी हजर असत. सुरुवातीच्या ३ महिन्यांतली तीन वाटपांची ठिकाणं आणि नंतर बालमोहनमध्ये धान्यवाटप सुरू झालं, त्या वेळी धान्यपोत्यांच्या धुळीचा वगैरे त्रास होऊ लागल्यानं त्यांचं प्रत्यक्ष वाटपयंत्रणेच्या ठिकाणी येणं बंद झालं. कारण संगीत क्षेत्रात कार्यरत असल्यानं आवाज सांभाळणं गरजेचं होतं. पण वाटपाबद्दलचा ग्राहकांचा प्रतिसाद जाणून घेण्यासाठीच्या सभेला, कार्यकारिणी सभेला ते न चुकता येत असत. त्या वेळी मी बादल–बिजली–बरखा जवळच्या गुडविल बिल्डिंग मध्ये राहत होतो. बैठका माझ्या घरी सुरू झाल्यावरही प्रत्येक बैठकीला ते येत असत. त्या वेळी अगदी आमच्या स्वयंपाकघरापर्यंत त्यांचा वावर असे. नवा ग्राहक संघ तयार करताना दुसऱ्या एखाद्याकडे बैठक असेल तर त्यांनाही सुधीरभाऊ आपल्या घरी आल्याचा आनंद व्हायचा. लोकांचं त्यांच्यावर कमालीचं प्रेम होतं! संध्याकाळी सुरू झालेली बैठक रात्री ९–१० पर्यंत चालायची. त्या घरीच जेवणं व्हायची. त्या घरातल्या बायका तर 'आमच्या घरी देवच आलाय आज' असं म्हणत. बाबूजींची कामावर प्रचंड निष्ठा होती. एकदा त्यांच्या पायाला प्लास्टर होतं, त्याही स्थितीत ते बैठकीला आले. मुंबई ग्राहक पंचायतीचं पूर्ण बस्तान बसल्यानंतर मात्र ५ वर्षांनी सुधीरभाऊंनी काम सोडलं.

गाडगीळ आणि मधुकर मंत्री हे 'बालमोहन'च्या दादासाहेब रेगे यांना भेटायला गेले. ग्राहक चळवळीसाठी शनिवार–रविवारी धान्य वजनाचं काम करण्यासाठी शाळा उपलब्ध होईल का, असं बाबूजींनी विचारल्यावर दादासाहेबांनी अगदी सुरेख उत्तर दिलं – 'ज्या गळ्यातून अजरामर गीतरामायण गायलं गेलं त्याचं गळ्यातून जागेकरता विचारणा होतेय, त्याला मी नाही कसं म्हणणार? तुम्ही शनिवारी दुपारी शाळा सुटल्यापासून रविवारी संध्याकाळपर्यंत बालमोहनची मधली मोकळी जागा वापरू शकता.' असं उत्तर मिळताच आमचा जागेचा मोठा प्रश्न सुटला. सुमारे दोन वर्षं आमचं काम तिथून चाललं आणि कामाची प्रगती जलद झाली. रेग्यांनी केवळ जागाच दिली असं नाही तर वाटपानंतर शिल्लक राहिलेल्या वस्तू व धान्य ते त्यांच्या तळेगावच्या निवासी शाळेसाठी आमच्याकडून विकत घेत असत. एवढंच नाही, तर आम्ही आमच्या कामासाठी त्यांचा टेलिफोन वापरत असू त्याचे पैसेही ते कधी घेत नसत.

त्यांच्याशी माझा व पत्नीचा संपर्क ग्राहक पंचायतीच्या कामाच्या निमित्तानं जास्त आला. सिनेक्षेत्राशी निगडित असूनही वागणंबोलणं अतिशय स्वच्छ होतं त्यांचं. त्यांचा मुलगा श्रीधर त्या वेळी परदेशात शिक्षणासाठी गेला होता. नंतर भारतात आल्यावर काही वर्षे नोकरी करून तोही संगीताकडे वळला. आम्हाला बाबूजींच्या घरी जाण्याचा योगही खूप वेळा आला. ग्राहक पंचायत आणि संगीत क्षेत्रातले लोक त्यांच्या घरी येत–जात असत. बाबूजी अतिशय साधे होते. त्यांच्या कामातली निष्ठा, पारदर्शकता यामुळे मुंबई ग्राहक पंचायतीचं काम सुरुवातीपासूनच जोमानं सुरू झालं व टिकून राहिलं आणि वाढलंदेखील. बाबूजींनी सुरुवातीला मांडलेली प्रतिग्राहक दरमहा १ रु. सदस्य शुल्क घेण्याची कल्पना किती दूरदृष्टीची होती हे हळूहळू सगळ्यांच्या लक्षात आलं. चळवळ जोमानं चालवण्यासाठी या निधीचा उपयोग करता येईल. कुणाच्या दातृत्वावर अवलंबून राहावं लागणार नाही. बहुतेक सर्व सामाजिक संस्था पैशाकरता सरकारवर, नगरपालिकांवर किंवा एखाद्या धनाढ्य व्यक्तीवर अवलंबून राहतात. अर्थातच त्याचा त्यांच्या कार्यावर दबाव येऊ शकतो. हे होऊ नये म्हणून बाबूजींची ही कल्पना महत्त्वाची ठरली. चळवळीला आर्थिक स्थैर्य आलं. चळवळ वाढली तसं ग्राहक पंचायतीला स्वतःची कार्यालयाची जागा, स्वतःचं गोडाऊन, वाटपवाहनं, कार्यालयाचा खर्च, कर्मचाऱ्यांचे पगार, तक्रारनिवारण केंद्रं, न्यायालयातले कज्जे आदी सर्व खर्च या वर्गणीतून भागवता आले, भागवले जात आहेत. कालानुरूप १ रु. वर्गणीत वाढ करण्यात आली. पण १९७५ साली सुरू झालेली १ रु. वर्गणी आज फारतर १५ रु. झाली असेल. आज अंदाजे ३५ हजार सदस्य आहेत. बाबूजींची ही कल्पना इतकी चपखल होती की, आंतरराष्ट्रीय ग्राहक परिषदांना प्रतिनिधी पाठवायची वेळ आली तेव्हाही या निधीचा उपयोग झाला. जागतिक ग्राहक संस्थांची शिखरसंस्था असलेल्या कन्झ्युमर इंटरनॅशनलच्या सेक्रेटरींनाही वितरणाची आणि प्रसार व इतर खर्चासाठी वर्गणी घेण्याची संकल्पना आवडली. पैसे भरल्यानंतरच धान्य–वस्तू वाटप करायचं हे तत्त्व आम्ही कसोशीनं पाळलं. त्यामुळे ग्राहक संघ तरला. उधारीने संस्था लयाला जातात हे पाहिल होतं. ते आम्ही होऊ दिलं नाही. १९७५च्या गुढीपाडव्याला सुरू झालेलं काम १९८५ साली आम्ही मुंबई सोडली तेव्हा सोडलं पण बाबूजी सुरुवातीला अध्यक्ष म्हणून लाभले, पां. वा. गाडगीळ आणि मधुकर मंत्री त्यांच्या जोडीला होते. या तिघांमुळे आत्ताची मुंबई ग्राहक पंचायत समर्थपणे उभी राहिली आणि उत्तम दर्जा, बाजारभावापेक्षा कमी किंमत, प्रामाणिक व पारदर्शी व विश्वासार्ह कार्यपद्धतीमुळे आजही ती केवळ टिकलीच नाही तर वाढतही आहे!

आप्पासाहेब गोडबोले यांचा परिचय

आप्पासाहेब गोडबोले यांचे वय ९८ वर्ष आहे. त्यांनी मुख्यतः कंपनी सेक्रेटरी म्हणून नोकरी केली. मुंबई ग्राहक पंचायतीचं काम केल्यानंतर देवळालीला लेस्ली सॉनी सेंटरला व्यवस्थापकीय संचालक आणि निवासी संचालक म्हणून नोकरी केली. या सेंटरमध्ये इतर अनेक सामाजिक संस्थांच्या कार्यकर्त्यांप्रमाणेच ग्राहक पंचायतीचं काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचंही प्रशिक्षण होई.

शब्दांकन : राधिका कुलकर्णी

असे होते गदिमा

गजानन दिगंबर माडगूळकर : (**जन्म :** शेटफळे–सांगली जिल्हा, १ ऑक्टोबर १९१९; **मृत्यू :** पुणे, १४ डिसेंबर १९७७). हे विख्यात मराठी गीतकार, कवी, पटकथा–संवाद–लेखक–अभिनेते होते.

- गदिमांचा जन्म 'शेटफळे' या त्यांच्या आजोळी झाला तर, बालपण अत्यंत गरिबीत 'माडगुळे' या गावात गेले. त्यांचे वडील औंध संस्थानात कारकून होते. त्यांचे शिक्षण नॉन मॅट्रिक. आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना शिक्षण सोडावे लागले. वयाच्या १६–१७ व्या वर्षी त्यांनी मराठी चित्रपटसृष्टीत प्रवेश केला. सुरुवातीला ब्रह्मचारी, ब्रँडीची बाटली यांसारख्या काही चित्रपटांत सहायक नटाच्या भूमिका केल्या.
- भक्त दामाजी (१९४२), पहिला पाळणा (१९४२) या चित्रपटांत त्यांना पहिल्यांदा गीत लेखनाची संधी मिळाली.
- लोकशाहीर राम जोशी (१९४७) चित्रपटापासून खऱ्या अर्थाने कथा, पटकथा, संवाद, गीते लेखनाचा त्यांचा प्रवास सुरू झाला. आणि बघता बघता माडगूळकर हे नाव मोठे झाले.
- मराठी चित्रपटांसाठी त्यांनी १५७ पटकथा आणि २००० पेक्षा जास्त गाणी लिहिली आहेत. त्यांनी लिहिलेली 'गोरी गोरी पान', 'नाच रे मोरा', 'मामाच्या गावाला जाऊ या' अशी बालगीते आजही प्रसिद्धीच्या शिखरावर आहेत. 'बुगडी माझी सांडली गं', 'इंद्रायणी काठी', 'विठ्ठला तू वेडा कुंभार' यांसारखी त्यांनी लिहिलेली शेकडो गीते अजरामर आहेत.
- त्यांनी १६ लघुकथासंग्रह, १२ काव्यसंग्रह, बालकांसाठी ४ पुस्तके, २ कादंबऱ्या, २ संकीर्ण, युद्धाच्या सावल्या हे नाटक लिहिले आहे. याशिवाय त्यांनी शब्दरंजन, धरती, अक्षर या मासिकांचे संपादनही केले आहे.
- गदिमांना महाकवी व आधुनिक वाल्मीकी ही पदवी ज्यामुळे प्राप्त झाली ते महाकाव्य म्हणजे गीतरामायण.
- एप्रिल १९५५ ते एप्रिल १९५६ दरम्यान हा कार्यक्रम पुणे आकाशवाणीने प्रसारित केला. यामध्ये गदिमांनी रामकथा

गीताचे बोल	चित्रपट	संगीतकार
अनुपमेय हो सुरू	गीत रामायण	सुधीर फडके
अपराध मीच केला	वंदे मातरम	सुधीर फडके
आईसारखे दैवत साऱ्या	वैशाख वणवा	दत्ता डावजेकर
आज कुणीतरी यावे	मुंबईचा जावई	सुधीर फडके
इंद्रायणी काठी	गुळाचा गणपती	पु.ल.देशपांडे
एक धागा सुखाचा	जगाच्या पाठीवर	सुधीर फडके
एका तळ्यात होती	सुखाचे सोबती	श्रीनिवास खळे
का रे दुरावा	मुंबईचा जावई	सुधीर फडके
कानडा राजा पंढरीचा	झाला महार पंढरीनाथ	वसंतराव देशपांडे, सुधीर फडके
गोमू माहेरला जाते रे नाखवा	वैशाख वणवा	दत्ता डावजेकर
चांदोबा चांदोबा भागलास का	चांदोबा चांदोबा भागलास का	भास्कर चंदावरकर
जाहली जागी पंचवटी	आकाशगंगा	पं.हृदयनाथ मंगेशकर, लता मंगेशकर
जग हे बंदिशाला	जगाच्या पाठीवर	सुधीर फडके
झुक झुक आगीनगाडी	तू सुखी राहा	वसंत पवार
जाळीमंदी पिकली करवंद	पुढचं पाऊल	सुधीर फडके
तुला पाहते रे तुला पाहते	जगाच्या पाठीवर	सुधीर फडके
देव देव्हाऱ्यात नाही	झाला महार पंढरीनाथ	सुधीर फडके
फड सांभाळ तुऱ्याला ग आला	मल्हारी मार्तंड	वसंत पवार
हे चिंचेचे झाड	मधुचंद्र	एन.दत्ता
सांगा या वेडीला	सांगत्ये ऐका	वसंत पवार



५६ गीतांत शब्दबद्ध केली आहे. गीत रामायणाचे संस्कृत, हिंदी, गुजराती, बंगाली, कन्नड, आसामी, मल्याळी, तेलुगू, कोकणी आदी भाषांमध्ये भाषांतर झाले आहे.

- गदिमांनी १५८ मराठी चित्रपटांसाठी काम केले आहे. यामध्ये त्यांनी कथा-पटकथा-संवाद-गीते लिहिली. २१ चित्रपटांमध्ये त्यांनी अभिनय केला आहे. गदिमांनी २५ हिंदी चित्रपटांसाठी कथा-पटकथा लेखनाचे काम केले. काही चित्रपटांचे संवादही त्यांनी लिहिले. अदालत (१९४८), पुढचं पाऊल, लाखाची गोष्ट, पेडगावचे शहाणे, वऱ्हाडी आणि वाजंत्री या चित्रपटांतील त्यांनी साकारलेल्या भूमिका संस्मरणीय ठरल्या. त्यांचा मृत्यू पुण्यात १४ डिसेंबर १९७७ रोजी झाला.

भूषवलेली पदे

- महाराष्ट्र राज्याच्या विधानपरिषदेचे १९६२ ते १९७४ अशी १२ वर्षे ते नियुक्त सदस्य होते. ■ अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन अध्यक्ष : १९६९ ■ अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन अध्यक्ष (यवतमाळ) : १९७३ ■ अध्यक्ष मराठी साहित्य परिषद पुणे : १९७६ ■ महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचेही ते सदस्य होते. त्यांच्या नावाने 'गदिमा प्रतिष्ठान' काढण्यात आले आहे.

पुरस्कार

■ संगीत नाटक अकादमी पुरस्कार - १९५१ ■ पद्मश्री १९६९ ■ विष्णुदास भावे सुवर्णपदकाचे मानकरी - १९७१ ■ महाराष्ट्र राज्य सरकार मराठी चित्रपट महोत्सव १९६२-६३, उत्कृष्ट कथा, पटकथा, संवाद, गीते - चित्रपट शाहीर परशुराम ■ महाराष्ट्र राज्य सरकार मराठी चित्रपट महोत्सव १९६३-६४ उत्कृष्ट गीते - चित्रपट गरिबाघरची लेक ■ महाराष्ट्र राज्य सरकार मराठी चित्रपट महोत्सव १९६४-६५, उत्कृष्ट पटकथा - चित्रपट पाठलाग, उत्कृष्ट गीते - चित्रपट वैशाख वणवा ■ महाराष्ट्र राज्य सरकार मराठी चित्रपट महोत्सव १९७०-७१, उत्कृष्ट गीते - चित्रपट नंदिनी ■ महाराष्ट्र राज्य सरकार मराठी चित्रपट महोत्सव १९७८-७९, उत्कृष्ट गीते व पटकथा - कै. ग.दि. माडगूळकर यांना देवकी नंदन गोपाला चित्रपटासाठी पुरस्कार ■ फाळके गौरव चिन्ह ■ सूरसिंगार अकादमी सन्मानचिन्हे ■ काव्यसंग्रह जोगिया, काव्यसंग्रह चैत्रबन, दोन नृत्यनाटिका, मंतरलेले दिवस, दे टाळी ग घे टाळी, मिनी यांना महाराष्ट्र राज्य पुरस्कार.

संदर्भ: www.gadima.com

अभिनेते गदिमा

चित्रपट	वर्षे	भाषा
ब्रम्हचारी	१९३८	मराठी
ब्रँडीची बाटली	१९३९	मराठी
लग्न पहावे करून	१९४०	मराठी
सरकारी पाहूणे	१९४२	मराठी
भक्त दामाजी	१९४२	मराठी
पहिला पाळणा	१९४२	मराठी
सावळ्या तांडेल	१९४२	मराठी
बहिर्जी नाईक	१९४३	मराठी
गजाभाऊ	१९४४	मराठी
जय मल्हार	१९४७	मराठी
कारस्थान	१९४७	मराठी
लोकशाहीर रामजोशी	१९४७	मराठी
अदालत	१९४८	हिंदी
पुढचे पाऊल	१९५०	मराठी
कल्याण खजिना	१९५०	मराठी
पेडगावचे शहाणे	१९५२	मराठी
लाखाची गोष्ट	१९५२	मराठी
सौभाग्य	१९५३	मराठी
अंमलदार	१९५३	मराठी
बोलविता धनी	१९५३	मराठी
जगाच्या पाठीवर	१९६०	मराठी



'महाराष्ट्रावर आणि मराठी भाषेवर तर गदिमांचे अनंत उपकार आहेत. इतर काहीही देणाऱ्या माणसापेक्षा समाजाला गाणे देणाऱ्या माणसाचे उपकार फार मोठे असतात. 'साँग हॅज द लाँगेस्ट लाईफ' अशी एक म्हण आहे. एक गाणे माणसांच्या पिढ्यान्‌पिढ्या बांधून ठेवते. एवढेच कशाला? माणसाच्या मनाचे लहानमोठेपण, रागद्वेष घटकेत घालवून टाकण्याचे सामर्थ्य गाण्याइतके दुसऱ्या कुठल्याही कलेत नसते. हजारो माणसे एक गाणे जेव्हा आनंदाने गातात त्या वेळेला त्या हजारांचे एक अंत:करण होते. माडगूळकरांनी अशी शेकडो गाणी लिहिली. तमाशाच्या फडात, देवळात, शाळेत, तरुणांच्या मेळाव्यात, माजघरात, देवघरात, शेतामळ्यात, विद्वजन परिषदेत.. त्यांच्या गाण्याचा संचार नाही कुठे? मराठी नाट्यसृष्टीत जी कामगिरी कै. देवलांनी केली, त्याच तोलामोलाचे कार्य माडगूळकर यांनी मराठी चित्रसृष्टीत केले आहे.. म्हणूनच आम्ही सर्व, माडगूळकर कलावंशाचे वारसदार आहोत, हे सांगायला मला अभिमान वाटतो.'

कलावंशाचे वारसदार

पु. ल. देशपांडे

पुण्याला बालगंधर्व थिएटर उभे राहत होते, गोपाल देउसकरांच्या सुंदर चित्रांशी स्पर्धा करणाऱ्या चार ओळी पाहिजे होत्या. पंचवटी गाठली. माडगूळकरांना म्हणालो, स्वामी, चार ओळी हव्या आहेत.. बालगंधर्वाच्या पोट्रेटपाशी मागणी संपायच्या आत माडगूळकर म्हणाले, 'असा बालगंधर्व आता न होणं'. तेवढ्यात कुणीतरी आले. गप्पागोष्टी सुरू झाल्या. मी समस्यापूर्तीची वाट बघत होतो. तासाभरात निघायचे होते. त्या श्लोकाला चाल लावायची होती.

उद्‌घाटन–समारंभाच्या प्रसंगी गाण्याच्या गीतांच्या तालमी चालल्या

होत्या. त्यांत माडगूळकरांचे असे आमुचे पुणे होतेच. तालमीच्या ठिकाणी बाळ चितळे श्लोक घेऊन आला. सुरेख, वळणदार अक्षरात लिहिलेला. बकुळ पंडितला मी चाल सांगितली. रंगमंदिराच्या उद्घाटनाच्या वेळी रसिकांनी भरलेल्या प्रेक्षागारातले दिवे मंदावले. रंगमंचावर मांडलेल्या बालगंधर्वांच्या 'नारायण श्रीपाद राजहंस' आणि 'स्वयंवरातली रुक्मिणी' अशी दोन दर्शने घडवणाऱ्या त्या अप्रतिम चित्रांवरचे पडदे दोन युवतींनी बाजूला केले आणि लगेच माडगूळकरांच्या गीताचे गायन सुरू झाल्यावर रसिकांना कळेना, की त्या रंगशिल्पाला दाद द्यावी की गीतातल्या शब्दशिल्पाला. प्रेक्षागारात पुन्हा प्रकाश आला त्या वेळी त्या 'रम्याणि वीक्ष्य मधुरांश्च निशम्य शब्दातन' या अनुभूतीने पर्युत्सुक झालेल्या रसिकांच्या खिशांतले शकडो हातरुमाल अश्रू पुसत होते..

गुंतलेल्या आठवणी

गीतांच्या जन्मकाळाशी गुंतलेल्या अशा किती आठवणी डेक्कन जिमखान्याच्या टेनिस कोर्टाजवळच्या रस्त्यातून जाताना एका विजेच्या खांबापाशी आलो की आठवतात.

रात्रीचे चित्रीकरण आटोपून चालत आम्ही दोघे घरी येत होतो. पहाट होत होती, रस्त्यातले म्युनिसिपालटीचे दिवे मालवले. त्या खांबापाशी क्षणभर थांबून माडगूळकर उद्गारले,

'विझले रत्नदीप नगरात!'

'आता जागे व्हा यदुनाथ'

गीत भावनेशी तादात्म्य पावण्याच्या त्यांच्या असंख्य खुणा गीतांतून आढळतात. शब्दयोजनेतले त्यांचे अवधान सुटत नाही. अशी शेकडो गीते त्यांनी रचली. चित्रपटासाठी त्यांनी गाणी लिहिल्यामुळे आमच्या आर्डरीही विचित्र असायच्या 'आर्डरी' हा त्यांचाच शब्द. कधीकधी चाल सुचलेली असायची

'स्वामी, असं वळण हवं'

पुल देशपांडे, तुम्ही बाजा वाजवत राहावे.

गडकरी गेले त्या वेळी रसिक महाराष्ट्र सुन्न झाला होता म्हणतात. माडगूळकरांना गडकऱ्यांविषयी अतोनात प्रेम. आम्ही जोडीने केलेल्या प्रवासात गडकऱ्यांच्या कवितांचेच नव्हे तर नाटकांतील उताऱ्यांचे पठण हा आमचा आवडता छंद असायचा. हरिभाऊ आपटे, नाथमाधव, गडकरी, बालकवी, केशवसुत, फडके, खांडेकर, अत्रे या आधुनिक काळातल्या साहित्यकारांचे मार्ग पुसत आम्ही या साहित्याच्या प्रांतात आलो. मी मुंबईत वाढलो आणि माडगूळकर माडगुळ्यात वाढले, तरी आमच्या साहित्यप्रेमाचे पोषण एकाच पद्धतीने चाललेले होते. गडकऱ्यांच्या निधनानंतर वर्षभराच्या आतच आमचा जन्म. माडगूळकर माझ्यापेक्षा फक्त एक महिन्याचे मोठे, बालपणातले आमचे इतर वातावरण मात्र निराळे होते.

'त्या तिथे, पलिकडे, तिकडे माझिया प्रियेचे झोपडे' ही कविता प्रथम त्यांच्या तोंडून ऐकल्यावर मी म्हणालो होतो, महाकवी, तुम्ही लकी (माडगूळकर मात्र स्वत:ला महाकार्य कवी म्हणत.) तुमच्या प्रियेच्या झोपड्याकडे वळताना त्या वळणावर आंब्याचे वाकडं झाड होतं. आम्ही वाढलो त्या वातावरणात वळणावर जळाऊ लाकडांची वखार !

गाण्यांचा संचार

त्यांच्या गाण्याचा संचार नाही कुठे? माडगूळकरांचे चिरंजीवित्व गाण्यांनी सिद्ध झाले आहे. व्यक्तिश: मला तर माडगूळकरांचे स्मरण करणे माझ्या पंचविशीपासून ते आता साठीकडे वळलेल्या माझ्याच आयुष्याकडे पुन्हा वळून पाहण्यासारखे वाटते. आम्ही काम केलेला एखादा जुना चित्रपटच पाहण्यासारखे. त्यातली माडगूळकरांची भूमिका आणखी खूप पाहायला मिळणार अशी आशा होती. कवितेच्या त्या जिवंत झऱ्यातून अजून कितीतरी ओंजळी भरभरून प्यायला मिळणार आहेत अशी खात्री होती. प्राणांतिक संकटातून ते वाचले होते. इडापिडा टळली असा भाबड्या मनाला धीर होता आणि अचानक चित्रपटगृहातल्या अंधारात ती बाहेर पडायच्या दरवाजावरची एक्झिटची लाल अक्षरे पेटावी, आणि म्हणजे?, एवढ्यात संपला चित्रपट? असे म्हणता म्हणता 'समाप्त' ही अक्षरे कुठल्या रिळाच्या शेवटी लिहिली आहेत हे कुणाला कळले आहे ? मी चित्रपटव्यवसाय सोडून बेळगावला गेल्यावर माडगूळकर मला म्हणाले होते, मित्रा, अशी मैफल अर्ध्यावर टाकून जाणं बरं नव्हे. आम्ही आता काय म्हणावे? आणि कुणाला म्हणावे?

संदर्भ: www.gadima.com

आवडता छंद

मित्रांच्या नावांची गंमत करणे हा गदिमांचा आवडता छंद असायचा. मग मधुकर कुलकर्ण्याला पेटीस्वारी, राम गबालेला रॅम ग्याबल, वामनराव कुळकर्ण्यांना रावराव.. कुणाला काय, कुणाला काय असे नाव मिळायचे. चाल पेटीवर वाजवत बसल्यावर चटकन त्या चालीचे वजन त्यांच्या ध्यानात येई. मग त्या तालावर झुलायला सुरुवात. बैठकीवर उगीचच लोळपाटणे. पोटाशी गिरदी धरून त्याच्यावर चिमट्यात अडकवलेल्या कागदाचे फळकूट पुढ्यात ठेवून कातरायला सुरुवात मग अडकित्याची चिपळी करून ताल.. नाना तऱ्हा. एखादा अचानक तिथे आलेल्या नवख्याला वाटावे, इथे गीत आकाराला येत आहे की, नुसताच पोरकटपणा चाललाय .. एखादे दांडगे मूल पाहावे तसे वाटत असे. त्यांच्यातला नकलाकार जागा झाला की, मग तो मूलपणा पाहावा. खरे तर मानमरातबाची सारी महावस्त्रे टाकून शैशवात शिरलेल्या माणसाचे ते दर्शन असायचे. या स्वभावगत मूलपणाने त्यांना खूप तारलेले होते. प्रापंचिक जबाबदाऱ्या फार लवकर त्यांच्या अंगार पडल्यामुळे विशीतच फार मोठे प्रौढपण त्यांच्यावर लादले गेले होते, त्यातून ही मूलपणाकडची धाव असायची की काय, ते आता कोणी सांगावे?

गदिमा व पुलंचा स्नेह खूप जुना, ज्या काळात आपल्यात लेखनाचे गुण आहेत हे पुलंना उमगलेही नव्हते तेव्हापासूनचा, तेव्हा पु.ल. गायक होण्याच्या मागे लागले होते, महाराष्ट्रभर फिरून ते भावगीत गायनाचे कार्यक्रम करत असत, कोल्हापूरच्या सोळुकूरकर मास्तरांचा संगीत मेळा त्याकाळात खूप प्रसिद्ध होता, मेळ्यात त्या काळात गाणाऱ्या गुणवान मुलांची नावे होती सुधीर फडके, राम गबाले, आप्पासाहेब भोगावकर! मुंबईत संगीत क्षेत्रात धडपडणारे पण कोल्हापूरला या मुलांसमोर भेट देताना ज्यांची 'मुंबईचे नामवंत भावगीत गायक' अशी ओळख करून दिली जात असे, ते पु. ल. देशपांडे या मेळ्याला नामवंत पाहुणे म्हणून भेट देत असत! गदिमांची अनेक गीते त्यांना तिथे मिळत असत व त्यांना चाली लावून ते कार्यक्रम करत असत. यातूनच पुढे दोघांची भेट झाली व दोघात स्नेह निर्माण झाला.

'पुल'कित गदिमा

सुमित्र माडगूळकर

पु. ल. देशपांडे, गदिमा पुण्यातल्या डेक्कन जिमखानाच्या टेनिस कोर्टाजवळच्या रस्त्यावरून प्रभातफेरीला निघाले होते, रात्रभर एका चित्रपटाचे चित्रीकरण आटपून मंडळी चालायला निघाली होती, तितक्यात रस्त्यात महानगरपालिकेचे दिवे बंद झाले आणि काय गंमत गदिमांना गीत सुचले –

विझले रत्नदीप नगरात आता जागे व्हा
यदुनाथ

एक मोठा प्रश्न आज सुचला गदिमा–पु.ल. आजच्या

काळात का होत नाहीत? तर याचे उत्तर सोपे आहे, अहो आता पुणे महानगरपालिकेचे दिवे सकाळी १०–११ पर्यंत बंदच होत नाहीत तर लोकांच्या प्रतिभा जागृत होणार कशा!



१९४८ सालचा 'वंदे मातरम' चित्रपट, गदिमांनी आग्रहाकरून पु.ल. व सुनीताबाईंना या चित्रपटात भूमिका करायला लावली होती, सुनीताबाई माहेरी गेल्या होत्या तर गदिमांनी त्यांना पत्र लिहून त्यांचा होकार मिळवला, 'वेदमंत्राहून आम्हा वंद्य वंदे मातरम्', हे गदिमांचे गाजलेले गीत याच चित्रपटातले. 'गुळाचा गणपती' हा चित्रपट सबकुछ पु.ल. अशा नावाने जरी ओळखला जात असला तरी यात गीते होती अर्थातच गदिमांची, 'इंद्रायणी काठी देवाची आळंदी, लागली समाधी ज्ञानेशाची', हा अभंग याच चित्रपटातला हा गाणाऱ्या पं. भीमसेन जोशींनासुद्धा माहीत नव्हते की, हे गीत गदिमांचे आहे. अगदी एच.एम.व्ही. कंपनीच्या रेकॉर्डवर त्या काळात एक पारंपरिक अभंग अशा नावाने तो प्रसिद्ध झाला होता. शेवटी गदिमांना सांगावे लागले की अहो हे माझे चित्रपट गीत आहे!

पुण्यातल्या बालगंधर्व रंगमंदिराच्या उद्घाटन प्रसंगी एक गीत हवे होते, पुलंनी पंचवटी गाठली व गदिमांनी गीत दिले.

'जसा जन्मतो तेज घेऊन तारा!
जसा मोर घेऊन येतो पिसारा!
तसा येई घेऊन कंठात गाणे!
असा बालगंधर्व आता न होणे!'

पुलंनी याला संगीत दिले व उदघाटन कार्यक्रमात ते बकुळ पंडित यांच्या आवाजात सादर झाले.

'नाच रे मोरा' हे गदिमा–पुल जोडीचे गाजलेले गीत, एकदा मस्ती करता करता पुलंनी गदिमांना सांगितले. माडगूळकर 'नाच गं घुमा कशी मी नाचू'च्या धर्तीवर बालगीत हवे आहे, गदिमा उत्तरले, 'घे लिहून नाच रे मोरा, आंब्याच्या वनात नाच रे मोरा नाच...'

या जोडीने अनेक सुंदर गीते आपल्याला दिली, नुसती वानगीदाखल नावे घ्यायची झाली तर 'इवल्या इवल्याशा टिकल्या टिकल्यांचे' 'नाच रे मोरा नाच' 'इंद्रायणी काठी देवाची आळंदी' 'श्रीहरी विदुराघरी पाहुणा' 'इथेच टाका तंबू' ही कुणी छेडीली तार' जा मुली शंकुतले सासरी' 'कबीराचे विणतो शेले', 'कुणी म्हणेल वेडा तुला' 'सख्यांनो करू देत शृंगार', माझं ठरल्यालं लगीन मोडलं ग'' 'दूर कुठे राउळात', केतकीच्या वनात उतरत्या उन्हात अशी अनेक गीत आहेत.

'त्या तिथे, पलिकडे' तिकडे माझिया प्रियेचे झोपडे' ही कविता प्रथम गदिमांच्या तोंडून ऐकल्यावर पुल म्हणाले होते. महाकवी, तुम्ही लकी!, तुमच्या प्रियेच्या झोपड्याकडे वळताना त्या वळणावर आंब्याचे वाकडं झाड होतं. आम्ही वाढलो मुंबईत, त्या वातावरणात वळणावर असते जळाऊ लाकडांची वखार!

गदिमा व पु.ल. अनेक साहित्यिक कार्यक्रमांना बाहेरगावी एकत्रही जात असत, कधीकधी रात्री भोजनपूर्व रसपानाचा कार्यक्रमही होत असे प्रथम पु.ल. नको म्हणायचे त्यावर गदिमा मित्राला म्हणायचे

'आबासाहेब, यांना डोंगरे बालामृत द्या हो!'

चेष्टा–मस्करी करीत रसपानाला रंग चढे, गदिमा यात दर्दी होते,

पु.ल. पुरे, छोटा पेग, छोटा पेग, करायचे. ते म्हणायचे, 'अण्णा, रसपान असे बेताने नि बेमालूम करावे की मासा जसा पाण्यात पाणी पितो. रसपान हेसुद्धा अत्तराप्रमाणे असावे.'

लगेच गदिमा म्हणायचे, 'लावा रे लावा, अत्तराचा फाया याच्या मनगटावर लावा!'

पुलंचे बंगाली भाषेवर खूप प्रेम होते, त्यावर गदिमांनी ए.क. कवडा या टोपणनावाने बिंगचित्र लिहिले होते.

पाया पडती राजकारणी, करणी ऐसी थोर
मराठीतला तू बिनदाढीचा रवींद्र टैगोर

७-८ डिसेंबर १९७७ पु.ल. रवीद्रनाथांची दोन गीते घेऊन पंचवटीत आले. माडगूळकर, बाबा आमटे यांच्या आनंदवनात वृक्षारोपणाचा कार्यक्रम आहे. त्यासाठी या गीतांच्या तर्जुम्यावर गीतरचना हवी आहे गदिमा खूप आजारी होते. तरीपण मित्राच्या प्रेमाखातर त्यांनी लगेच दोन गीते लिहून दिली.

येइ रे प्राणा, सर्वात्मका!
उंच उडव या मरुभूमीची गगनी विजयपताका!

व दुसरे होते.

कोवळ्या रोपट्या, आज तू पाहुणा, भूषवी अंगणा येऊनिया

१४ डिसेंबर १९७७ गदिमा आपल्याला सोडून गेले व बाबा आमटे यांच्यासाठी लिहिलेली ही गीते गदिमांची शेवटची गीते ठरली. असे हे दोन जिवलग मित्र त्यांच्याबद्दल किती लिहू आणि किती नाही असे होऊन जाते, गीतरामायणातील त्रिवार जयजयकार रामा गीतातल्या ओळी जणू गदिमांनी पुलंसाठीच लिहून ठेवल्या आहेत.

'पुलकित पृथ्वी, पुलकित वायु तसे हे होते पुल'कित गदिमा..

ना शिव्या, ना ओव्या!

गदिमांनी १९७७ साली ललित मासिकाच्या दिवाळी अंकात 'ए.क. कवडा' या टोपण नावाने मराठीतील २० सुप्रसिद्ध लेखकांवर विनोदी बिंगचित्रे लिहिली होती. त्यावेळच्या प्रसंगानुसार किंवा एकूण त्या लेखकाच्या व्यक्तिमत्वानुसार दोन-चार विनोदी ओळी व त्या लेखकाचे व्यंगचित्र असे त्याचे स्वरुप होते, ती खूप गाजली व हा 'ए. क. कवडा' नक्की कोण अशा चर्चा रंगायला लागल्या होत्या. संपादकांना विचारणा झाल्या. पण, नाव काही कोणाला कळाले नाही. डिसेंबर १९७७ मध्ये गदिमांचे निधन झाल्यावर संपादकांनी शोकसभेत जाहिर केले की 'ए. क. कवडे' म्हणजे ग. दि. माडगूळकरांचे हे लेखन होते. यातली काही स्मरणात असलेली निवडक बिंगचित्रे तुमच्यासाठी खास!

गो. नी. दांडेकर तर दुर्गप्रेमी, चालायची पण त्यांना विलक्षण आवड होती, त्यांच्याबद्दल

चाले त्याचे दैव चालते, चढतो, त्याचे चढते
माळ तुळशीची आणि दाढी कोठे कोठे नडते!

कविवर्य मंगेश पाडगावकर, काव्यवाचनाची त्यांची एक वेगळीच शैली आहे, त्याकाळात त्यांच्या काही कविता लिज्जत पापडाच्या जाहिरातीत झळकत असत. त्यावर गदिमा चिमटा काढतात.

तुझ्या वाचने काव्यच अवघे वीररसात्मक झाले
घेऊ धजती इज्जत कैसी लिज्जत 'पापडवाले'

दुर्गाबाई भागवतांबद्दल..

जागविले तू शांत झोपल्या वाङमयीन जगतां
दुर्गे, दुर्गे, सरले दुर्घट, आता हो शान्ता

गोमंतक निवासी कविवर्य बा. भ. बोरकर यांच्या ज्येष्ठ कन्येने एका मद्रासी युवकासी प्रेमविवाह केला होता, त्यावर

बोरीच्या रे बोरकरा, लेक तुझी चांगली
गोव्याहून मद्रदेशी सांग कशी पांगली?

राजा निलकंठ बढे उर्फ कवि-गीतकार राजा बढे यांची एक कविता गदिमांच्या वाचनात आली. सुंदर कविता होती पण खाली लेखकाचे नाव होते 'रा. नि. बढे'. आधी गदिमांना लक्षात येईना की, हे कोण लेखक, मग आठवले की असे हे तर आपले 'राजा बढे'. पुढे त्याच सुमारास 'राजा बढे' पंचवटीत आले. त्यावेळी गजाननराव वाटव्यांचे 'राधे तुझा सैल अंबाडा' हे गाणे गाजत होते. त्या चालीवर त्यांना बघताच गदिमा गमतीदारपणे मान डोलावत म्हणू लागले...

कुणी ग बाई केला? कसा ग बाई केला?
आज कसा राजा बढे, रानी बढे झाला?

रविकिरणी कवितेची थट्टा करीत गदिमा म्हणत,

गिरीशांची ही गर्द 'आमराई'
त्यात उघडी यशवंत पाणपोई

ॲन्टिक्लायमेक्स

एकदा दोघांची एका गृहस्थांनी ओळख करून दिली, हे ग. दि. माडगूळकर हे महाकवी आहेत. गीतरामायण यांनीच लिहिले आहे आणि पु. ल. देशपांडे महाराष्ट्राचे महान विनोदी लेखक आहेत. समोरच्या महाशयांचा साहित्याशी अगदी बादनारायणही संबंध नव्हता ते अगदी निष्पाप आणि निरागसपणे उत्तरले.

व्हय! पर हे करत्यात काय?

त्यावर या दोघांची जी हास्यरेस सुरू झाली ती लवकर थांबेचना, गदिमा म्हणाले, आमची अजून महाराष्ट्रात अशी कुणी जिरवली नव्हती!

पु.ल. चष्मा काढून हसत होते. त्यावर गदिमा म्हणाले

परश्या, चष्मा काढल्यावर तू चोरासारखा दिसतोस! तू नाटक लिहितोस ना? असा ॲन्टिक्लायमेक्स कधी लिहिला आहेस? असा कनवाळू माणूस आम्ही कुठे बघितला नाही. आपल्या पोटापाण्याची कोण रे चौकशी करतंय!

स्वतःलाही त्यांनी सोडले नाही!, गदिमांना गीतरामायणामुळे 'आधुनिक वाल्मीकी' म्हणत असत. शेवटच्या काळात ते कर्करोगाने आजारी होते. त्यांच्या हातून फारसे लिखाण होत नव्हते. म्हणून स्वतः बद्दलच त्यांनी बिंगचित्र लिहिलं. गदिमांच्या हातात कुऱ्हाड घेतलेल्या व्यंगचित्राखाली लिहिले होते..

कथा नाही की कविता नाही, नाही लेखही साधा
काय वाल्मिके, स्विकारिसी तू पुनःश्च पहिला धंदा?

संदर्भ: www.gadima.com

ग. दि. माडगूळकर ज्या सदनिकेत राहत, ती 'अण्णांची मठी' म्हणून ओळखली जायची. या मठीतच त्यांनी अनेक संस्मरणीय चित्रपटांच्या पटकथा व गीते लिहिली. या मठीत थोरामोठ्यांच्या धमाल गप्पा चालत. या मठीच्या शेजारीच सुधीर फडके राहत. गदिमा आणि सुधीर फडके यांच्यामध्ये बरेच वाद होत. पण काही काळानंतर परत दोघांची मैत्री होत असे.

मैत्रीचा ठेवा

राजदत्त

चित्रपटक्षेत्रात येण्यापूर्वी मी चेन्नईला (त्या काळचे मद्रास) 'चांदोबा' ह्या लोकप्रिय मासिकाच्या मराठी आवृत्तीचे संपादन करत होतो. संपादनाचे काम करून जो वेळ उरत असे त्या वेळेत मी जवळच्या चित्रपट स्टुडिओत काम करू लागलो होतो. त्या स्टुडिओत एका हिंदी चित्रपटाच्या कामासाठी सुप्रसिद्ध दिग्दर्शक राजाभाऊ परांजपे आले होते. तिथे त्यांची आणि माझी पहिली भेट झाली. हिंदी चित्रपटापेक्षा मराठी चित्रपटांचे काम करायला राजाभाऊंना अधिक आवडत होते हे मला तिथे समजले. मराठी चित्रपटासाठी काम करताना फारसे पैसे मिळणार नसले तरी चित्रपटाचे तंत्र शिकायला मिळेल, हे लक्षात घेऊन मी राजाभाऊंचा साहाय्यक बनलो आणि मग ते दिग्दर्शित करत असलेल्या चित्रपटांच्या निमित्ताने मला गदिमा आणि बाबूजी म्हणजे सुधीर फडके यांचा परिचय झाला. गदिमांबरोबर केलेल्या कामाचे अनेक किस्से, आठवणी मला आठवत आहेत.

बाबूजींचा सत्कार करताना राजदत्त

त्या काळी अण्णा म्हणजे गदिमा मुंबईत असताना दादरला शिवाजी पार्कजवळ राहत असत. एकाच इमारतीत बाबूजींच्या सदनिकेशेजारीच गदिमांची सदनिका होती. त्याला 'अण्णांची मठी' असेच नाव पडले होते. त्या मठीत अण्णा गीते आणि पटकथा लिहीत असत. बहुधा ते सकाळी लिहायला बसत असत. त्यांच्या चहा-नाश्त्याची व जेवणाची व्यवस्था करणे वगैरे काही कामांची जबाबदारी माझ्याकडे होती. एकदा काही आवराआवर करत असताना अण्णांनी लिहिलेला एक कागद मला सापडला. अण्णांनी त्यावर एक गीत लिहिलं होतं व तो कागद चुकून बाजूला पडला होता. ते गीत वाचून मी थक्कच झालो. मीरा-कबिराच्या काव्याच्या दर्जाचे हे गीत आहे असं मला वाटलं, पण अण्णांना हे सांगायची माझी हिंमत झाली नाही. आपले लेखन चालू असताना ते कोणी वाचलेले अण्णांना अजिबात आवडत नसे. मात्र, मी हे गीत वाचलं आणि त्यानंतर अण्णा त्या वेळी लिहीत असलेल्या चित्रपटाची पटकथाही वाचली. हे वाचन पुढे एका अनपेक्षित रीतीने उपयुक्त ठरलं.

पटकथेवरून वाद

काही दिवसांनी राजाभाऊ आणि गदिमांचा चित्रपटाच्या पटकथेवरून वाद झाला. अण्णा राजाभाऊंच्या चित्रपटासाठीच ती पटकथा लिहीत होते. या पटकथेचे काम पुरेशा वेगाने झालेले नाही अशी राजाभाऊंची तक्रार होती. ह्यानंतरही आपण ही पटकथा लिहिणार नाही असे अण्णांनी या वादानंतर राजाभाऊंना सांगितले. अण्णा पटकथा लिहिणार नाहीत हे समजल्यावर राजाभाऊ खूप चिंताग्रस्त झाले होते. राजाभाऊंनी अनेकजणांना या चित्रपटासाठी आगाऊ पैसे दिले होते. अशा परिस्थितीत चित्रपट रद्द करण्यामुळे त्यांचे खूप नुकसान होणार होते. या वादानंतर अण्णा सोबत नसताना मी राजाभाऊंबरोबर त्यांच्या गाडीतून जात होतो. इतर वेळी मोकळेपणाने बोलणारे राजाभाऊ त्या वेळी मात्र चित्रपटाच्या चिंतेमुळे गप्पच होते. त्यांचा तो वाईट मूड दूर करायला मी त्यांना सांगितलं, अण्णा रागामध्ये काही बोलले असले तरी ते खरं नाही आहे. त्यांनी पटकथेचा बराचसा भाग लिहिलेला आहे, तो तर मी वाचलेला आहे शिवाय एक गीतही मी वाचलंय आणि हे सगळं लेखन अतिशय दर्जेदार आहे. हे ऐकून राजाभाऊंची चिंता दूर झाली आणि त्यांनी परत जाऊन अण्णांबरोबर पटकथेबाबत बोलायला सुरुवात केली. 'जितके लेखन झाले आहे तितके सध्या दे,' असे राजाभाऊंनी अण्णांना सांगितले. दुसऱ्यांदा झालेल्या या चर्चेमुळे त्यांचा वाद मिटला आणि राजाभाऊंना पटकथा व गीते मिळाली. हा चित्रपट होता 'जगाच्या पाठीवर' आणि मला चुकून सापडलेल्या त्या कागदावरचं गीत होतं' एक धागा सुखाचा, शंभर धागे दुःखाचे'.

दोघांच्या वादामुळे हा चित्रपट जर बनलाच नसता तर इतकी सुंदर कथा आणि गीते रसिकांपर्यंत कधीच पोहोचली नसती. गदिमांचे लेखन मी त्यांच्या नकळत वाचल्यामुळेच राजाभाऊ परत आले हे अण्णांना समजलंच. ते चिडून माझ्याबरोबर बोलले. 'मी मीरा आणि कबिराची नक्कल करतो असं तुला म्हणायचय का?' असं त्यांनी मला रागाने विचारलं. नक्कल केली आहे वगैरे काहीही मी बोललो नसून उलट मीरा आणि कबिराच्या तोडीचं लेखन झालय असं मी म्हणालो होतो हे मी त्यांना कसबसं सांगितलं. 'जरतारी हे वस्त्र मानवा तुझिया आयुष्याचे'

ही या गीतातील सुंदर ओळ मला खास आवडली होती हेदेखील सांगितलं. हे सगळं समजल्यावर अण्णा शांत झाले.

अण्णांच्या मठीत साधीसाधी कामे करणारा मी एक सहायक होतो. तरीही या प्रसंगानंतर अण्णा काही वेळा आपणहून त्यांनी लिहिलेलं लेखन मला दाखवू लागले व माझा अभिप्राय विचारू लागले.

धमाल गप्पा

अण्णांच्या ह्या मठीत अनेकदा धमाल गप्पा होत असत. मी त्या वेळी जवळच बसलेला असे पण संकोचामुळे मी हसत मात्र नसे. त्यामुळे मला विनोदी गप्पांचं वावडं आहे असा काहीतरी गैरसमज अण्णांनी करून घेतला होता. यामुळे पुढे मी दिग्दर्शित केलेल्या पहिल्याच चित्रपटाच्या वेळी एक अनपेक्षित अडचण माझ्यापुढे उभी राहिली होती. एकदा प्रभाकर ताम्हाणे यांची 'अल्ला जाने क्या होगा आगे' ही विनोदी कथा मी वाचली. ती कथा चित्रपटासाठी योग्य आहे असे वाटल्यामुळे मी ती कथा अण्णांना दाखवली व पटकथा लिहायची विनंती केली पण मला विनोद आवडत नाहीत असा गैरसमज त्यांच्या मनात असल्यामुळे विनोदी कथेवरचा चित्रपट दिग्दर्शित करणे मला जमेल का अशीच शंका त्याना वाटली होती. तू विनोदी चित्रपटाचे दिग्दर्शन करणार? मी तुला कधी हसताना पाहायला नाही आणि तू विनोदी चित्रपटातून जगाला हसवायला निघालास? असं ते मला म्हणाले. त्यामुळे या चित्रपटाची पटकथा व संवाद मी सुप्रसिद्ध लेखक मधुसूदन कालेलकरांकडून लिहून घेतले होते. याच कथेवरून 'मधुचंद्र' हा लोकप्रिय चित्रपट बनला होता. पटकथा लेखनाबाबत साशंक असणाऱ्या गदिमांनी सुदैवाने ह्या चित्रपटासाठी गीते लिहिली होती.

'हे चिंचेचे झाड दिसे मज चिनार वृक्षापरी' आणि 'मधु इथे अन चंद्र तिथे झुरतो अंधारात' अशी मधुचंद्र ह्या चित्रपटासाठी गदिमांनी लिहिलेली गाणी आजही लोकप्रिय आहेत.

काही काळानंतर मी चित्रपट दिग्दर्शित करत असतानाची एक आठवण आहे. अण्णांच्या जावयाचे दुर्दैवी निधन झाल्यावर अण्णा खूप खिन्न झाले होते. त्या अवस्थेतून त्यांना बाहेर काढायचा प्रयत्न करावा असे अनेकजणांना वाटत होते. त्या वेळी मी वऱ्हाडी आणि वाजंत्री हा चित्रपट दिग्दर्शित करत होतो. पटकथा, संवाद, गीते अण्णांनीच लिहिली होती. मला असं वाटलं की जर अण्णांनी या चित्रपटातच एखादी भूमिकासुद्धा केली तर चित्रीकरणाच्या निमित्ताने ते वेगळ्या जागेत, काही कामात गुंतलेले राहतील व त्यामुळे त्यांची खिन्नता कमी होऊ शकेल. चित्रपटाशी संबंधित असलेल्या अनेकांना ही कल्पना योग्य वाटली. कोणतेही नवीन काम सुचवल्यावर त्या काळात अण्णा तयार होत नसतं पण सुदैवाने चित्रपटात भूमिका करायचे त्यांनी मान्य केले. वऱ्हाडी आणि वाजंत्री या चित्रपटातली अण्णाची भूमिका आजही लोकांना आवडते आहे. त्या भूमिकेसाठी अभिनय करताना अण्णा रमले व एका दुर्दैवी घटनेमुळे त्यांच्या मनावर पडलेले खिन्नतेचे सावट कमी झाले.

अनपेक्षित आणि थरारक

अण्णांच्या रागलोभाची एक धमाल आठवण आहे. त्या आठवणीत बाबूजींनी म्हणजे सुधीर फडकेंनी केलेली अनपेक्षित अशी थरारक कामगिरीदेखील आहे. मी चित्रपट संकलनाचं काम करत होतो त्या काळची ही घटना आहे. मी अण्णांच्या मठीतच राहत होतो. एकदा संकलनाचं काम करून रात्री उशिरा मी अण्णांच्या सदनिकेत परतलो आणि झोपून गेलो. अण्णा त्या वेळी घरी नव्हते. ते रात्री माझ्यानंतर बऱ्याच उशिराने आले. अण्णांनी बेल वाजवून दरवाजा वाजवून, हाका मारून पाहिल्या असतील पण मला काही जाग आली नाही. मी गाढ झोपलो होतो. बेलचा आवाज ऐकून शेजारीच राहणारे बाबूजी मात्र जागे झाले. ह्या अवेळी कोण कशाला इतक्यांदा बेल वाजवतंय हे त्यांना समजेना. त्यांनी ओरडून विचारल्यावर गदिमांनी त्यांना हा सगळा प्रकार सांगितला. अशा वेळी बाबूजींनी काय केलं असेल? ते त्यांच्या घराच्या गॅलरीतून बाहेर उतरले व तिथून वर जपून चालत गदिमांच्या गॅलरीपाशी जाऊन तिथून ते गदिमांच्या घरात उतरले आणि त्यांनी दरवाजा उघडला. हे सगळं घडून अण्णा घरात आल्यानंतर मला जाग आली. इतक्या उशिरा मी जागा झालेला पाहून अण्णा मला म्हणाले की 'आता कशाला जागा होतोयस? तू झोप आता.'

मी परत झोपी गेलो आणि दुसऱ्या दिवशी सकाळी अण्णांपाशी गेलो. मला खूप गाढ झोप लागली होती त्यामुळे ते बाहेरून बेल वाजवत होते ते काहीच मला जाणवलं नाही वगैरे सगळं सांगितलं. अण्णा चिडून मला म्हणाले, तुझ्यासारख्या नालायक माणसामुळे मला त्यांचं बोलणं ऐकून घ्यावं लागलं. त्यांचं बोलणं म्हणजे बाबूजींचे बोलणं. आपल्याला रात्री उशिरा बाहेर ताटकळावं लागलं ह्या त्रासापेक्षाही बाबूजींकडून खावं लागलेल्या बोलण्याचा त्रास अण्णांसाठी महत्त्वाचा होता. या दोघांची मैत्री जुनी होती आणि त्यांच्यात अनेकदा वाद होत पण सुदैवाने काही काळानंतर त्यांची परत मैत्री जमत असे.

गदिमा, बाबूजी आणि राजाभाऊंची अशी खास मैतरकी पाहत मी चित्रपटक्षेत्रातील कामाची सुरुवात केली होती. त्यांच्या सहवासातील अशा अनेक घटनांचे सुखद स्मरण मला आजही होत असते.

मृत्यूची अटळता

अण्णांची पु.ल.देशपांडेंसारख्या साहित्यिकांबरोबरची मैत्री प्रसिद्धच आहे. त्या दोघांची एक वेगळीच आठवण माझ्या मनात आहे. एकेकाळी प्रसिद्ध असलेल्या चित्रपट अभिनेत्याचे निधन झाले होते. अंत्यविधीसाठी जी माणसे गेली होती त्यात अण्णा आणि पु.ल. होते. मीसुद्धा तिथे थांबलो होतो. लोकप्रिय अभिनेत्याचा अंत हा विषय चित्रपटक्षेत्रात काम करणाऱ्यांना हळवा बनवणारा असतोच. अंत्यविधी चालू असताना पु.ल. म्हणाले, 'अण्णा, आपल्यासाठीसुद्धा जंगलात एक झाड वाढत असेल ना?' मृत्यूच्या अटळतेबाबतचं पुलंचं हे विलक्षण वाक्य मी आजही विसरलो नाही आहे.

शब्दांकन : सुबोध केंभावी

ग. दि. माडगूळकर हे लोकोत्तर प्रतिभावंत होते. त्यांच्या भावविश्वाचा पट विशाल आहे. अनेक रूपाने हे भावविश्व धारदार झाले आहे. गीतरामायणाच्या रूपाने त्यांनी आपली दैवी ऊर्जा मराठी भाषेला दिली आहे.

बहुरंगी बहुपदरी..

प्रवीण दवणे

गदिमांचं भावविश्व स्पर्श, रूप, रस, गंध आदी संवेदनांनी समृद्ध होतं. यात माणदेशच्या मातीचा स्पर्श होता. निसर्गाचे रूप, भक्तीचा रस, लोकगीताचा रंग तर प्रीतीचा व्याकूळ गंधही होता. एकाच वेळी पारंपरिक लोकगीतांचे, स्त्रीगीतांचे, भजनांचे संस्कार त्यात होते तर त्याच वेळी नव्या कवितेची तरल भावुकता यांचा समन्वय होता. सहज स्फुरलेल्या कवितेत 'माऊलीच्या दुग्धापरी आले मृगाचे तुषार' ही गीतात्मकता होती, तर चित्रपटासाठी खास विणलेल्या 'एकवार पंखावरूनी फिरो तुझा हात' अशी हळुवार काव्यात्मकताही होती. गीत आणि काव्य यांची उत्कट एकात्मता हे गदिमांच्या भावविश्वाचे स्पंदन होते. 'जोगिया'सारख्या त्यांच्या अजरामर कवितेचे नुसते सहज संवेदनेने वाचन जरी केले तरी त्यातील दृक संवेदना जाणवते. छायाचित्रण करावे तसे एक-एक दृश्य टिपत टिपत विरहिणीची खोल व्याकूळता टिपणारी कविता विराणीचा परिणाम साधते.

कविता असूनही संवादाचे वेगळे परिमाण 'जोगिया'ला आहे. परंतु, ते कवितेत असे काही एकजीव झाले आहे की त्यामुळे विराणीतील नायिका ही चित्रमयतेचा साज लेवून येते.

मी देह विकुनिया मागुन घेते मोल,
जगविते प्राण हे ओपुनिया अनमोल,
रक्तात रुजविल्या भांगेच्या मी बागा,
ना पवित्र देही तिळाएवढी जागा

यात कंचनीच्या मनातील अरूप भावकंपने तिची अगतिकता आणि स्वत:तील न्यूनाचे भान सुगमतेने आले आहे. ही आधी लिहिलेली कविता घरकूल या चित्रपटात नंतर समाविष्ट झाली. ती कथेशी एकरूप झाली. हे माध्यमांतर सृजनाच्या नव्या रूपातही नवे नवे साधन देणारे ठरले. कवितेत दडलेले गीत प्रतिभावंत संगीतकाराने वेधून रूपबद्ध केल्यामुळे गदिमांच्या भावविश्वातील दृश्यभान अधोरेखित झालेले दिसते.

गदिमांच्या भावविश्वात शाहिरी परंपरेला मोठे स्थान आहे. त्यांच्या लेखणीवर आणि वाणीवर शाहिरांच्या ठळकपणे मन जाहीर करण्याच्या वृत्तीचा संस्कार आहे. विशेष म्हणजे तो परंपरेतूनच मुरून आलेला असल्याने वेगळा काढता येत नाही.

उदा.

दुणावून लय स्वरांत चढत्या
शिरते सुरते गडी
सुरावट भाषेहून रांगडी ***किंवा***
कुणी गालावरच्या खळीत बसावे दडून
कुणी ओठ चाविले आपलेच कडकडून
कुणी पदरामागील करवंदे घे खुडून
खमीजावरील तो कुणी ठसवली
तिच्या चोळीची खडी
कुणीतरी कातरली काकडी

या ओळी केवढ्या बोलक्या आहेत. शाहीर प्रभाकर, राम जोशी, सगनभाऊ यांच्या शब्दसौष्ठवाचे संस्कार आहेत, पण अनुकरण नाही. समाजातील नव्या पिढीच्या आकर्षणाशी मिळतेजुळते घेण्याच्या व्यावहारिक गरजेतही शाहिरी गीताची खोली जपलेली आढळते. गदिमांच्या भावविश्वात आधी आणि नंतरही दुर्मीळता राहिलेल्या अशा परंपरा व नवतेचा संगम आढळतो. याच भावविश्वाला त्यांच्या लावणी लेखनाने शृंगाररसराजाचा वसंत ऋतू दिला आहे.

भावविश्वातील लावण्य

गदिमांच्या भावविश्वातील लावण्य हे संयत आहे. मुक्ततेचा धुंद आभास निर्माण करूनही ते अचूक स्थळी थांबले आहे. यात एक लोभस सूचकता आहे. उदा.

माझ्या व्हटाचं डाळींब फुटलं
सांगा राघू
मी नाही कधी म्हटलं! ***किंवा***
बुगडी माझी सांडली गं
जाता साताऱ्याला
चुगली नका सांगू गं
माझ्या म्हाताऱ्याला

अशा शब्दात ठसका आहे. सहज, संवादी थेट भिडणारा भाव आहे. खोडकर मिश्कीलता आहे. आणि माध्यमाला हवा असलेला अदाकारीचा भावही आहे.

कविराज

ग. दि. माडगूळकर हे भावगीत परंपरेतील श्रेष्ठ कविराज ठरले. याचे कारण त्यांचा सर्वांग परिपूर्ण माध्यमाभ्यास आहे. आपण जी कविता वा गीतरचना करतो ती जिवंत समाजासाठी, त्यांना आनंद मिळावा म्हणून. या गोष्टींचा त्यांना कुठलाच संकोच नव्हता. मनोरंजन करतानाही ते श्रेष्ठ दर्जाचे करावे हे संवेदन त्यांच्या लेखणीत सदैव जागे होते. म्हणून त्यांच्या काव्याला सात्त्विकतेची डूब होती. परंपरेतून, घरातील वातावरणातून, आईच्या जात्यावरच्या ओव्यांतून त्यांचे भावविश्व संपन्न झाले असल्याने स्वाभाविकच त्याचे लसलशीत उन्मेष

लोकवाङ्मय

संतांकडून जो जीवनविषयक तत्त्वज्ञानाचा वारसा महाराष्ट्राला मिळाला, येथील सण, दैवते, कहाण्या, दंतकथा, यातून मानवी सुखदु:खाचे दर्शन त्यांना घडले. त्याचे अखंड चिंतन व मनन केले. म्हणूनच गदिमांचे भावविश्व माध्यमापलीकडे जाऊन ते मानवी आयुष्यातच रुजले. सुभाषितांचे सन्मानाचे स्थान त्यांच्या अनेक ओळींना मिळाले. जनपरंपरेत गदिमांची ही गीते व त्यांतील ओळी अशा काही मिसळून गेल्या आहेत की, त्यामुळेच या लेखनाला लोकवाङ्मयाचे स्वरूप आले आहे.

त्यांच्या काव्यात व गीतात जाणवतात.

जीवनचिंतन

गदिमांच्या गीत रामायणातील जीवनचिंतन सर्वश्रुत आहेच पण त्याव्यतिरिक्त त्यांनी जी चित्रपट गीते लिहिली त्यातही त्यांनी जीवनातील चिरंतनमूल्य जपणूक करणारे काव्य लिहिले. गदिमांच्या भावविश्वात या मूल्यांना अजोड स्थान आहे. विशेष म्हणजे गहन तत्त्वज्ञान व्यक्त करतानाही प्रासादिक शब्दकळेने ते अंतर्मुख करतात. स्वरतीर्थ सुधीर फडके, वसंत पवार, दत्ता डावजेकर, श्रीनिवास खळे यांच्या संगीताने हे चिंतन घरोघरी पोहोचवले. परंतु, केवळ संगीतसाजाव्यतिरिक्तही केवळ विचार म्हणूनही ही गीते व त्यातील काव्य आपल्याला मोहवून टाकते. काही ओळी विनासायास आठवतात.

मुखी कुणाच्या पडते लोणी, कुणा मुखी अंगार
विठ्ठला तू वेडा कुंभार! ***किंवा***
इथे फुलांना मरण जन्मता
दगडाला पण चिरंजिविता, बोरिबाभळी उगाच जगती
चंदन माथी कुठार ***किंवा***
एक धागा सुखाचा शंभर धागे दु:खाचे
जरतारी हे वस्त्र माणसा तुझिया आयुष्याचे

उदाहरणे वाचतानाही आपण ती कधी गुणगुणू लागतो आहोत, हे आपल्यालाही कळले नसेल ! गदिमा हे संघर्ष करीत जगणाऱ्या कष्टकरी शेतकऱ्याच्या कुटुंबात जन्माला आले. वाढले, विकसित झाले. त्यामुळे त्यांचे भावविश्वही तेथील सुखदु:खांच्या प्रतिभा घेऊन समृद्ध झाले. बहुसंख्य वाचकांचा सामाजिक वर्गही त्याच प्रकारचा होता, म्हणूनच गदिमांचे शब्द, त्यांचे भावविश्व समाजाशी एकरस झाले. गदिमांच्या भावविश्वात संतपंथाच्या चिंतनाला जसे हृदयस्थानी स्थान आहे, त्याप्रमाणे उत्कट प्रीतीच्या चिरनूतन वसंताची प्रेमगीतं लिहावी ती गदिमांनीच. हे माझं कवी-गीतकार व रसिक म्हणून मत आहे, प्रेमगीतांतून व्यक्त होणारे गदिमांचे भावविश्व तरल आहे. प्रेमीजनांच्या संवेदनांची व्याकूळता, विरहोकंठित भाव निसर्ग प्रतिमांमधून गदिमा व्यक्त करतात. उदाहरणेच बोलकी आहेत.

सांग तू माझा होशील का?
वसंतकाली वनी दिनांती
एकच पुशिते तुज एकांती
एकांती कर कोमल माझा हाती घेशील का? ***किंवा***
धुंद मधुमती रात रे
तनमन नाचे, यौवन नाचे
उगवला रजनीचा नाथ रे
ह्या गीतातील पुढील ओळी नीट पाहा
जललहिरी या धीट धावती
या हरित तटांचे ओठ चुंबिती
येई प्रियकरा, येई मंदिरा
अलि रमले कमलांत रे, नाथ रे !

संस्कृतची महिरप नक्षीदार अशी प्रासादिक शब्दकळा आणि वातावरण निर्मितीला पोषक चित्रमयता अशी अनेक वैशिष्ट्ये त्यांच्या गीतरचनेत व्यक्त होतात. त्यात एक भावमधुर नाट्य असते. नायक-नायिका यांच्या अरूप भावनांना स्वरूप करण्याचा ध्यास असतो.

विशालपट

गदिमांच्या भावविश्वाचा पट विशाल आहे. वत्सल गीते, भूपाळी, देशभक्तिपरगीते, बालगीते, अशा अनेक रूपांनी हे भावविश्व घाटदार झाले आहे. गीतगोपाळ आणि गीतरामायण ही दोन काव्यकुसुमे त्यांच्या प्रतिभेतून आली. दंतकथाच वाटावी अशी काही लोकोत्तर व्यक्तिमत्त्वे मराठी भाषेच्या अंगणात होऊन गेली. पुल, गदिमा ही त्यातील महत्त्वाची नावे. शतकानंतरही त्यांच्या अजरामर कलाकृती या अमिट राहणार आहेत. गदिमांच्या जन्मशताब्दीचे औचित्य हे एक मंगल निमित्त आहे. परंतु, त्यानंतरही ह्या शब्दयोगी काव्यतीर्थाच्या काव्याचे, गीतांचे, इतर लेखनाचे पारायण करणे हा रसिकांच्या समृद्धीचा रियाज आहे; म्हणूनच तो नित्याने करीत राहणे ही त्यांना आदरांजली व तो आपल्या आंतरिक समृद्धीचा प्रवास आहे.

दैवी ऊर्जा

गीतरामायणांतून गदिमांनी आपली दैवी ऊर्जा मराठी भाषेला दिलेली दिसते. एरव्ही काय कुणाला रामचरित्र माहीत नव्हते असे थोडेच आहे ? अवघ्या भारतवर्षाला ते मुखोद्गत आहे. परंतु, गीतरामायणातून ग.दि.माडगूळकरांना फक्त रामकथाच उलगडायची नव्हती. तर, त्या कथेच्या सोबतीने चिरंतन मूल्ये, नातेसंबंध, जीवनातील मधुरता, ईश्वरता, अटळ असे नियतीनाट्य मांडायचे होते. दशरथ-राम, राम-भरत, कौसल्या-राम, राम-सीता या नात्यातील विरह व चिरविरह गदिमांनी असे काही पटकथा गुंफून मांडले की, प्रत्येक गीत जीवनाचे महाकाव्य झाले. गीतरामायणाचा मूळ रामायणाप्रमाणेच अनेकदा सर्वत्र पुन्हापुन्हा विचार होतो व तो रामायणाप्रमाणेच रसिकांना अवीट वाटतो.

असे होते पु.ल.

- पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे म्हणजेच पुल देशपांडे उर्फ भाई ऊर्फ पुल (**जन्म :** मुंबई, ८ नोव्हेंबर १९१९; **मृत्यू :** पुणे, १२ जून २०००)
- लेखक, नाटककार, नट, कथाकार व पटकथाकार, दिग्दर्शक आणि संगीत दिग्दर्शक अशी त्यांची ओळख आहे.
- 'पुलं'चा जन्म मुंबईतील गावदेवी परिसरातील कृपाल हेमराज चाळीत झाला.
- त्यांच्या वडिलांचे नाव लक्ष्मण तर आईचे लक्ष्मीबाई देशपांडे होते.
- १९६० च्या सुमारास देशपांडे कुटुंब ग्रँट रोडवरील किनवे हाऊस येथे राहायला आले.
- त्यानंतर देशपांडे कुटुंब विलेपार्ले येथे स्थायिक झाले आणि 'पु.ल.' पुणे या विद्येच्या माहेरघरी आले.
- पुलंचे शालेय शिक्षण पार्ल्याच्या टिळक विद्यालयात झाले.
- पुण्यातील फर्ग्युसन कॉलेज आणि सांगलीच्या विलिंग्डन कॉलेजातून त्यांनी शिक्षण घेतले.
- भास्कर संगीतालय येथील दत्तोपंत राजोपाध्याय यांच्याकडून त्यांनी हार्मोनियमचे (पेटी) धडे घेतले.
- त्यांचे दोन विवाह झाले. १९४० च्या सुरुवातीलाच त्यांच्या पहिल्या पत्नीचे निधन झाले.
- त्यांच्या दुसऱ्या पत्नीचे नाव सुनीता ठाकूर. त्या मूळच्या रत्नागिरीच्या होत्या.
- मुंबईतील ओरियंट हायस्कूलमध्ये दोघेही शिक्षक म्हणून नोकरीला होते.
- कर्नाटकातील बेळगाव येथे काही काळ 'पुल'नी प्रोफेसर म्हणूनही काम केले.
- त्यानंतर त्यांनी लेखन, अभिनय, दिग्दर्शन आणि संगीतकार म्हणून कारकिर्दीला सुरुवात केली.
- पु.ल. भाषाप्रेमी होते. त्यांना बंगाली, कानडी येत असल्याने ते त्या त्या समाजातील लोकांत सहज मिसळत.
- १९४७ मध्ये 'कुबेर' चित्रपटाद्वारे पुलंनी संगीतकार म्हणून चित्रपटक्षेत्रात पदार्पण केले.
- 'इंद्रायणीकाठी भक्त तुझा रंगे', 'नाच रे मोरा' यांसारखी त्यांनी संगीतबद्ध केलेली गाणी आजही लोकप्रिय आहेत.
- 'गुळाचा गणपती' हा पुलंचा शेवटचा चित्रपट ठरला. यातील कथा, पटकथा, संवाद, गीते, संगीत आणि दिग्दर्शन पुलंचे होते. नायकाची भूमिकासुद्धा पुलंनी साकारली होती. हा चित्रपट सर्वत्र चांगला गाजला. या चित्रपटातील 'इथेच टाका तंबू', 'सुवर्ण द्वारावतीचा राजा' यांसारखी गाणी विशेष लोकप्रिय झाली.
- कुबेर, मानाचे पान, गुळाचा गणपती, जागा भाड्याने देणे आहे हे त्यांचे चित्रपट विशेष गाजले.
- समाजातील चांगल्या उपक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी 'पु.ल. देशपांडे प्रतिष्ठान' अस्तित्वात आले. १९६५ पासून सुमारे ७५ लक्ष रुपयांच्या देणग्या प्रतिष्ठानाने दिल्या.
- साहित्य अकादमी, संगीत नाटक अकादमी या दोहोंचे पुरस्कार मिळवणाऱ्या मोजक्या प्रतिभावंतात पुलंचा समावेश होतो.
- नांदेड नाट्यसंमेलनाचे अध्यक्षपद भूषवले
- इचलकरंजी साहित्यसंमेलनाचे अध्यक्षपद भूषवले
- लग्नाच्या ५४ व्या वाढदिवशी 'पुलं'चे निधन झाले.

'पुलं'ना मिळालेले पुरस्कार

- पद्मश्री – १९६६
- संगीत नाटक अकादमी पुरस्कार – १९६८
- बालगंधर्व स्मृती गौरव पुरस्कार – १९८८
- पद्मभूषण – १९९०
- महाराष्ट्र गौरव (बहुरूपी) – १९९०
- पुण्यभूषण – १९९३
- गदिमा पुरस्कार – १९९३
- महाराष्ट्र भूषण –१९९६.
- साहित्य अकादमी पुरस्कार – व्यक्ती आणि वल्ली
- कालिदास पुरस्कार
- विष्णुदास भावे पुरस्कार

व्यक्तिचित्रे
गणगोत
गुण गाईन आवडी
मैत्र
आपुलकी

विनोदी साहित्य/लेखन संग्रह
खोगीर भरती
नसती उठाठेव
गोळबेरीज
हसवणूक
खिल्ली
अघळपघळ
वटवट वटवट
पुरचंडी
मराठी वाङ्मयाचा (गाळीव) इतिहास
उरलंसुरलं
निवडक पु.ल.
पुढारी पाहिजे
एक शून्य मी
चित्रमय स्वगत
रेडिओवरील भाषणे व श्रुतिका
चार शब्द
टेलिफोनचा जन्म
दाद
रविंद्रनाथ : तीन व्याख्याने
कोट्याधीश पु.ल.
व्यक्ती आणि वल्ली
मुक्काम शांतिनिकेतन (पत्रलेखन संग्रह)

भाषांतर
एका कोळीयाने
काय वाट्टेल ते होईल
कान्होजी आंग्रे
स्वगत (जयप्रकाश नारायण)
पोरवय

नाटके व एकांकिका
तुका म्हणे आता
अंमलदार
भाग्यवान
तीन पैशाचा तमाशा
तुझे आहे तुजपाशी
सुंदर मी होणार
राजा ओयदिपौस
एक झुंज वाऱ्याशी (अनुवाद)
ती फुलराणी (रूपांतर)
छोटे मासे मोठे मासे
विठ्ठल तो आला आला
आम्ही लटिके ना बोलू
वयं मोठं खोटं (बालनाट्य)
नवे गोकुळ (बालनाट्य)

संगीत दिग्दर्शन-चित्रपट
मोठी माणसे
मानाचं पान
देवबाप्पा
दूधभात

भाषणे
रसिकहो!
सृजनहो!
श्रोतेहो!
मित्र हो!

एकपात्री प्रयोग
असा मी असामी
बटाट्याची चाळ

प्रवास वर्णन
अपूर्वाई
पूर्वरंग
जावे त्यांच्या देशा
वंगचित्रे

पुलंसोबत अतुल परचुरे

पु. ल. देशपांडे रूढार्थानं, ऐहिक जगातून गेले असले तरी त्यांच्या लेखनाच्या रूपाने ते प्रत्येक मराठी माणसाच्या मनात आहेत. मराठी मनाच्या एका कप्प्यात पुलंना कायमच स्थान असेल. मराठी साहित्याच्या इतिहासात सुवर्णाक्षरानं लिहिलेलं पान पुलंचं असेल.

बहुआयामी पु.ल.

अतुल परचुरे

पु. ल. देशपांडे यांना बहुआयामी, अष्टपैलू अशा विविध प्रांतात मुशाफिरी करणारे एक ज्येष्ठ व लोकप्रिय कलावंत आणि जाणकार रसिकही म्हणता येईल. स्वत: लोकप्रिय, लाडके असूनही इतर कलावंताच्या पाठीवर मनापासून कौतुकाची थाप मारणारे रसिकाग्रणी म्हणता येईल. पु.ल. देशपांडे यांची कौतुकाची शाबासकी मिळाली की, ते कलावंताला गौरवास्पद असायचं. अशाच मोजक्या कलावंतांपैकी मी एक भाग्यवान.

पु.ल. देशपांडे यांच्यापेक्षा वयानं, कीर्तीनं, कर्तृत्वाने मी कितीतरी लहान होतो. तरीही मी त्यांचीच भूमिका करण्याचे धाडस केले व त्यांनी माझं कौतुकही केलं होतं.

पु. ल. देशपांडे प्रथम मला प्रत्यक्ष भेटले तो प्रसंग मला चांगला आठवतो आहे. कॉलेजमध्ये असताना आम्ही 'टिळक आणि आगरकर' बसवलं होतं. १९८२ मध्ये हे नाटक आम्ही बसवत होतो तेव्हा दाजी भाटवडेकर यांनी माझी ओळख करून दिली होती की 'हा अतुल परचुरे, गणपतराव बोडस यांचा पणतू' गणपतराव बोडस माझ्या आईचे आजोबा. त्या वेळी त्यांनी मला लेखी आशीर्वाद दिला होता की, 'पणजोबासारखा मोठा नट हो.' कॉलेजमधला उत्साही तरुण असल्यामुळे मी त्यांची स्वाक्षरी मागितली. तेव्हा त्यांनी मला हा आशीर्वाद दिला. हा आशीर्वाद मी पुढच्या आयुष्यात पुरवला.

नंतर १९९४ साली 'तुज आहे तुजपाशी' जेव्हा आम्ही बसवलं, त्या वेळी दोन प्रयोगांना पु.ल. व सुनीताबाई दोघेही आले. नाटकाला येण्याच त्यांचं कारण भन्नाट होतं. ते म्हणाले होते की, आम्ही आलो म्हणजे का? तर बऱ्याच वर्षांनी त्या त्या वयाची माणसं ती काम करत आहेत. तोपर्यंत शामची भूमिका ५०-५५ वर्षांचा माणूस पण करू लागला होता.

'व्यक्ती आणि वल्ली 'करायचं ठरलं आणि कास्टिंग सुरू असताना माझं नाव ठरलं. तेव्हा पु.ल. म्हणाले की, 'अतुलला करू दे माझे काम. हे मोठं होतं माझ्यासाठी आणि मग प्रयोग बघायला आले तेव्हा मागे येऊन प्रतिक्रिया दिली.' 'अरे, मी जर का हे काम केलं असतं तर असंच केलं असतं. तुझं काम पाहून मला सतीश दुभाषीची आठवण येते.' रिहर्सलला यायचे, काही सुचवायचे. त्या वेळची ही एक आठवण. ते खुर्चीवर बसले असताना त्यांना पार्किन्सनचा त्रास सुरू झाला. उठताना पटकन मी त्यांना हात द्यायला गेलो तर लगेच म्हणाले, 'नाही नाही रे, हल्ली थोडा वेळ लागतो. कारण स्टार्ट घ्यावा लागतो.'

एकदा याच नाटकाच्या तालमीला मी पेटी थोडी वाजवून बॅकग्राऊंड म्युझिक देण्याची रिहर्सल करत होतो. पण माझं पेटीवादन ते काय? मला काही पेटी वगैरे वाजवता येत नाही. मी पुलंना पेटी वाजवून दाखवली. त्या वेळी ते म्हणाले, 'हे असं नाही.' आणि पेटी वाजवून दाखवली.

पुलंना निर्विष आणि निर्मळ विनोद महाराष्ट्राला दिला आहे. किती उदाहरणं द्यायची त्यांच्या विनोदाची.

एक तबला वादक होते, अतिशय साधेसरळ. त्यांना म्हणाले, 'काय तुम्ही, इतके पट्टीचे तबलावादक आहात, पण साधी थाप नाही मारता येत.'

'आमचा बाप'

आज असं झालं आहे की, विनोदी भाषण करायचं असेल तर प्रत्येक वेळा 'पुल म्हणतात.....' किंवा 'पुलंनी म्हणूनच ठेवलंय.....' असे म्हटलं जातं. मग हेच साहित्य पोहोचवण्यासाठी कार्यक्रम का करू नये. पुलंच्या विनोदातील सौंदर्यस्थळं रसिकांना

दाखवून देता येतील असा विचार मनात आला आणि त्यातूनच मग हा कार्यक्रम करावा असं मनात आलं आणि हा कार्यक्रम आम्ही बसवला. 'आम्ही आणि आमचा बाप' यात आम्ही त्यांच्या न ऐकलेल्या काही गोष्टींचं वाचन करतो तसंच 'वाऱ्यावरची वरात'ही वाचतो. अनेकांनी पुलंच पुस्तक वाचलेलं असतं. पण त्यातली सौंदर्यस्थळ आम्ही दाखवतो. त्यामुळे हा प्रयोग रंगतदार होतो.

मी असं नेहमी म्हणतो की, आम्ही खूप अनिश्चित अशा क्षेत्रात काम करत असतो. म्हणजे आज भरपूर काम आहे आणि उद्यापासून हातात काही नाही, रिकामे आहोत, असे कलाकारांच्या जीवनात असू शकतं तर त्या काळात पुलंचं साहित्य व संगीत माझ्याबरोबर असत, ते नैराश्य आणूच देत नाही.

पुलंनी 'मराठी वाङ्मयाचा गाळीव इतिहास'मध्ये मराठीच्या अवस्थेबद्दल असं लिहिलंय की, 'मराठी माणसं, मराठी का बोलतात? कारण त्यांना एवढी एकच भाषा येते.' मुसलमानांनी एकदा उर्दू शिकवायचा प्रयत्न केला पण 'तोबा तोबा' म्हणत ते परत गेले.

स्वत: इतके मोठे लेखक, दिग्दर्शक होते तरीही नावीन्य आणि थोरवीचं आकर्षण त्यांना होत. बंगालमध्ये 'शांतीनिकेतन' मध्ये ते जाऊन राहिले होते. रविंद्रनाथ टागोर यांच्या साहित्याने ते इतके भारले गेले की, ते बंगाली भाषा शिकले.

पुलंवर टीका करणारे दुर्मीळच आहेत तरीही काहींना वाटतं की, त्यांनी फक्त विनोदी लेखन केलं किंवा तळागाळातील वंचितांचं जीवन लिखाणात उतरल का ? मी म्हणेन, असं जर कोणी म्हणत असेल तर त्यांनी समग्र पु.ल. वाचलेच नाहीत. पुलंनी दया पवार यांचे बलुतं वाचून अप्रतिम अभिप्राय लिहिला आहे. 'मराठीचा गाळीव इतिहास' मध्ये भल्याभल्यांवर कोपरखळ्या मारल्या आहेत. मालवणी भाषेतील 'वस्त्रहरण' हे नाटक जेव्हा रंगभूमीवर आलं तेव्हा सुरुवातीला खूप चालत नव्हतं. पु. ल. देशपांडे नाटक पाहायला गेले. त्यांना हे नाटक इतकं आवडलं की, त्यांनी खूप छान प्रतिक्रिया दिली. भरभरून कौतुक केलं. नाटकाच्या जाहिरातीमध्ये त्यांची प्रतिक्रिया छापली गेली. नाटक छानच बसलं होतं पण पुलंच्या प्रतिक्रियेमुळे प्रेक्षक नाट्यगृहाकडे वळले. नंतर नाटकांने तुफान घोडदौड सुरू केली. आनंदवनसारख्या अनेक सामाजिक संस्थांना त्यांनी मदत केली. मिळालेल्या धनाचा या हाताचा त्या हाताला न कळता त्यांनी दानधर्म केला. आनंदवनाच कार्य पाहून तर ते भारावून जात, त्या ठिकाणी अनेक वेळा राहायला जात असत. एखाद्या लेखकाचं मोठेपण तेव्हाच उद्धृत होतं जेव्हा त्यांच्यावर लिहिलं जात. पुलंची स्वत:ची साहित्यसंपदा आहे. तितकीच त्यांवर लिहून आलेली पुस्तकं आहेत आणि तीसुद्धा तेवढीच वाचनीय आहेत.

ज्या पुण्यात नंतर ते राहायला गेले आणि पुण्याने त्याच्यावर अतोनात प्रेम केलं, त्यावर किती मजेशीर लिहिलं आहे पुलंनी. आणि पुणेकरांनीपण ते अगदी प्रेमळपणे घेतलं होतं. पुलंचं निधन झालं तेव्हा उत्स्फूर्तपणे 'पुणे बंद' झालं होतं.

वेगळा आनंद

आनंदवनात अनेकजणांचे विवाह ते लावायचे, स्वत: मंगलाष्टक म्हणायचे. तिथल्या लोकांनी तयार केलेलं कापडही ते वापरायला लागले होते. कित्येक वर्षे दुसरे कपडे घातले नव्हते. आनंदवनात त्यांनी रोग्यांच्या जखमा धुतल्या आहेत.

'व्यक्ती आणि वल्ली' नाटकात मी काम केलं. ते पुस्तक शाळेतून बाहेर पडलो तेव्हाच प्रथम मी वाचलं होतं आणि त्यानंतर असंख्य वेळा वाचलं आहे. बाहेरगावी शूटिंगला जाताना माझ्याबरोबर 'बटाट्याची चाळ' सारखी पुस्तकं गाडीत कायम असतात. कितीदाही वाचली तरी त्याची गोडी संपत नाही. माझं सद्भाग्य म्हणजे माझी त्यांच्याशी ७-८ वेळा तरी भेट घडली आहे, आमच्या नाटकाच्या तालमीला ते आले आहेत, आम्हांला सूचनाही केल्या आहेत. आणि नाटकाचा प्रयोगही पाहायला आले आहेत.

अविस्मरणीय स्थान

माझ्या आयुष्यात पुलंचे स्थान इतकं आहे की १९९४-९५ दरम्यान पुलंना पंचाहत्तरीनिमित्त चतुरंगचा जीवनगौरव पुरस्कार मिळाला होता. तेव्हा आम्ही 'तुज आहे तुजपाशी'केलं होतं. या नाटकादरम्यानच माझी व सोनियाची ओळख झाली आणि ओळखीचं रूपांतर लग्नात झालं होतं.

'नातीगोती'हे आमचं नाटक ते पाहायला आले होते. नंतर नाटक संपल्यावर म्हणाले होते की आधी अतुलला भेटतो, पाहतो हातीपायी धड आहे नं तो. पुलंचे ज्या दिवशी निधन झालं त्या दिवशी आम्ही 'व्यक्ती आणि वल्ली' या मालिकेसाठी 'हरितात्या' ह्या एपिसोडचं शूटिंग करत होतो, काय हा दैवदुर्विलास ? पण आमच्यातर्फे त्यांच्या लेखनाला ती आदरांजलीच त्या दिवशी म्हणावी लागेल.

शब्दांकन : शिबानी जोशी

सहज शैली

मध्यमवर्गीयांच्या भावभावना पुलंनी अप्रतिम उतरवल्या. अफाट निरीक्षणशक्ती होती त्यांची. आपणही आजूबाजूला घडत असलेल्या घटना उघड्या डोळ्यांनी पाहतच असतो. वाचनही करत असतो पण ते निरीक्षण कोणालाही न दुखवता, कोणालाही उपदेशाचे डोस न पाजता हलक्याफुलक्या शैलीत उतरवणं हे खरच कठीण काम आहे. सर्वात कठीण आहे 'सोपं लिहिणं' आणि ते लिखाण पुलंनी केलं. असं मला वाटतं. आज चाळी, एकत्र कुटुंबपद्धती नव्या पिढीला माहीतच आहेत कुठे ? पण तरीही पुलंचं लिखाण वाचल्यावर ते डोळ्यासमोर मूर्तिमंत उभं राहतं.

पुलंचं घर अतिशय साधं होतं. त्यांना कुणी एखादी वस्तू वा चित्र भेट दिले तर ते काही दिवस आवर्जून घरात ठेवायचे. पुलंच्या घरी कधी गप्पांची तर कधी संगिताची मैफल सुरू असायची. त्यांच्या घरी येणाऱ्या प्रत्येकाचे सुनीताबाई अगत्याने आदरातिथ्य करायच्या.

पुलंचं घर

अनिल अवचट

बालगंधर्व रंगमंदिराच्या स्थापनेत पुलंचा पुढाकार होता. त्यांनी घेतलेल्या भूमिकेवर सडकून टीका करणाऱ्या लेखानं माझ्या लेखनाची सुरुवात झाली. आणि आज त्यांना स्मशानात पोहोचवून आल्यावर डोकं चढलं, म्हणून मी अस्वस्थ आहे. नाटकाचं थिएटर बांधण हे महापालिकेचं काम नव्हे, त्यापेक्षा त्यांनी झोपडपट्टीत सुधारणा कराव्यात. रस्ते, साफसफाई, आरोग्य इत्यादी त्यांच्यावर सोपवलेली कामं करावीत, अशी काहींची भूमिका होती. ती मला पटत होती. सुंदर पुणं की स्वच्छ पुणं हा वाद त्या वेळी माजला होता. पुल त्या वेळी लोकप्रियतेच्या एवढया शिखरावर होते, की त्यांच्या विरोधात कुणी लिहू धजत नव्हतं. पण मी सर्वच क्षेत्रांतला नवखा. मला कसलं भय आणि कसलं काय?

एकदा मला मित्र म्हणाला, पुल सतलजवर उतरले आहेत. मी चाललोय. तू येतोस का त्यांना भेटायला? मला धाकधूक वाटली. काय म्हणतील ते आपल्याला ? पण बघू या तरी, म्हणून गेलो. तर पुलंनी उलट हसून स्वागतच केलं. म्हणाले, तुला ज्या झोपडपट्टीत रस आहे, त्यात मलाही आहे. चल, आपण मिळून काम करू. तिथल्या लहान मुलांना आपण एक ओपन एअर थिएटर बांधून देऊ. मला ते पटलं नाही.त्या वेळी मला त्या लोकांच्या परिस्थितीत जास्त रस होता. पण इतक्या मोठया साहित्यिकानं त्यांच्या विरुद्ध लिहिणाऱ्या एका तरुण पोराला चार शब्द सुनवायला काहीच हरकत नव्हती. कटुता न ठेवता ज्या रीतीनं मोकळ्या मनानं त्यांनी जोडून घेतलं, त्यामुळे एक चांगला ठसा मनावर उमटला होता.

मैफल

माणसांचा राबता असायचा, पुलंच्या गप्पाची मैफल असायची. आमच्यासारख्या नवीन लोकांनाच मुक्त प्रवेश असायचा. प्रसन्न चेहरा, लवचीक हावभाव. कुठल्याही प्रसंगाला, गमतीला ते छान रंगवत व एक आकार देत असत. सुनीताबाई मधूनच 'काल की नई भाईनं कमालच केली,' अशी सुरुवात करून पुलंनी केलेला एखादा विनोद सांगत असत.

गर्दीतील हिरो

पुढं पुलं पुण्यालाच राहायला आले. आधी 'शेफाली'त, नंतर 'रूपाली'मध्ये. कुठेकुठे मैफिलीत, सभांमध्ये दिसू लागले आणि थोड्याच दिवसांत पुण्याचा भाग बनून गेले. एकदा नंदा नारळकर या माझ्या परिचितांच्या घरी रात्री मैफल होती. मध्यंतरात गप्पा चालल्या होत्या. बघता बघता पुलंनी त्यात काही विनोद केला आणि स्फोट व्हावा तसे सर्व हसले. गायकानं काही सूर लावत लावत अचानक एकादी रचना निर्माण करावी किंवा फूटबॉल इकडून तिकडे ढकलला जात असताना अचानक एकानं त्यांचा गोल करावा, तसं त्या गर्दीत पुल हिरो होते. खादी सिल्कचा बुशशर्ट घातलेले. लोक हसत असता नंतर तेही हसले. त्या वेळी, त्या मंद प्रकाशात, व्यंगचित्रकार नेहमी काढतात ते त्यांचे मधले दोन मोठे दातही दिसले. एखाद्या लहान मुलासारखे ते हसले.

साधी 'रूपाली'

नंतर मी 'रूपालीत' पुलंकडे वरचेवर जाऊ लागलो. घर साधं होत. त्यात एक लांबलचक सोफा. अखेरपर्यंत तो तसाच राहिला. समोर एक लांब टीपॉय. त्यावर सत्यकथा, ललित, नवभारत इत्यादी मासिकांचा छोटासा गठ्ठा, कोपऱ्यात एका उंच बेसवर ठेवलेला बडे गुलाम अली खाँचा गातानाचा ब्राँझमधला चेहरा. त्यांच्या शर्वरी रॉय

चौधरी या बंगाली मित्रानं केलेला. भिंतीवर दोन पेटिंग्ज. एक टागोरांचं, तर दुसरं बनारसच्या रस्त्याचं. नंतर एकदा चार्ली चॅप्लिनचा उभा फोटोही लागला. पुलंना कोणी काही चित्रं, वस्तू हातानं करून भेट देत. दर्जेदार नसूनही ते त्या वस्तू काही दिवस हॉलमध्ये ठेवत. विचारलं, तर म्हणत, अरे हा अमरावतीचा अपंग मुलगा आहे, त्यानं करून पाठवलंय...

बेल दाबली की सुनीताबाई दार उघडत. प्रसन्न हसून 'याऽऽ'म्हणत. मला, सुनंदाला कधीही या घरचा तुटक अनुभव आला नाही. बसायला सांगत आणि आत तोंड वळवून भाईऽऽ अशी हाक मारीत. आतून हसऱ्या चेहऱ्यानं पुल येऊन बसत. त्या वेळी ते घरी नेहमी खादी सिल्कचा झब्बा, पायजमा अशा स्वच्छ इस्त्रीच्या कपड्यांतच भेटत. सुनीताबाईंचा वावर स्वयंपाकघर ते हॉल असा असे. मध्ये दाराजवळ जरा खालच्या लेव्हलला फोन असे. आणि त्यासमोर त्याच उंचीचा, बुटका मोढा असे. फोन आला, तर सुनीताबाई त्या मोढ्यावर बसून फोन घेत. आमच्यासमोरच्या प्लेटमध्ये कधी बाकरवडी, कधी कडबोळी किंवा एका स्टिलच्या भोकं पाडलेल्या डब्यात डाळिंबाचे दाणे ठेवत. स्वयंपाकघर व्यवस्थित असे. मी कधी आत जाऊन म्हणालो की, मी करतो चहा, तुम्ही बसा बाहेर, तर त्या म्हणत, तू इथं घोटाळा करुन ठेवशील. ते निस्तरण्यात माझा वेळ जाईल. तू बस जा बाहेर.

पुलंकडं मी आठवड्यातून एकदोनदा तरी जात असे. जायची वेळ म्हणजे सकाळी साडेदहा-अकराची. वसंतराव देशपांडे पलीकडंच राहत. तेही कधी आले असता भेटत. पुल त्यांना प्रेमानं वश्या म्हणत. वसंतराव नसताना एकदा ते त्यांच्याविषयी सांगत होते. आमचा वश्या .. एवढी मोठी बेगम अख्तर.. पण चकित झाली त्याच्या ज्ञानापुढं आणि गाण्यापुढं. कधी नंदा नारळकर येत. उंच, खादीचे स्वच्छ कपडे घातलेले. मी कधी प्रवासावरून आलो आणि एखाद्या प्रश्नाची माहिती सांगू लागलो, तर पुल त्यांना फोन करत, 'अरे नंदा, ये रे, हा पोरगा काही चांगलं सांगतोय.' तेही पंधरावीस मिनिटांत हजर होत.

एकदा मी त्यांना म्हटलं, मला पेटी घ्यायचीय. कुठं घ्यावी?

ते म्हणाले, तू घेऊच नकोस. मी देईन. मधे मी कलकत्त्याला वाजवली होती, फार छान पेटी. तिकडं चांगली पेटी बनवणारे आहेत. मी तपास करतो. पुढं मधे बराच काळ जायचा. परत मी आठवण करायचो. परत बघतो म्हणायचे. एकदा म्हणाले अरे, मुंबईला परवा एक चांगली पेटी वाजवायला मिळाली. मुंबईचाच माणूस आहे. वसंताच्या ओळखीचा आहे. त्यालाच सांगतो. एकदा वसंतराव बसले होते. त्यांना विचारलं तुला पेटी कसली पाहिजे? साथीची का सोलोची?

मी विचार केली, मी कुणाची साथ करायला जाणार आहे? सोलोच बरी. म्हणून सांगितलं, 'सोलोची.'

पुढं कधी रस्त्यात, मैफलीत कुठंही वसंतराव भेटले की मी आठवण करायचो. ते विचारायचे, तुला साथीची पाहिजे की सोलोची? मग मी उत्तर द्यायचो. असं दोन-चारदा झालं. नंतर एकदा विचारलं, काय रे तुला कसली पेटी पाहिजे, साथीची का सोलोची? मी म्हटलं, नाही कपडे ठेवायची.

पुलंना नंतर त्यांनी हे सांगितलं म्हणाले, तुझा तो पोरगा वस्ताद आहे बरं का. नंतर त्यांनी लागलीच पेटी मिळवून पुण्याला पाठवूनही दिली. मला फोन येताच मी गेलो. पुलंनी आतून ती पेटी आणून सोफ्यावर ठेवली आणि बराच वेळ वाजवली. परवा त्यांचा भाचा दिनेश सांगत होता, त्यानं मला त्या वेळी प्रथम पाहिल, ज्या वेळी पुलं ती पेटी वाजवून दाखवत होते.

क्या बात है

हॉलमध्ये पेटी वाजवत बसत. बरेचदा पुलं मधूनमधून गाणं म्हणत. तानाही घेत. सांगत, ते (अमके) खाँसाहेब अशी तान घेतात. वाजवताना दोनतीनदा भात्यात हवा जास्त भरून नंतर तो हात सोडून, एकीकडे पेटी वाजवत राहत. सूर हलका होत अस्पष्ट होत जाई आणि तिकडं हातानं 'क्या बात है' ची खूण केली जाई. त्यांनी एकदा नाट्यगीत वाजवताना आता बघ गाण्याचे बोलही ऐकू येतात, एक म्हणून नुसते सूर नव्हे, पण त्या गीताचे बोलही ऐकू यावेत असा परिणाम ते समोर बसलेल्याला दाखवत. आणि म्हणत, 'पेटी बोलली नाही, तर पेटीत काय अर्थ आहे?' बसल्या बसल्या त्यांची सुरांची नजाकत चालू असतानाच, शरीरालाही नृत्यासारखे हेलकावे देत. हातानंही एखादी मुद्रा करावी तसे 'क्या बात है' म्हणत. त्यांच्या वाजवण्यात कमालीचं लालित्य असे. मन हलून जायचं, प्रसन्न व्हायचं.

टीव्हीवर चपला

मी त्या वेळी जाडजूड वहाणा घालत असे, त्यांना दोन बंद होते. म्हशीच्या कातड्याच्या जाड वहाणा. ससूनच्या सोशल वर्कर द्रविडबाईंनी हा आर्थोपिडिक्स डिपार्टमेंटमध्ये पट्टे वगैरे करणारा माणूस गाठून दिला होता. त्याला त्यांनी जोरात सांगितलं होतं, की वहाणा टिकाऊ झाल्या पाहिजेत. मग काही वर्षे मी त्या वापरायचो. पुलंनी त्या वहाणा पाहिल्या व म्हणाले, कुठ रे मिळतात ह्या? मी सांगितलं आणि विचारलं, तुम्हाला करूयात का अशा वहाणा? ते हो म्हणाले थोड्या पातळ, कमी जड करूयात, असंही ठरलं. द्रविडबाईंना त्यांचं माप देताच त्या चांभाराकडून उत्तम वहाणा करून घेतल्या. नंतर पुलं त्या वापरत असत मला एकदा द्रविडबाई भेटल्या त्या एक्साइट होऊन म्हणाल्या, आपल्या त्या चपला टीव्हीवर झळकल्या बरं का?

मी चक्रावून विचारलं, कशा काय?

वसंतराव देशपांडे गेले, त्यांच्या अंत्ययात्रेचं दाखवलं ना, त्यात पुलंना दाखवलं. त्या वेळी त्यांच्या पायांत त्या चपला होत्या. मी कपाळाला हात लावला.

वसंतराव गेले, हे पुलंना फार लागलं त्या वेळच्या प्रतिक्रियांमध्ये ते म्हणाले होते, त्या.. गायकानंतर मध्ये असा चतुरस्त्र गायक कोणीच झाला नाही, नंतर एकदम वसंताच मला कुणीतरी म्हणत होतं, म्हणजे काय, अमुक अमुक असे कुणी मध्ये नाहीत की काय? मी म्हणालो, पुलंची प्रतिक्रिया शब्दश: घेऊ नका त्यांना खूप दु:ख झालंय, एवढाच याचा अर्थ आहे.

'शिकविले ज्यांनी' या पुस्तकातील 'पुलंचं घर' यातील काही सारांश भाग

पुलंचे 'गणगोत' हे पुस्तक केवळ त्यांच्या इतर पुस्तकांपुरतं मर्यादित नाही. शेकडो मैल दूरदूरच्या प्रदेशांत ते पसरलेलं आहे. सुनीताबाई व भाई या दोघांचं आयुष्य अशा समान धाग्यानी बांधलं जाणं हा भाग्ययोग आहे. भाईंच्या प्रत्येक गोष्टीत, कार्यात, सुनीताबाईंसारखी तितकीच जाण असलेली, बुद्धिवान, शिस्त असलेली कलावंत जाणती बाई आहे. जोडलेल्या माणसांना आयुष्यभर जिव्हाळा देण्याचं व मदत करण्याचं त्यांच्या सुखापेक्षाही त्यांच्या दुःखात मदतीला उभं राहण्याचं महत्त्वाचं काम सुनीताबाईंनी केलं.

आनंदयोगी पु.ल.

ना.धों. महानोर

जीवनाच्या आणि विशेषःत कलेच्या सर्वच क्षेत्रातल्या आणि पारदर्शी सुंदर आणि रमनीय अनुभवांचा शोध घेत पुलंनी आपलं व्यक्तिमत्व समृद्ध आणि सुजाण केलं. माणूसप्रेमी या कलावंताने माझ्यासारख्या विविध क्षेत्रातील प्रतिभावंताचे स्वागत व कौतुक केले. त्यांच्या सान्निध्यात आल्यानंतर त्यांच्यासोबत जडलेला स्नेह वेगळाच होता. मला माझ्या अनेक चांगल्या वाईट प्रसंगी त्यांचा आधार वाटत असे.

आयुष्याच्या एका वळणावर मनातील दुखाःचा प्रचंड त्रास होत होता त्यावेळी मी सुनीताबाई व भाईंना पत्र लिहिलं. मला शोधण्यासाठी उषाताई आपटे व दादा नेव्हे यांच्याकडे एक-दोन दिवस फोन येत होते. मी फोनवर भाईंशी थोड बोललो नंतर सुनीताबाई अर्धा तास फोनवर बोलत होत्या. खूप बोलल्या. सिंह व डुक्कर यांची गोष्ट मला सांगितली. जिंकलेल्या गोष्टीची व परत फिरलेल्या सिंहाची मला काय-काय सांगून स्थिर केलं. माझ्याकडून वदवून घेतलं पुन्हा असं मनात आणणार नाही. पुन्हा भाई बोलले. सगळ्यांना लगेच पुण्याला बोलावलं. मी सगळ्या कुटुंबासह त्यांनी बोलावलं म्हणून गेलो. वर्षा व वसंत पाटील आम्हाला त्यांच्या घरी घेऊन गेले.

'व्यक्ती आणि वल्ली' या पुस्तकापासून त्यांच्या सबंध साहित्याने मला वेड लावले. मी हसलो-रडलोसुद्धा त्यासंबंधी मी तोकडं काय लिहीणार? एवढं समक्ष पाहिलं आहे. या शतकांतील मराठी लेखकांमध्ये सर्वाधिक लोकप्रिय असलेले ग्रंथसंपदा त्यांची आहे. रसिकांमध्ये घराघरांमध्ये इतकं प्रेम असलेली प्रत्यक्ष ग्रंथसंपदा कुणाचीही नाही. महाराष्ट्रात व परदेशातही भाईंची पुस्तके सर्वाधिक विकली जातात. तीच गोष्ट नाटकांची, व चित्रपटांची, गीतांची व संगीताची.

गणगोत

'जोडुनिया धन उत्तम वेव्हारे' याचं तंतोतंत पालन करून कोट्यवधी रुपयांचे दान भाईंनी नीट पारखून घेतलेल्या संस्थांना दिलं. या सगळ्याच संस्थांशी संबंधित लोकं भाईंचे गणगोत होऊन बसले. स्वतःच्या लेखनातून मिळवलेला इतका पैसा निरिच्छपणाने देणारा लेखक माझ्या माहितीत नाही. या सगळ्या गोष्टीमध्ये तंतोतंत किंवा भाईंपेक्षा अधिक लक्ष घातले ते सुनीताबाईंनी. म्हणूनच हे इतकं चांगलं स्वच्छ, नीटपणाने होऊ शकलं हे अनेकदा जवळून पाहिलं आहे.

संगीत कलेमधल्या देशातील सगळ्याच घराण्याशी नाते बांधलेले भाई, थोर-थोर प्रतिभावंत आणि कलावंत यांच्यामध्ये वावरणारे भाई, दादा नेव्यांच्या मिरची कांद्यांच्या दाणाबाजारातल्या जळगावच्या प्रचंड धूळ व गोंधळ असलेल्या पुस्तक पंढरीतही जाऊन बसत. माझ्यासारख्या, बापू कांचन सारख्या शेतकरी मित्रांशी आयुष्य बांधून राहत. त्यांच्याबरोबरीनेच किंवा अधिक काळजी घेणाऱ्या सुनीताबाईंसारख्या बाई माझ्या पाहण्यात नाही. साधा सदरा-लेंगा घालून जगणं. बाईंच साधं पातळं महिन्याला लागतील तेवढे पैसे शिल्लक ठेवून बाकी धनातून विविध कार्याला मदत करणाऱ्या भाई व सुनीताबाई यांना कोणी व कसे घडवले ते देवच जाणे. पुन्हा भाई देव मानतच नाही.

आयुष्यसहज गप्पा

आयुष्यसहज गप्पा माराव्यात असा भाईंचे भाषण कुठलाही विखार नसलेला आणि मनसोक्त हासवणारा त्यातील विनोद, भाईंचा हजरजबाबीपणा खाजगीतली खास वटवट किंवा भाईंच्या भाषेत गोड टवाळकी अशा त्यांच्या अंगभूत गुणांनी महाराष्ट्र त्यांच्यावर जीव टाकून प्रेम करायचा. भाईंना त्याच क्षणी हे सुचत कसं, आणि ते आपल्याला एकाएकी कसे गुंतवून टाकतात, याचे मला नेहमीच नवल वाटतं राहिलं. देशातील श्रेष्ठ साहित्यकार व श्रेष्ठ कलावंत यांच्याशी दृढ सबंध असलेले प्रतिभावंत भाईं थेट मातीतील सामान्य माणसांशी, तिथल्या निसर्गदत्त जीवनाशी एकरूप होऊन राहत. आपलं मोठेपणं विसरून केवळ मानवी सबंधांनी त्यांना आपल्याशी प्रेमाने व जिव्हाळ्याने जखडून टाकतं. त्यांची लोकप्रियता जशी त्यांच्या बहुरूपी पोत असलेल्या साहित्य कलेमधून उभी राहते. तशीच किंबहुना त्यापेक्षाही अधिक मानवी भावभावना जतन करण्याच्या अकृत्रिम कृतीमुळेही..

माणसापेक्षा मोठा देव मला कोणताही भेटला नाही, अशी त्यांची श्रद्धा होती. पन्नासाव्या वर्षी बंगाली शिकायची म्हणून गेले आणि अख्खा रविंद्रनाथ टागोर त्यांची शांतीनिकेतन व श्रीनिकेतन या सर्वांविषयी गावोगावी सांगत बसले. तिथली नवी दृष्टी महाराष्ट्राला देण्याचा प्रयत्न भाषणातून, पुस्तकातून अहोरात्र केला.

मनाचा मोठेपणा

भाई नेहमी म्हणायचे इथल्या सामान्य माणसांनीही मला खूप दिलं. निस्सिम प्रेम दिलं. चांगलं ते घेऊन मी आयुष्यभर तृप्त मनाने जगलेला एक आनंदयात्री आहे. या सगळ्याचे ऋण फेडणे अशक्य आहे, सहजपणाने भाई शेवटपर्यंत सांगत होते. अनेकविध कलाप्रकारात अनेक उत्तुंग शिखरं गाठली. भाईंनी स्वतःच्या कष्टातून कलेतून कमावलेल्या योग्य ठिकाणी न बोलता वाटून दिलेल्या दानांची कोणीरी बरोबरी करणार नाही. भाईंचा कधी कोणाशी वाद झाला तर एकदा वादाचा विषय सोडून दिल्यावर भाई त्यावर पुन्हा कधी एक शब्द बोलत नसत. कोणाबद्दल मनात कटुता ठेवत नसत. त्यांच्याबद्दल कोणी काही बोललं किंवा लिहिलं तर भाई गप्प बसत. काळच त्यावर उत्तर देईल असं म्हणत. लेखणाला 'कारागिरी' म्हटल्यावर भाई म्हणत त्यांच्या दृष्टीने ते तसेच असेल तर लोकशाहीतील लेखन साहित्यात त्याला तस लिहिण्याचे अधिकार आहे. लिहिलं असेल रसिक ठरवतील मनाचा इतका मोठेपणा असलेले भाई चिडचिड न करता शांतपणाने जगले.

सामाजिक कृतज्ञतासाठी मी पुन्हा पुण्यात गेलो तेव्हा डॉ. बाबा आढावांच्या घरी गेलो. कुटुंबातले सगळे भेटले. दुपारी साहित्य परिषदेत आलो तेव्हा बाबा आढावांनी अशी विचारांचे एखादे घोषवाक्य किंवा एखादी कविता पाहिजे, शक्य झालं तर बघा. असं म्हटलं होतं. त्याची आठवण झाली. महात्मा फुले यांचा विचार घेवून बाबा एवढं मोठं परिवर्तनाचं सत्यशोधकाचं काम करताहेत. माझ्यासारख्याला तेवढं शक्य नाही. परंतु त्यांचा हा विचार तर मी कवितेत आणू शकतो. केवळ बाबा आढावांची सामाजिक कृतज्ञता व एकूण धडपडीसाठी मी लिहिलं हे ऐकल्यावर भाई आणखीनच खूश झाले. कविता पुस्तकात आल्यावर तो कवितासंग्रह पाठवा अस म्हणाले पुन्हा ती कविता संपूर्ण म्हणून दाखवण्याचा आग्रह धरला.

रसिकांचे प्रेम

'पु.ल. एक साठवण' या भाईंच्या षष्ठ्यब्दी समारंभाच्या मुंबईतील तुडुंब गर्दीचा व गाजलेली गौरवाची भाषण ऐकणाऱ्यातला मी एक साथी होतो. भाईंनी रसिकांवर जितकं जिवापाड प्रेम केल तितकंच रसिकांनी भाईंवर प्रेम केलं. असा भाई हा एकमेव कलावंत-माणूस आहे. भाईंच्या पंचाहत्तराव्या वाढदिवसानिमित्त मुंबईत साधा परंतु अतिशय देखणा गौरव समारंभ करण्यात आला. साहित्य, कला, चित्रपट, सामाजिक कार्य, राजकारण अशा सर्व क्षेत्रातील महाराष्ट्रातील पाच हजार तरी लोक आले होते. जयंत साळगावकर व त्यांच्या मित्रमंडळींच्या पुढाकाराने गौरव समारंभ बांधला होता. कोणाची काहीही इच्छा असली समारंभात बोलण्याची धडपड असली तरी ती भाईंनी चालू दिली नाही. त्यांच्या मनासारखा समारंभ करावा लागला. त्यांनी सांगितला तसा फक्त दीड तासांचा त्यातही एक तासांची त्यांच्या जीवनावरील चित्रपट फक्त एकालाच म्हणजे मला त्यात भाईंविषयी सांगण्यात आले. मला सात मिनिटे दिली होती. धडधडत्या छातीनं मी भाईंविषयी बोललो. अशा आणि इतक्या महनीय मंडळीसमोर व्यासपीठावरून काही बोलण्याचा हा माझ्या आयुष्यात चालून आलेला मोठाच पुण्ययोग. नंतर एक मिनिट भाईंचे हार्मोनियमवरले स्वर. भाई फक्त एकटेच सजलेल्या व्यासपीठावर आले एकच एक फुलांचा हार स्वीकारला. सात मिनिटं तृप्त मनाने महाराष्ट्राची रसिकांची कृतज्ञता व्यक्त करणारे भाईंचे भाषण सगळ्यांच्या मनात गलबला करून गेलं. शेवटी गुळाचा गणपती या त्यांच्याच चित्रपटातील आणि त्यांचेच संगीत असलेलं 'इंद्रायणी काठी' हे गीत पंडित भीमसेन जोशी यांनी तल्लीन होऊन गायलं. पडदा पडला भाईंना खूप-खूप आग्रह केला तर ते असे कधीतरी जाहीर सत्कार गौरव स्वीकारतातही. दोनदा स्वीकारले परंतु मग त्यांच्याच पद्धतीने ते घडवून आणतात तिथे मात्र, ते कोणाचेच काही चालू देत नाही ऐकत नाही. नंतरचे सातही दिवस दररोज यशवंतराव चव्हाण केंद्रात महाराष्ट्रातील जुन्या श्रेष्ठ नाट्यकर्मीनी एकएक नाटक सादर करून आनंद द्विगणित केला.

आनंदयात्री

भाईंनी पंचाहत्तराव्या वाढदिवसाच्या गौरव समारंभात सांगितलं, आयुष्याच्या पाऊणशे वर्षाच्या वाटचालीत मला जीवनाच्या निरनिराळ्या क्षेत्रात आनंद निर्माण करणारे असंख्य आनंदयात्री भेटले. माझ्या मनाला यातना देणाऱ्या माणसांपेक्षा मला आनंद देणाऱ्या माणसांची संख्या शेकडो पटीने जास्त आहे. या आनंदाचा स्वीकार करताना आपल्याही हातून माणसाला आनंद देणारी कृती निर्माण व्हावी, ही इच्छा सदैव जागरूक राहिली. आयुष्य ही एक मैफल झाली. आता या मैफलीत भैरवीची आलापी सुरू झाली आहे. जीवनाने मला खूप दिलं त्याबद्दल माझ्या मनात कृतज्ञता आहे. अशा वेळी रवींद्रनाथांच्या एका गीतातल्या ओळी आठवतात. त्यांनी जगाचा निरोप घ्यायच्या वेळी म्हटले आहे.

जाबार दिने एई कथाटि बॉले जेनो जायी-
जा देखिछि, जा पेयेछि, तुलना तार नाई
अखेरच्या दिनी म्हणतो इतके सांगून जावे काही
जे पाहिले जे लाभले त्यांला तुलना नाही

टागोरांवर श्रद्धा

भाईंची रवींद्रनाथ टागोरांवर फार श्रद्धा होती. भाईंसाठी माझ्या शेतावरच्या मी बांधलेल्या पु. ल. देशपांडे सभागृहात अनेक मराठी कवींच्या ओळींसोबतच रविंद्रनाथांची कविता सुंदर अशा संगमरवराच्या दगडावर कोरून ठेवलेली आहे. भाईंनी ज्या चित्रपटांना व इतर गीतांना चाली दिल्या जे गीते गायली, ज्या गीतांना संगीत दिलं अशी गीतं व कविता माझ्या भाईंसंबधीच्या निवेदनासह सांगून रसिकांसमोर 'माझे जीवनगाणे' या नावाने मोठा महोत्सव केला होता. 'पु. ल. देशपांडे अभीष्टचिंतन ८०' असं त्याला नाव दिलेलं होतं.

'आनंदयोगी' या पुस्तकातील सारांश भाग

उपभोगशून्य स्वामी' हा आपला सांस्कृतिक आदर्श आहे. विसाव्या शतकात याच संकेताच्या जवळ जाणारा निर्मम सांस्कृतिक स्वामी महाराष्ट्रानं पाहिला. आपल्या हयातीत आपल्याला तो बघायला मिळाला याबद्दल धन्यता मानावी, की आपल्या पुढच्या पिढ्यांना तो दिसणार नाही याची खंत करावी ह्या संभ्रमात पडलेली मराठी माणसं डोळे मिटून हात जोडून एवढंच म्हणतील, 'पुरुषोत्तमाय नमः'..

यांना जीवन कळले हो!

मंगला गोडबोले

एकदा एका गप्पांच्या बैठकीत ग.दि.माडगूळकर ह्यांनी पुलंवर शीघ्रकाव्य रचावं असं आव्हान देण्यात आलं आणि माडगूळकरांनी ओळी पेश केल्या,

पाया पडती राजकारणी, करणी ऐसी थोर,
मराठीस तू बिनदाढीचा रवींद्र टागोर.

ह्यातला दाढीबिढीचा खोडकर उल्लेख सोडला तरी एका बाबतीत पुल व रवींद्रनाथ ह्यांची तुलना सार्थ ठरते. ते म्हणजे दोघांचंही सांस्कृतिक सर्वव्यापित्व. रवींद्रनाथ जसे आणि जितके बंगाली समाजमनाशी एकरूप झालेले आहेत तसेच पु.ल.ही गेलं अर्धशतक मराठी समाजाशी एकरूप झाले आहेत. अशी कोणतीही महत्त्वाची सामाजिक घटना घडलेली नाही की, जिच्याशी पुलंचा प्रत्यक्ष किंवा दुरान्वये संबंध नाही. विलेपार्ले म्युझिक सर्कलची जडणघडण, ललित कलादर्शचा हीरकमहोत्सवाचा कार्यक्रम, भारतातलं अत्युत्तम रंगमंदिर उभारण्याच्या प्रेरणेतून बालगंधर्व रंगमंदिर बांधणं, त्याचा आठवडाभर चाललेला उद्घाटन सोहळा, आकाशवाणीवर बालगंधर्वांची पहिली पुण्यातिथी सादर करणं, १९५३ मध्ये संगीत नाटक अकादमीची स्थापना आणि पुढे तिचा विकास, वारणानगरच्या बालकलावंतांच्या वाद्यवृंदाला परदेशवारी घडवणं, जून १९६६ पासून मुंबईमध्ये 'नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंग'ची उभारणी अशा अनेक पातळ्यांवर पुलंनी ललितकलांच्या, एकूण समाजाच्या उत्कर्षात स्वतःला झोकून दिलं. एन.सी.पी.ए.चं तर उद्दिष्टच होतं, भारतीय संगीत–नृत्य आणि नाट्य ह्यांचा वारसा जतन करणं, वृद्धिंगत करणं, १९८४ ते ९३ एवढा दीर्घ काळ ह्या राष्ट्रीय ख्यातीच्या आणि महत्त्वाच्या संस्थेचे ते मानद संचालक होते. अशा मोठ्या पदाचा स्वतः फायदा घेण्याचा विचारही



समाजभान

माणसाच्या सांस्कृतिक ऊर्मींचा विकास व्हायला मुक्त वातारण हवं ह्यावर पुलंचा विश्वास होता आणि पैशासाठी चांगली कामं खोळंबू नयेत हा कटाक्षही. या देणग्यांची एकूण रक्कम प्रचंड मोठी, जवळजवळ एका कोटीच्या आसपास जाणारी आहेच. पण त्या देण्याची पद्धत, तो सगळा व्यवहार फारच सुसंस्कृत आहे. वेंगुर्ल्यात, तळकोकणात काही शाळांमध्ये पुलंनी पेज योजना राबवली. अतिशय दारिद्र्य, उपासमार ह्यामुळे जिथे मुलांची शाळेतील हजेरीच कमी होते अशा ठिकाणी मुलांना वर्षभर शाळा भरताच तांदळाची पेज पोटभर द्यायची. हजेरी ३० टक्क्यांवरून ८० टक्क्यांवर येते, बौद्धिक क्षमतेत लक्षणीय वाढ होते आणि शिक्षकांचाही उत्साह वाढतो. अशा अनुभवातून तीन शाळांची वर्षभराच्या पेजेची सोय प्रतिष्ठाननं केली. पण ती कशी? तर संस्थेच्या हिशोबात काही गडबड आहे असं कानावर आल्याचं भासवून मुख्याध्यापकांना घरी बोलावलं आणि त्यांच्याकडून सगळा चोख व्यवहार समजून घेऊन त्यांना बंद पाकिटामधून मोठ्या रकमांचे चेक दिले.

मनात न आणता खरोखर गुणी व्यक्तींना त्यांनी लाभ मिळवून दिला. इंदुबाला नावाची एक बंगाली संगीत अभिनेत्री अत्यंत हलाखीत उत्तरायुष्य कंठत होती. पुलंनी आपलं स्थान वापरून तिला संगीत नाटक अकादमीचा पुरस्कार मिळवून दिला. महाराष्ट्र शासनाचा पाठपुरावा करून १९६१ सालापासून बालगंधर्वांना मासिक मानधन मिळवून दिलं. अनेक उभरत्या कलावंतांना व्यासपीठ मिळवून दिलं. आणीबाणीच्या काळात जयप्रकाशांच्या प्रिझन डायरीचा गुप्तपणे अनुवाद केला. जनता पक्षाच्या निवडणूक प्रचारासाठी भाषणांच्या फैरी झाडल्या. एकदा तर पाच दिवसांत त्यांनी दूरदूरच्या गावी १९ ठिकाणी सभा घेतल्या होत्या. आणि दर सभेला काही हजार श्रोते होते. आनंदवनाचं कार्य हा कित्येक वर्षे त्यांच्या ध्यासाचा विषय होता. त्या कार्याकडे देशपरदेशातल्या नामवंतांचं लक्ष वेधण्यात, कार्यकर्त्यांची फळी उभी करण्यात आणि त्यांचे वार्षिक मेळावे आयोजण्यातही पुलंचा मोठा वाटा असे.

सारे काही सत्करणी

अशा प्रकारे आवडलेल्या, सामाजिक महत्त्वाच्या वाटलेल्या कामांसाठी पुलं आपला वेळ, आपला हुन्नर, आपलं मन–बुद्धी– कला खर्च करतच; पण तो नुसताच कोरडा पुरस्कार नसे. अशा अनेक कार्यांच्या उभारणीसाठी लागणारा भांडवली पैसा पु. ल. देशपांडे प्रतिष्ठानने पुरवलेला आहे. उत्तम कला व्यवहाराने जोडलेलं हे धन पुलंनी उदास विचाराने व्यतीत केलं. त्यांच्या प्रतिष्ठानचं बोधवाक्य तेच होतं. संगमनेरचं मुक्तांगण, स्वायत्त ग्रामीण विद्यापीठ, देवरुखच्या आठल्ये, सप्रे माहविद्यालयाचं ग्रंथालय, विलेपार्ल्याचा लोकमान्य सेवासंघ, मराठवाडा साहित्य परिषद, मुंबईची रक्तपेढी, के.ई.एम. रुग्णालय, पुणे मराठी ग्रंथालयाचा बालविभाग, येरवड्यांचं मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्र, मिरजेचं खरे मंदिर, यमुनापूर–हुक्केरी येथे देवदासींसाठी चालणारा उत्थान प्रकल्प अशा अगणित संस्थांना प्रतिष्ठाननं रोख रकमा, पुस्तकं, यंत्रसामग्री अशा रूपात देणग्या दिल्या आहेत. १९६५ साली स्थापन झालेल्या ह्या प्रतिष्ठानला स्वतःचं कार्यालय, कारकून, शिपाई, कर्मचारी असं कोणीही कधीही नव्हतं. योग्य त्या दानेच्छू संस्था शोधणं, त्यांच्याशी पत्रव्यवहार करणं, कायदेशीर बाबींची पूर्तता करणं, संस्थेची नेमकी गरज ओळखून ती पुरवणं अशी सगळी कामं पुल, सुनीताबाई व त्यांचे विश्वस्त आप्तेष्टच करत. कोणत्याही संस्थेला देणगी देताना आपलं नाव द्यावं, आपल्यासाठी संस्थेचे काही हक्क राखून ठेवावेत असा प्रयत्न झालेला नाही. उलट देणगी दिल्यावर संस्थेशी फारसा संपर्क ठेवला जात नसे. हेतू असा, की देणगीचं दडपण संस्थाचालकांना जाणवू नये. त्यातल्या त्यात मुक्तांगण हे नाव तेवढं बऱ्याच संस्थांना वापरू दिलेलं आहे. मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्राच्या दुसऱ्या वर्धापन दिनाला प्रमुख पाहुणे म्हणून ते म्हणाले, ज्या दिवशी देशात एकही गर्दचा व्यसनी राहणार नाही त्या दिवसापर्यंत मुक्तांगण चालूच राहील. आणि या केंद्राला पैसा कधी कमी पडू दिला जाणार नाही. हा भक्कम आधार, ही दानत, ही निरपेक्षता आणि देताना कोणालाही ओशाळवाणं न करण्याचा मनाचा मोठेपणा खरोखर दुर्मीळ आहे. अवघ्या भारतात असं दुसरं उदाहरण असेल का, याचीही शंका आहे. सतत समाजाचा विचार, सतत आपल्या माणसांचं भलं करण्याची इच्छा पुलंच्या ललितसाहित्याही दिसते.

प्रादेशिक रत्न शोधणारा जोहरी

पुलंनी बाबा आमटे, धारचे शिल्पकार फडके, विनोबा भावे, बाबासाहेब पुरंदरे, रामुभैय्या दाते वगैरे नामवंत लोकांची व्यक्तिचित्रे लिहिली. त्या काळामध्ये प्रसारमाध्यमे आताएवढी प्रबळ नव्हती. दूरदर्शन नव्हतं किंवा फारच प्राथमिक टप्प्यावर होतं. अशा वेळी भारताच्या कानाकोपऱ्यांत राहून देशहिताचं, कलेच्या संवर्धनाचं काम करणारी माणसं सहजासहजी आम जनतेसमोर येत नसतं. त्यांच्या कार्याला पुरेशी प्रसिद्धी आणि लोकाश्रय मिळत नसे. पुलंनी ही छुपी किंवा प्रादेशिक रत्नं आपल्या लेखनातून मराठी माणसांच्या समोर आणली. सामान्य मराठी माणसाच्या विचारांना त्या दिशेने चालना दिली.

सामाजिक जाणीव

पुलंनी बोरकर– मर्ढेकर– आरती प्रभू वगैरे आपल्या समकालीन कवींच्या कविता जाहीरपणे वाचून दाखवल्या. स्वत: एक नामांकित लेखक असून इतरांच्या कलाकृतींना जाहीर दाद देणं सोपं नाही. त्याला मनाचा मोठेपणा लागतो. पुलंनी या कवींवरचे कार्यक्रम बसवण्यासाठी आपला वेळ दिला, आपली शक्ती दिली, यातून एकही पैसा मानधन घेतलं नाही, उलट जमा झालेल्या तिकीट विक्रीच्या पैशांच्या देणग्या त्या–त्या कवींच्या कुटुंबीयांना दिल्या. कारण हे आपलं साहित्यिक कर्तव्य आहे असं त्यांना वाटलं. आपल्या भाषेतल्या चांगल्या कविता तरुण श्रोत्यांना ऐकवणं, पसरवणं ही आपली नैतिक जबाबदार मानली. ही वेगळ्या प्रकारची सामाजिक जाणीवच आहे.

पुलंच्या ह्या समाजमनस्कतेची मुळं खूप मागेपर्यंत, त्यांच्या बालपणापर्यंत जातात. एका मध्यमवर्गीय कलासक्त, अगत्यशील घरामध्ये ते लहानाचे मोठे झाले. पार्ल्यात लहानपण गेलं ते ज्येष्ठांची भाषणं ऐकत, अनासक्तीचे आणि ध्येयवादाचे संस्कार घेत. आजोळ तर सुधारकी म्हणून प्रसिद्ध होतंच. शाळेतले शिक्षक कॉम्रेड विष्णू चितळे आणि पुढे स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रभावाने पुलं नास्तिक झाले. पुढे सेवादलाचा संपर्क, फर्ग्युसनमध्ये प्रा.गं.बा सरदार ह्यांचा ठसा, महायुद्धापूर्व जीवनाचा अनुभव आणि गांधीवादी विचारांचा मागोवा अशा अनेक परिणामांमुळे पुल तरुण वयातच समाजोन्मुख झाले. व्यक्तिगत उत्कर्ष साधत असतानाही माणसाला सत्प्रवृत्त राहता येतं. सौंदर्य हेही जीवनातलं एक महत्त्वाचं मूल्य असतं– त्याची जोपासना करण्यात काहीही गुन्हा नाही, वैयक्तिक जीवनातला आनंद आणि समाजप्रवणता ह्याच्यात अंगभूत वैर नाही या विचारांचा वस्तुपाठ ठरावा असं जीवन ते जगले. तरुण वयात एका टप्प्यावर अनेक अर्थांनी निराधार झालेला हा माणूस एका मोठ्या समाजाचा नैतिक आधार बनला. एकीकडे आधुनिक, पुरोगामी, विचारांचा पुरस्कार करत असताना त्यांनी समाजाला आपल्या पूर्वसंचिताची यथायोग्य आठवण दिली.त्याला हसायला शिकवलं, पण इतर दु:खितांकडे बघून डोळे पुसायलाही शिकवलं. त्याची भाषा समृद्ध केली. त्याचा आलोक व्यापक केला. जे जे उत्तम. उदात्त, उन्नत ते बघण्याची दृष्टी त्याला दिली. स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्राला हे एक प्रकारचं तत्त्वज्ञान त्यांची पुरवलं, शिवाय ते हसतखेळत पुरवलं, व्यक्तिगत अगर सामाजिक पातळीवर जेव्हाजेव्हा मराठी माणसाला दु:ख, निराशा, अगतिकता, निषेध नोंदवावासा वाटला तेव्हातेव्हा त्यानं हक्कानं पुलंकडे धाव घेतली. त्यांना आलेली हजारो पत्रं ह्या विश्वासाची निदर्शक आहेत की, त्यांच्याकडे दिशा, दिलासा, विसावा मिळेल आणि तो तसा मिळालाही.

'मला या जीवन वगैरे शब्दांची भयंकर धास्ती वाटते. जगण्याला 'जीवन' म्हणावं अशी माणसं हजार वर्षातून एकदा जन्माला येतात!' असं म्हणणाऱ्या पुलंनी 'जीवन त्यांना कळले हो' म्हणावं असं आयुष्य व्यतीत केलं. त्यांच्यासारख्या प्रतिभावंताला माणसातली क्षुद्रता, पशुता, तीव्र महत्त्वाकांक्षा, असूया, मत्सर हे दिसलं नसेल असं म्हणावं तरी कसं? पण आपली लेखणी ते दाखवण्यासाठी त्यांनी खर्चली नाही. सहृदयतेनं, निर्भेळ माणुसकीनं जगावं आणि जगू द्यावं, आयुष्यावर प्रत्येकाचा आपापल्या परीनं हक्क आहे तो त्याला वापरू द्यावा. सामान्यपण स्वीकारून असामान्याकडे वाटचाल चालू ठेवावी असं सांगत राहिले. आपल्याकडे असा एक संकेत आहे, की राजाच्या गळ्यात कवड्यांची माळ असावी. त्याच्या खजिन्यात हिरेमाणकांचा खच का पडलेला असेना, त्यानं स्वत: त्यांच्या मोहात पडू नये.'

समाजमनस्कतेचं वैशिष्ट्य

पुलंनी इंग्रजीतल्या काही लोकोत्तर कलाकृतींचे अनुवाद केले तेही आपलं अनुवादकौशल्य दाखवण्यासाठी नव्हे. तर आपल्या लोकांना श्रेष्ठ साहित्याची ओळख व्हावी म्हणून. १९५० ते १९८० या काळात सरासरी मराठी माणसाचं इंग्रजी भाषेचं ज्ञान, वाचन तितकसं नसे. इंग्रजी सिनेमे, नाटक बघण्याच्या संधीही सर्वांनाच येत नसतं. अशा वेळी पुलंनी 'सुंदर मी होणार', 'अंमलदार', 'ती फुलराणी', 'तीन पैशांचा तमाशा', 'एक झुंज' वाऱ्याशी' यांसारख्या नमुनेदार विदेशी नाटकांना मराठी अंगडी–टोपडी घातली. 'एक झुंज वाऱ्याशी' हे तर मूळचं रशियन नाटक. व्हाल्डेन डोझोर्टसेव्ह या रशियन लेखकाने एक महत्त्वाचं नैतिक द्वंद्व चितारणारं नाटक लिहिलं होतं. 'द लास्ट अपॉईंटमेंट' हा त्याचा इंग्रजी अनुवाद पुलंनी वाचला होता. शासकीय सेवेमध्ये असणाऱ्या सामान्य माणसाचं हित बघावं की, केवळ आपलं पद, सत्ता यांच्या मोहामध्ये मशगूल राहावं हा प्रश्न त्यामध्ये हाताळला होता. पुलंना तो १९९०–९५ काळातही ' रेलेव्हण्ट' म्हणजे काळाशी सुसंगत वाटला म्हणून त्यांनी ते नाटक मराठीत आणलं. त्या वेळी हे नाटक किती व्यावसायिक यश मिळवेल किंवा प्रमुख कलाकारांना किती वाव मिळेल, याचा हिशोब पुलंनी केला नाही. तर आपल्या समाजात याबाबत जागृती यावी, ह्याचा ध्यास घेतला. एक विनोदकार असूनही साहित्यिक जबाबदारीही ओळखणं हे पुलंच्या समाजमनस्कतेचं मोठच वैशिष्ट्य होतं.

मूल्यविवेक

पुलंच्या निधनानं आपण काय काय गमावलं आहे असा विचार मनात आला तरी जीव गलबलतो. पुलंच्या देणग्यांविषयी खूप बोललं जातं. ती दानं उघड होती, सरळ मोजता येणारी होती. पुलनंतरही दानेच्छा राहील. काही संस्थांबाबत तर पुलंमुळे प्रेरणा घेऊन स्थानिक लोकांनी पैशाचा ओघ चालू ठेवण्याची उदाहरणं पूर्वीच घडलेली आहेत. पण पुलंनी या समाजाला नुसता पैसा दिला नाही, मूल्यविवेक दिला. नुसतं अर्थसाहाय्य केलं नाही, जगण्याला अर्थ द्यायला शिकविलं, नुसतं हसवलं नाही, कशाला हसू नये हेही भान दिलं. सहृदयता,निर्मळ माणसुकी यांचा वस्तुपाठ स्वत:च्या जगण्याने घालून दिला.

मराठीतील एक श्रेष्ठ संपादक अनंतराव भालेराव यांच्या जन्मशताब्दीचे हे वर्ष आहे. मराठवाडा या नियतकालिकाचे ते संपादक. मराठीतील अनेक संपादकांचे नाते स्वातंत्र्यचळवळीशी होते. स्वातंत्र्यचळवळीतच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची पाळेमुळे रुजलेली होती. अनंतराव भालेराव हे या परंपरेतील कदाचित शेवटचेच प्रभावी संपादक.

समाजभान जपणारा संपादक

राधाकृष्ण मुळी

अनंतराव भालेराव यांचा जन्म १४ नोव्हेंबर १९१९ रोजी तर मृत्यू २७ ऑक्टोबर १९९१ रोजी झाला. हैदराबाद मुक्तिलढ्यात असताना त्यांचा मराठवाडा या नियतकालिकाशी संबंध आला. 'मराठवाड्याच्या' २८ मे १९५३ अंकावर संपादक म्हणून त्यांचे नाव प्रसिद्ध झाले. पुढील हयातीत त्यांचे नाव 'मराठवाडा'शी निगडित राहिले.

पूर्वी पाच जिल्ह्यांचा असणारा मराठवाडा हा तेलंगण आणि कर्नाटकातील काही जिल्ह्यांसह निजामी राजवटीखाली होता. सुमारे सव्वा दोनशे वर्षे ही राजवट टिकली. या संस्थानांचे स्वरूप लक्षात घेण्यासारखे होते. भौगोलिकदृष्ट्या ते देशाच्या मध्यभागी होते. विस्ताराने आणि लोकसंख्येच्या दृष्टीने ते मोठे होते. राजा मुस्लीम आणि बहुसंख्य प्रजा हिंदू अशी स्थिती असलेल्या या संस्थानाचे स्वरूप बहुधार्मिक, बहुसांस्कृतिक आणि बहुभाषिक राहिले. ब्रिटिशांच्या थेट गुलामीखाली असणाऱ्या देशाच्या काही भागात ब्रिटिशांमुळे सुधारणा झाल्या आणि आधुनिक शिक्षणाची साधने उपलब्ध झाल्यामुळे तेथे संस्थात्मक जीवन उभे राहिले. निजामी राजवटीतील राजाकडून हे घडलेच नाही. उलट उर्दू भाषेच्या सक्तीमुळे एक प्रकारची सांस्कृतिक गुलामगिरीही लादली गेली.

अनंत भालेराव

संस्कार आणि प्रभाव

अशा संस्थानात एका गरीब घरात जन्मलेल्या अनंतरावांवर पहिले संस्कार झाले ते भागवत धर्माचे. पुढे चळवळीत त्यांच्यावर मार्क्सवादाचा आणि गांधीवादाचा प्रभाव पडला पण मूळचा ठसा पुसला गेला नाही. त्यांचे वडील काशिनाथबुवा खंडाळकर हे अध्यात्मवादी. त्या ओढीपायी त्यांनी कुळकर्णीपण सोडून दिले. त्यांच्या आचरणामुळे पंचक्रोशीतील जनजीवनावर त्यांचा मोठा प्रभाव होता. अनंतरावांनी त्यांच्या वडिलांचे अत्यंत सुंदर शब्दचित्र रेखाटले असून ते त्यांच्या 'मांदियाळी' या पुस्तकात वाचावयास मिळते. भागवत धर्माच्या प्रभावाखालील ग्रामीण भागातील व्यक्तिगत, कौटुंबिक, सामाजिक जीवन कसे नांदत होते, हे त्यात पाहावयास मिळते.

गोविंदभाई श्रॉफ यांचा प्रभाव

अनंतराव दहावीची परीक्षा द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले. पण सबंध संस्थानात ते संस्कृत विषयात पहिले आले. त्यामुळे त्यांना दरमहा पंधरा रुपयांची शिष्यवृत्ती मिळाली. त्यांनी महाविद्यालयात प्रवेश घेतला. नेमक्या त्या सुमारास पुढे संस्थानातील लोकलढ्याचे नेते म्हणून प्रसिद्ध झालेले गोविंदभाई श्रॉफ औरंगाबादी शिक्षक म्हणून आले. त्यांनी गावात अभ्यासवर्ग सुरू केला. त्या अभ्यासवर्गामुळे आपल्याला नव्या जगाचा 'धूर' दिसला, 'अग्नि'असे अनंतरावांनी लिहून ठेवले आहे.

याच सुमारास मराठवाड्यात जनजागृती होऊ लागली होती. त्यांचा प्रभाव तरुणावर पडला आणि इंटरच्या दुसऱ्या वर्षात असलेल्या अनंतरावांनी वयाच्या १९ व्या वर्षी सत्याग्रह केला. त्या काळी तरुणवर्गात लोकप्रिय असलेले गोंविदभाई श्रॉफ यांना सरकारने नोकरीवरून काढून टाकले. त्यातून आणि महाविद्यालयात वंदे मातरम् म्हणण्यावर आलेल्या बंदीमुळे असंतोष निर्माण झाला. विद्यार्थ्यांनी वंदे मातरम् म्हणण्याचा आग्रह धरला असा आग्रह धरणाऱ्या विद्यार्थ्यांना काढून टाकण्यात आले. त्यामुळे शिक्षणासाठी अनंतराव नागपुरात आले. तेथे ३९ साली त्यांनी कॉलेजात प्रवेश घेतला. मात्र या मुलांना पुन्हा हैदराबाद संस्थानात शिक्षण घ्यावयाचे असेल तर त्यांना वंदे मातरम् चळवळीत भाग घेतल्याबद्दल माफी मागावी लागेल असे सांगण्यात आले. हे अनंतरावांना मान्य होणे शक्य नव्हते. त्यांचे शिक्षण थांबले.

शिक्षक ते कार्यकर्ता

हैदराबाद संस्थानात शिक्षणाच्या सोयी जेमतेम होत्या. तेथे राष्ट्रीय विचार देणाऱ्या शाळांना परवानगी मिळणे शक्यच नव्हते. मात्र अशा शाळांची आवश्यकता चळवळीतील कार्यकर्त्यांना वाटत होती. त्यातून काही ठिकाणी शाळा आकाराला आल्या. त्यातून परभणी जिल्ह्यातील सेलू येथे एक शाळा उभी राहिली. अनंतराव या शाळेत शिक्षक होते. पुढे ते पूर्ण वेळ कार्यकर्ते म्हणून काम पाहू लागले. या काळात त्यांचा अनेकांशी संपर्क आला. चळवळीतील त्या दिवसाचे चित्रण त्यांच्या पेटलेले दिवस या संग्रहात वाचायला मिळते. हैदराबाद मुक्तिलढ्यातील एक विलक्षण प्रकरण म्हणून ज्ञात असलेल्या उमरी बँक प्रकरणात त्यांचा सहभाग होता. या संदर्भातील त्यांचे लेखन मुळातून वाचावयास हवे.

अनंत भालेराव यांच्यासोबत हमीद दलवाई

'मराठवाडा'ची परंपरा आणि संघर्ष

हैदराबाद संस्थानातील पहिल्या पिढीतील राजकीय कार्यकर्ते म्हणून ज्यांचा उल्लेख केला जातो त्या आनंद कृष्ण वाघमारे यांनी संस्थानात मराठवाडा हे साप्ताहिक सुरू केले. संस्थानात वृत्तपत्र काढणे किंवा छापखाना सुरू करणे यासाठी थेट हैदराबादवरून परवानगी आणावी लागत असे. अतिशय विपरीत परिस्थिती असताना वाघमारे यांनी हे वृत्तपत्र सुरू केले. जनतेची चळवळ आणि त्यानंतरची पोलीस कार्यवाही यामुळे हैदराबाद संस्थान निजामी राजवटीतून मुक्त झाले. राज्य पुनर्रचनेनंतर 'मराठवाड्या'चा संसार औरंगाबादला हलला. अनंतरावही औरंगाबादला आले. येथे त्याचे रूपांतर दैनिकात झाले.

जनतेची गाऱ्हाणी सरकारदरबारी

नव्याने आकाराला येत असलेल्या राज्यात अनंतरावांनी मराठवाड्यातील जनतेची गाऱ्हाणी शासन दरबारी मांडली. हे कार्य करत असतानाच वाङ्मयीन, राजकीय व सामाजिक जीवनात आधुनिक जीवनमूल्यांची जोपासना केली. रोजचा अंक, संपादकीय आणि दिवाळी अंकात त्याचे प्रतिबिंब उमटत असे.

मराठवाड्याच्या विकासाशी निगडित अनेक प्रश्नांची चर्चा 'मराठवाडा'च्या संपादकीय पानावर झालेली आहे. अग्रलेखातून या भागाचा कैवार घेत वस्तुनिष्ठ मांडणी केली गेली आणि चळवळींना पाठिंबा दिला गेला. कोणतीही चळवळ आकाराला येत असताना आणि ऐन भरात असताना अनंतरावांची लेखणी बहरून येत असे.

संपादक म्हणून त्यांनी त्यांच्या राजकीय मतांची वेळोवेळी किंमत दिली. स्वत:ची जबाबदारी टाळली नाही. त्यामुळे स्वातंत्र्यानंतरही तुरुंगात जाण्याचे प्रसंग आले. आणीबाणीत त्यांनी सत्याग्रह केला. पुढे त्यांना मिसाखाली तुरुंगात ठेवण्यात आले.

लेखक-वाचकांच्या पिढ्या घडवल्या

मराठवाड्याच्या सार्वजनिक जीवनात एक काळ असा होता की, ज्याला कुणाला कोठेही अन्याय झाला असे वाटत असे तो त्याचे गाऱ्हाणे घेऊन अनंतरावांकडे जात असे आणि समोर आलेला प्रश्न आपलाच आहे, हे समजून जमेल त्या माध्यमातून अनंतराव त्याचा पाठपुरावा करीत. त्यांनी आणि त्यांच्या संपादकत्वाखाली मराठवाडा दैनिकाने लेखक-वाचकांच्या दोन-तीन पिढ्या घडवल्या. पुढे त्यांच्याशी मतभेद झालेल्या काही मान्यवरांनीही आपल्याला अनंतरावांनी संधी दिली हे कृतज्ञतापूर्वक नमूद केले आहे.

अनंतरावांचे अग्रलेख हा मराठी भाषेचा ठेवा आहे. अत्यंत शैलीदार, सुस्पष्ट आणि परखड भाषेतील त्यांच्या अग्रलेखांचा चाहता वाचक केवळ मराठवाड्यापुरता मर्यादित नव्हता. त्यांचे अग्रलेख 'आलो याचि कारणासी' या नावाने संग्रहित झाले आहेत. आलो याची कारणासी हा संत तुकारामांच्या अभंगातील एक चरण आहे. त्यात तुकारामांनी जीवनाचा हेतू स्पष्ट केला आहे. याच चरणातील शब्दांतून अनंतरावांचे वर्णन करता येते. ते याच कारणासाठी म्हणजे राजकीय कार्यकर्ता आणि मराठवाड्यातील जनतेची काळजी वाहणारा संपादक होण्यासाठीच जणू जन्माला आले होते.!

पुढे दैनिकाच्या धबडग्यातून निवृत्त झाल्यावर त्यांनी मुक्तिसंग्रामाचा इतिहास लिहिला. प्रकृतीच्या विपरीत अवस्थेत सुमारे तीन वर्षे अभ्यास करत त्यांनी हा इतिहास सिद्ध केला. काही व्यक्तिचित्रे लिहिली. ती मांदियाळीत समाविष्ट असून त्यात संपादकीय भूमिकेत नसलेल्या अनंतरावांच्या शैलीचे, भाषेचे गुण फार उत्तमरीत्या प्रत्ययास येतात. हेच त्यांच्या 'कावड' या साप्ताहिक स्तंभातील लेखाविषयी म्हणता येईल.

ख्यातनाम समाजवादी नेते आणि लेखक नानासाहेब गोरे यांना अनंतरावांचे लेखन संत एकनाथांची आठवण करून देणारे वाटत असे, अशी आठवण प्रा. ग. प्र. प्रधान यांनी लिहून ठेवली आहे.

संघर्षशील, सहृदय तरीही कर्तव्यकठोर व्यक्तिमत्त्वाला अखेरच्या काळात 'मायस्थेनिया' ने घेरले. त्याही परिस्थितीत वैद्यकीय सल्ल्याविरुद्ध जात त्यांनी लोकसंपर्क टाळला नाही कारण आपण जे काही आहोत ते जनतेमुळे आणि जनतेसाठी आहोत अशी त्यांची धारणा होती. स्वातंत्र्य चळवळीत ज्यांचे व्यक्तिमत्त्व आकाराला आले त्या संपादकांच्या परंपरेतील हा सच्चा आणि अखेरचा प्रभावी प्रतिनिधी!

उपसंचालक, माहिती (अमरावती)

सामान्य जनतेच्या परिवर्तनात योगदान देणाऱ्या समाजमाध्यमांचा सकारात्मक व विधायक कार्यासाठी वापर होणे आवश्यक आहे. या समाज माध्यमांच्या वापरकर्त्यांना एकत्र आणून या विषयावर सर्वांगीण चर्चा घडवण्यासाठी मुंबईत आयोजित दोनदिवसीय 'राज्यस्तरीय पहिले मराठी सोशल मीडिया' संमेलनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र सायबर, राज्य मराठी विकास संस्था, आणि डिजिटल मीडिया प्रेमी मंडळी, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने या संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. सोशल मीडियावर मराठीत व्यक्त होणाऱ्यांसाठी हे संमेलन निश्चितच हुरूप वाढवणारे ठरले.

किशोर गांगुर्डे

पहिल्या मराठी सोशल मीडिया संमेलनात 'समाजाची दशा, दिशा आणि दिशांतरे' या परिसंवादात बोलताना नियंत्रक प्रदीप लोखंडे. या परिसंवादात शेफाली वैद्य, राजू परुळेकर, आशिष दीक्षित आणि सौरभ गणपत्ये यांनी सहभाग घेतला.

सोशल मीडिया मस्त आहे...

आज सोशल मीडियावर सगळेच लोक व्यक्त होतात, मात्र व्यक्त होण्यापेक्षा ते फॉरवर्ड आणि शेअरिंग या पर्यायातच अजून अडकून पडलेले आहेत. लोकांनी व्यक्त झाले पाहिजे ते अधिक प्रभावीपणे मांडले गेले पाहिजे यासाठी आवश्यक ते तंत्र त्यांना समजावून घेता यावे यासाठी राज्यस्तरीय पहिल्या मराठी सोशल मीडिया संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या संमेलनाचे मराठी भाषा मंत्री विनोद तावडे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे संचालक अजय अंबेकर, संचालक सुरेश वांदिले, डिजिटल मीडिया प्रेमी मंडळी संस्थेचे समीर आठल्ये, मंगेश वाघ, प्रदीप लोखंडे आदी मान्यवरांची उपस्थिती होती. सोशल मीडिया म्हणजे करमणूक, वेळ घालवण्याचे साधन नाही तर या माध्यमामुळे चांगली मूल्यनिर्मिती, समृद्ध विचार आणि विविध विषयांची सकारात्मक चर्चा होत असल्याचे दिसून येते आहे, सोशल मीडिया आपली अभिव्यक्ती समृद्ध करण्यासाठी पूरक असून आगामी काळात साहित्यिक आणि सोशल मीडियावरील लेखकांना एकत्र आणून हे माध्यम अधिक शक्तिशाली करण्यासाठी प्रयत्न करण्याची ग्वाही या वेळी श्री. विनोद तावडे यांनी दिली. समाजमाध्यम ही काळाची गरज, ही गरज ओळखून महाराष्ट्र शासनाने हे पहिले राज्यस्तरीय मराठी समाजमाध्यम संमेलन आयोजित केल्याबद्दल श्री. तावडे यांनी आयोजकांचे कौतुक केले.

'सोशल मीडिया मस्त आहे!' या विषयावर या क्षेत्रातील विश्लेषक, लेखक प्रसाद शिरगावकर यांनी सोशल मीडियाचा वापर आणि महत्त्व सांगितले. तर आपत्कालिन परिस्थितीत तातडीची मदत मिळविण्यासाठी सोशल मीडियाच्या नावीन्यपूर्ण वापराबद्दल अक्षय बोकमूरकर यांनी तर ट्विटर संमेलनाबद्दल स्वप्निल शिंगोटे यांनी अनुभव सांगितले.

इंटरनेट-सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर करण्याची आवश्यकता व्यक्त करून जबाबदार नेटिझन्स होण्याचे आवाहन रिस्पॉन्सिबल नेटिझन चळवळीचे संस्थापक उन्मेश जोशी यांनी केले.

समाजमाध्यमाबद्दल अनेकजण नकारात्मक असतात पण त्याच्या सकारात्मकतेकडेही तितकेच पाहिले पाहिजे, त्यावर विचार करायला हवा. नवीन रचनात्मक कामांना समाज मान्य करतोय. अनेक शोध लागत गेले पण यातील चांगलं-वाईट हे आपणच घेण्याचे आवाहन महाराष्ट्र सायबरचे पोलीस अधिक्षक डॉ. बाळसिंग राजपूत यांनी 'माझी एक्स्प्रेशन, माझं इम्प्रेशन'या परिसंवादात केले. या परिसंवादात यजुर्वेद महाजन, मानसोपचारतज्ज्ञ डॉ. श्रुती पानसे, बोल-भिडूचे संस्थापक श्रीकांत जाधव, सायबर फॉरेन्सिक एक्स्पर्ट अमोल देशमुख यांनी सहभाग नोंदवला. 'म.टा.ऑनलाइन'चे संपादक हारिस शेख यांनी डिजिटल विश्वात विश्वासार्हता महत्त्वाची असल्याचे सांगून ऑनलाइन बातमी किंवा मथळा देण्यापूर्वी बातमीची खात्री करून घेणे आवश्यक असल्याचे सांगितले.

पहिल्या दिवसाच्या शेवटच्या सत्रात 'समाजाची दशा, दिशा आणि दिशांतरे' या विषयावरील परिसंवादात राजकीय विश्लेषक शेफाली वैद्य, राजू परुळेकर, बीबीसी मराठीचे मुख्य संपादक आशिष दीक्षित आणि इतिहास अभ्यासक व ब्लॉगर सौरभ गणपत्ये यांनी आपले विचार मांडले. संवाद हा महत्त्वाचा असून तो कोणताही असो मात्र समाजमाध्यमाच्या भडिमारामुळे नातेसंबंध बिघडू देऊ नका.

संवाद हवा, विसंवाद नको...

समाजमाध्यमातून संवाद साधताना विसंवाद होणार नाही, समाजमन दूषित होणार नाही याची काळजी घेण्याचे आवाहन करतानाच सोशल मीडियावर आपण कोणत्याही संपादकाशिवाय लिहितोय, व्यक्त होतोय, मात्र ते सगळ्यांनाच पटेल असा आग्रह न धरण्याचे आवाहन या परिसंवादातील तज्ज्ञांनी केले.

संमेलनाच्या दुसऱ्या दिवशी पहिल्या सत्रात 'ब्रँड, व्यावसायिक दृष्टिकोन आणि सोशल मीडिया' यावरील परिसंवादात सेटको इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक राजेश मंडलिक, ब्रँड व्यावसायिक सदानंद परूळेकर, रूरल मार्केटिंग तज्ज्ञ प्रदीप लोखंडे, इ-लर्निंग, इ-गव्हर्नन्स तज्ज्ञ दिलीप टिकले यांचा सहभाग होता. समाज माध्यमातून ब्रँड हव्या त्या व्यक्तीपर्यंत पोहोचू लागला आहे, टार्गेट ऑडियन्स पाहून पूर्वी ब्रँड ठरवला जायचा, मात्र सोशल मीडियामुळे सगळं एकच झालं असे सांगून ग्राहक आणि मालक यांच्यात समाज माध्यमामुळे बॉंडिंग तयार झाल्याचं मत तज्ज्ञांनी व्यक्त केलं.

'सोशल मीडियावर व्यावसायिक यश कस मिळवायचं?' याविषयावरील परिसंवादात सोशल मीडियाचा अर्थार्जनाच्या दृष्टीने कसा विचार करता करता येईल याविषी 'इन मराठी'चे ओंकार दाभाडकर, 'मधुरा रेसिपीज'च्या मधुरा बाचल, 'कोलाज इन'चे सचिन परब, भाडिपाच्या संस्थापक अनुषा नंदकुमार यांनी बऱ्याच गोष्टी उलगडून सांगितल्या.

सोशल मीडियाचा विस्तार पाहता शासनाच्या लोककल्याणकारी योजना, उपक्रम लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी राज्य शासन सोशल मीडियाच्या विविध प्लॅटफॉर्म आणि टूल्सचा अतिशय प्रभावीपणे वापर करत असल्याचे संचालक अजय अंबेकर यांनी या वेळी सांगितले. ट्विटर, फ़ेसबुक, युट्यूब, इन्स्टाग्राम, टेलिग्राम, व्हॉट्सॲप, एसएमएस. जिओ चॅट चॅनल आदी विविध सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सला मिळणाऱ्या प्रतिसादाबद्दल आणि संवादवारी, संवादपर्व, महामित्र, माहितीदूत, संवादिनी, लोकराज्य, जय महाराष्ट्र, दिलखुलास आदी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या विविध उपक्रमांबद्दल उपस्थितांना माहिती दिली.

विश्वासार्हता बघा

'व्हायरल होतं की करता येतं?' या परिसंवादात प्रसिद्ध लेखक अरविंद जगताप, विश्लेषक गणेश मतकरी, 'खासरे टीव्ही' या युट्यूब चॅनलचे संजय श्रीधर, सायबर तज्ज्ञ अमोल देशमुख आणि HoaxSlayer.com चे संपादक पंकज जैन उपस्थित होते. कन्टेन्ट चांगले असेल तर ऑटोमॅटिक व्हायरल होते मात्र नकारात्मक गोष्टी त्यापेक्षा लवकर व्हायरल होतात. सोशल मीडियावर आलेल्या सगळ्याच गोष्टी खऱ्या नसतात, त्यामुळे विश्वासार्हता नसलेली माहिती पुढे पाठवू नका. व्हिडिओ शेअर करण्यापूर्वी स्वतःच खात्री करून पाहा असे आवाहन करतानाच तंत्रज्ञान आपलं गुलाम आहे, तुम्ही त्याचे गुलाम बनू नका असा सल्लाही या तज्ज्ञांनी दिला.

'मला व्यक्त होताना असणाऱ्या चिंता, त्यावरील उपाय आणि माझ्या अपेक्षा' या विषयावरील परिसंवादात संगीतकार कौशल इनामदार, सेट्कोचे व्यवस्थापकीय संचालक राजेश मंडलिक, सोशल मीडिया लेखिका गौरी ब्रह्मे, भाडिपाचे संस्थापक सारंग साठ्ये यांनी भाग घेतला. माध्यमांची आचारसंहिता पाळून आपण व्यक्त होणं आवश्यक असून सोशल मीडियावर व्यक्त होणाऱ्या भाषेबद्दल तारतम्य पाळले गेले पाहिजे अशी अपेक्षा या परिसंवादातून व्यक्त करण्यात आली.

बोलीभाषा आवश्यक, शब्दच्छल नको

सोशल मीडियासाठी बोलीभाषा आवश्यक आहेत मात्र शब्दच्छल होऊ नये, नियमांचा भंग होऊ यासाठी प्रमाणभाषेची आवश्यकता आहे असा सूर 'सोशल मीडियाची भाषा : प्रमाण भाषा की....' या परिसंवादात उमटला. या परिसंवादात 'बीबीसी मराठी'चे मयुरेश कोन्नूर, 'बोलभिडू'चे संस्थापक सौरभ पाटील, राज्य मराठी विकास संस्थेचे संचालक आनंद काटीकर यांचा सहभाग होता.

'सोशल मीडियामुळे मिळालेले नावीन्यपूर्ण कलाविष्कार आणि संधी' या परिसंवादात बाबा मिमवाले उर्फ सनत लडकत, बुकलेट गाय अमृत देशमुख आणि रॅप बॉस म्युझिक ग्रुपचे अजित शेळके यांनी सोशल मीडियावरील नावीन्यपूर्ण कलाविष्काराची उपस्थितांना माहिती दिली. अजित शेळके यांनी त्यांच्या रॅप साँगचे सादरीकरणही केले. कोरी पाटी प्रॉडक्शनच्या 'गावाकडच्या गोष्टी' या गाजलेल्या वेब सीरीजमधील कलाकारांचे तसेच 'गुगल विरूद्ध अलेक्सा' या प्रसाद शिरगावकर लिखित लघुनाट्याचे यावेळी सादरीकरण झाले. व्यक्त होणे अजून सोपे करण्यासाठी 'टूल्स आणि टेक्निक्स' या विषयावर स्वरचक्र टंकलेखन निर्माता अनिरुद्ध जोशी यांनी विविध टेक्निक्स उपस्थितांना समजावून सांगितल्या. दोन दिवस चाललेल्या या संमेलनात विविध विषयांवर विचारमंथन झाले, उपस्थित नेटकरी आणि समाजमाध्यम वापरकर्त्यांसाठी हे संमेलन पर्वणी ठरले.

महासंचालनालयाच्या फेसबुक पेजवरून आणि parthlive.com या संकेतस्थळावरून या संमेलनाचे दोन्ही दिवस थेट प्रसारण करण्यात आले. राज्यात सोशल मीडियासारख्या विषयावर महाराष्ट्र शासनाने डिजिटल प्रेमी मंडळी संस्थेच्या सहकार्याने पहिल्यांदाच आयोजित केलेले हे संमेलन परिसंवाद, वक्ते आणि आयोजनातील सुसूत्रतेमुळे वैशिष्ट्यपूर्ण ठरले.

वरिष्ठ सहायक संचालक (समाजमाध्यम)

ग्रंथसंपदा

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाची दर्जेदार व संग्रहणीय ग्रंथसंपदा

स्पर्धा परीक्षेसाठी उपयुक्त प्रकाशने

विविध स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त ग्रंथसंपदा
ही पुस्तके
सर्व जिल्हा माहिती कार्यालयांमध्ये उपलब्ध

Maharashtra Year Book
किंमत रु. २५०



महामानव
किंमत रु. १००



Magnificent Maharashtra
किंमत रु. २००

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2018-20
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th Every Month
Date of Publication : 10th of Every Month



Visit: www.mahanews.gov.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

प्रति/TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

If undelivered, please return to:

प्रेषक / From

अनिल आलूरकर
उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई – ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक अनिल आलूरकर, उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी डिलिजंट मीडिया कॉर्पोरेशन लि., प्लॉट नं. ईएल /२०१, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, महापे, नवी मुंबई – ४०० ७०४ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक: ब्रिजेश सिंह